




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार २५ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# पीएसआयच्या छळापाई महिला डॉक्टरची आत्महत्या

**● 4 वेळा बलात्कार आणि छळ ● साता-यासह राज्यात खळबळ**

**मुंबई/प्रतिनिधी :**साता-यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका वरिष्ठ महिला डॉक्टरने आत्महत्या केल्याची अत्यंत धक्कादायक घटना गुरुवारी रात्री उशिरा उघडकीस आली आहे. या घटनेमुळे फलटण परिसरात तसेच संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. उपजिल्हा रुग्णालयातील कार्यरत असलेली महिला डॉक्टर काही महिन्यांपासून पोलिस आणि आरोग्य विभागाच्या एका वादामध्ये अडकल्या होती. तपासणीसंदर्भात पोलिसांशी झालेल्या वादानंतर त्यांच्यावर अंतर्गत चौकशी सुरू करण्यात आली होती. या चौकशीमुळे महिला डॉक्टर मोठ्या मानसिक तणावाखाली होती. त्यानंतर महिला डॉक्टरने टोकाचे पाउल उचलले.



महिला डॉक्टरने यापूर्वीच आपल्या वरिष्ठ अधिका-यांकडे लेखी तक्रार देउन माझ्यावर अन्याय होत आहे, मी आत्महत्या करीन असा स्पष्ट इशारा दिला होता. मात्र, या गंभीर इशा-यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. वरिष्ठांकडे तक्रार करूनही दाद न मिळाल्याने, अखेर त्यांनी टोकाचे पाउल उचलले. फलटणमधील एका हॉटेलमध्ये महिला डॉक्टरने आपले आयुष्य संपवले. रात्री उशिरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत त्यांचा मृतदेह ताब्यात घेतला. प्राथमिक तपासानुसार ही आत्महत्या असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर आता उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाला धक्कादायक वळण लागला आहे. मृत्यूपूर्वी महिला डॉक्टरने हातावर आत्महत्येचे कारण स्पष्टपणे लिहील्याचे म्हटले जात (पान २ वर)

## जबाबदारास तात्काळ निलंबीत करा :मुख्यमंत्री

आता मुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची तात्काळ दखल घेतली आहे. त्यांनी याप्रकरणी तातडीने महत्त्वाचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून फलटणमधील महिला ड?क्टर आत्महत्याप्रकरणी गंभीर दखल घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संबंधित जबाबदार असलेल्या पोलिसांना तात्काळ निलंबित करा, असे आदेश दिले आहेत. यामुळे आता याप्रकरणाच्या चौकशीला वेग येण्याची शक्यता आहे.

# दिवाळी साजरी करून परतत होते | लक्झरी बस-दुचाकीत भीषण अपघात; 20 प्रवाशांचा मृत्यू

**कर्नूल/वृत्तसंस्था :** हैदराबाद-बंगळूर महामार्गावर कर्नूल जिल्ह्यातील चिन्ना टेकुर गावाजवळ आज पहाटेच्या सुमारास एक मोठी आणि मन हेलावून टाकणारी दुर्घटना घडली. कावेरी ट्रॅव्हल्सच्या खासगी स्लीपर कोच बसला एका दुचाकीने धडक दिल्यानंतर बसने भीषण पेट घेतला. या दुर्घटनेत २० प्रवाशांचा दुर्दैवी अंत झाला असून अनेक प्रवासी जखमी झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीनंतर हा अपघात झाला, त्यावेळी बसमधील अनेक प्रवासी गाढ झोपेत होते. दुचाकीच्या धडकेमुळे बसच्या इंधन टाकीजवळ आग लागली आणि ती काही क्षणातच संपूर्ण बसमध्ये पसरली. आगीची तीव्रता इतकी मोठी होती की प्रवाशांना बाहेर पडायला फारसा वेळ मिळाला नाही. बसमध्ये सुमारे डझनभर प्रवासी आपत्कालीन दरवाजातून बाहेर पडण्यात यशस्वी झाले, ज्यामुळे त्यांचे प्राण वाचले. जखमी झालेल्या सर्व प्रवाशांना तातडीने कर्नूल येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या



घटनेची माहिती मिळताच स्थानिक रहिवासी, पोलिस आणि अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी पोहोचल्या. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून आग विझवली, मात्र तोपर्यंत २० जणांनी जीव गमावला होता. अपघातानंतर महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

**मुख्यमंत्री नायडूंकडून दुःख व्यक्त**

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. चिन्ना टेकुरजवळ झालेल्या बस अपघाताची बातमी ऐकून मोठा धक्का बसला. ज्या कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. जखमींवर योग्य उपचार व्हावेत आणि पीडित कुटुंबांना सर्वतोपरी मदत मिळावी, यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत असे त्यांनी समाजमाध्यमावर पोस्ट करून सांगितले.

**‘अशी घाणेरडी, गलिच्छ कृती केल्यास...’**

## सातारा महिला डॉक्टर प्रकरणात सुप्रिया सुळेंचा संताप

**मुंबई/प्रतिनिधी :**साता-यातील फलटणमध्ये उपजिल्हा रुग्णालयातील वरिष्ठ महिला डॉक्टरने पोलिसांच्या जाचाला कंटाळून आपले जीवन संपवले. शरद पवार गटाच्या



खासदार सुप्रिया सुळे यांनीही या संदर्भात संतप्त प्रतिक्रिया दिली.‘हा प्रकार धक्कादायक आहे. सुसंस्कृत महाराष्ट्रात अशा घटना होत आहेत हे अतिशय लाजिरवाणं आहे. अशा घटनेने महाराष्ट्रातील सर्वांचीच मान शरमेने खाली जाते. हा प्रकार अतिशय दुर्दैवी आहे. असे प्रकार आपल्या संस्कारात बसत नाहीत. त्यामुळे माझा आग्रह आहे की या प्रकरणाची पारदर्शकपणे चौकशी झाली पाहिजे. कुणीही अशी घाणेरडे, गलिच्छ कृत्य केल्यास त्या माणसाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे,‘ असे सडेतोड मत सुप्रिया सुळे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना मांडले.‘मी आधी अनेक वेळा हा मुद्दा मांडला आहे की कृपा करून फास्ट ट्रॅक कोर्ट करा आणि अशा गुन्हेगारांना थेट फाशी द्या. अशा प्रकरणांमध्ये गंभीर दखल घेउन उदाहरण उभे करण्याची नितांत गरज आहे की, महाराष्ट्र सरकार किंवा भारत सरकार अशा प्रकारच्या घटना खपवून घेणार नाही आणि असे प्रकार सहन केले जाणार नाहीत,‘ अशी मागणीही त्यांनी केली.तसेच, सोशल मीडिया एक्सवरही त्यांनी आपल्या भावना मांडल्या. ‘फलटण, जि. सातारा येथील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत महिला डॉक्टरचे आत्महत्या प्रकरण अतिशय गंभीर आहे. या महिलेने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये तिने गेली काही दिवसांपासून तिचा शारिरीक आणि मानसिक छळ होत असल्याचे वरीष्ठांना वारंवार कळविले होते. परंतु तिच्या तक्रारीची दखल घेतली गेली नाही. अखेर तिने टोकाचे पाउल उचलले. या विषयाच्या मूळाशी नेमके कोणते कारण आहे? या महिलेच्या तक्रारीची दखल का घेतली गेली नाही? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. संबंधित महिलेला आत्महत्येस प्रवृत्त करणा-यांना शिक्षा होणे आवश्यक आहे. माझी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आग्रही मागणी आहे की या प्रकरणाची चौकशी करुन दोषी व्यक्तींना कठोर शासन करावे.

## ’ते’ खासदार कोण? महिला डॉक्टरने दोन पीएंची पोलिसांकडे केलेली लेखी तक्रार

**सातारा -**फटलणच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या महिला डॉक्टरने केलेल्या आत्महत्येनंतर



आता सातारा पोलीस चांगलेच अडचणीत आले असून या प्रकरणाचे धागेदोरे आता बड्या राजकीय लोकांपर्यंत जाउन पोहोचल्याचे समोर येत आहे. महिला डॉक्टरच्या आतेभावाने खळबळजनक खुलासा केला असून दोन महिन्यांपूर्वी दोन पीएंच्या फोनवरून खासदार बोलले असल्याची तक्रार या डॉक्टरने पोलिसांकडे केली होती, तसे पत्र दिले होते असा मोठा गौप्यस्फोट केला आहे. या महिला डॉक्टरची सखखी बहीण देखील वैद्यकीय अधिकारी आहे. तिला तिने फोनवरून आपल्यावर पोस्टमार्टेम रिपोर्ट बदलण्यासाठी पोलीस तसेच राजकीय दबाव येत असतात याची कल्पना दिली होती. परंतू, अन्य गोष्टी तिने भीतीमुळे आपल्या बहिणीला सांगितल्या नसाव्यात असा दावा आतेभावाने केला आहे. खासदार दोन पीएंच्या फोनवरून आपल्याशी बोलले आहेत, अशी लेखी तक्रार या महिला डाक्टरने पोलिसांकडे केली होती. तसेच कारवाईची मागणी देखील केली होती. परंतू, या डॉक्टरने केवळ खासदार असा उल्लेख केल्याने हे खासदार नेमके कोण याचाही छडा आता पोलिसांना लावावा लागणार आहे. या डॉक्टरने आधी तक्रार केलेली होती, त्यावर का कारवाई झाली नाही, असा सवाल आता महिला आयोगाने केला आहे. एकंदरीतच महिला डॉक्टरच्या आत्महत्येची पाळेमुळे पोलिसांपासून ते राजकारण्यांपर्यंत गेलेली असल्याचे समोर येत आहे.

## श्रद्धा वालकरवर अजूनही अंत्यसंस्कार झालेच नाहीत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आफताब पुनावाला आणि श्रद्धा वालकर हे कपल लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये दिल्लीत राहत होते. रिलेशनशिपच्या काही महिन्यातच



आफताबने श्रद्धाची निर्घृणपणे हत्या केली. श्रद्धा वालकर हत्या प्रकरणामुळे तीन वर्षांपूर्वी संपूर्ण देश हादरला होता. मुंबईचा आफताब पुनावाला आणि श्रद्धा वालकर हे कपल लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये दिल्लीत राहत होते. रिलेशनशिपच्या काही महिन्यातच आफताबने श्रद्धाची निर्घृणपणे हत्या केली.श्रद्धाच्या शरीराचे ३५ तुकडे करुन आफताबने ते फ्रीजमध्ये ठेवले आणि रोज मध्यरात्री एक एक अवयव नेउन जंगलात फेकून देत होता. दिल्ली पोलिसांनी (पान २ वर)

# आदित्य ठाकरेही फोडणार बोगस मतदानाचा बॉम्ब

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईत सोमवारी होणा-या ठाकरेंच्या शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यात युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे एक मोठा राजकीय ब?म्ब फोडणार आहेत. या बाबत मिळालेल्या माहितीप्रमाणे, आदित्य ठाकरे या मेळाव्यात मुंबईतील मतदार याद्यांमधील प्रचंड घोटाळ्याचा पर्दाफाश करणार आहेत.



दिल्लीमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जसा बोगस मतदारांचा विषय पुराव्यांसह मांडला होता, तसाच प्रकार आदित्य ठाकरे मुंबईत सादर करणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मागील काही महिन्यांत मुंबईतील मतदार याद्यांची स्वतंत्र तपासणी केली असून, त्यात असंख्य विसंगती, डुप्लिकेट आणि बनावट मतदार नोंदी आढळल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत होणा-या महापालिका निवडणुकीआधी हा विषय राजकीयदृष्ट्या मोठा वाद निर्माण करू शकतो.

वरळी डोम येथे सोमवारी सायंकाळी पाच वाजता हा निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, शिवसेनेचे सर्व मुंबईतील पदाधिकारी, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख आणि शाखाप्रमुख उपस्थित राहणार आहेत. आदित्य ठाकरे या कार्यक्रमात मल्टिमीडियाच्या माध्यमातून सादरीकरण करणार असून मुंबईतील मतदार याद्यांमधील त्रुटी आणि बोगस नोंदींचे पुरावे ते दाखवतील, अशी माहिती समोर आली आहे. या सादरीकरणात शिवसेनेच्या तज्ञ टीमने मतदार नोंदणीतील पॅटर्न, अचानक वाढलेले मतदान क्रमांक आणि बाहेरील राज्यातील मतदारांची नावे यांचा तपशील तयार केला आहे. सूत्रांनुसार, हे केवळ मतदार यादीतील चुकाच नाहीत, तर नियोजनबद्ध फेरफार आहेत, असा दावा ठाकरेंच्या गटाकडून केला जाण्याची शक्यता आहे. (पान २ वर)

# मुख्यमंत्री फडणवीस अन् मनोज जरांगे पहिल्यांदाच एका व्यासपीठावर येणार?

**मुंबई/प्रतिनिधी :**मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पहिल्यांदाच एकाच व्यासपीठावर दिसणार असल्याची माहिती समोर आली आहे. २६ ऑक्टोबर रोजी मंगळवेढा येथे होणा-या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा अनावरण सोहळ्याला दोघेही एकाच व्यासपाठीवार येतील. या घडामोडीमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.



मीडिया रिपोर्ट्सनुसार, या भव्य सोहळ्याचं आयोजन भाजप आमदार समाधान अवताडे (पंढरपूर-मंगळवेढा) यांनी केले आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण होणार आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनाही या कार्यक्रमासाठी अधिकृत निमंत्रण दिले असून, तेदेखील उपस्थित राहणार आहेत. मात्र, जरांगे पाटलांनी कार्यक्रमास येणास होकार दिला का, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. (पान २ वर)

# सोन्या-चांदीचे दर कोसळले!

## सोनं 2,000, तर चांदी 4,000 रूपये स्वस्त



**मुंबई/प्रतिनिधी :** देशांतर्गत तसेच जागतिक बाजारात शुक्रवारी सोनं आणि चांदीच्या दरात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. सोनं सुमारे २,००० प्रति १० ग्रॅमने, तर चांदी ४,००० प्रति किलोनं स्वस्त झाली आहे. इंडियन बुलियन अँड ज्वेलरी असोसिएशन (IBJA) च्या आकडेवारीनुसार, २४ कॅरेट सोन्याचा भाव १,२१,५१८ रुपये प्रति १० ग्रॅमवर आला आहे, जो कालच्या तुलनेत सुमारे २,००० ने कमी आहे.

**विविध कॅरेट सोन्याचे दर घटले**

**२३ कॅरेट सोनं:** १,२२,८६० प्रति १० ग्रॅम (१,८०० नं घट)
**२२ कॅरेट सोनं:** १,११,३१० प्रति १० ग्रॅम (१,७०० नं घट)
**१८ कॅरेट सोनं:** ९१,१३९ प्रति १० ग्रॅम
**१४ कॅरेट सोनं:** ७१,०८८ प्रति १० ग्रॅम

**चांदीत मोठी घसरण-** कालच्या तुलनेत चांदीचा दर तब्बल ४,४०० नं घसरुन १,५१,४५० वरुन १,४७,०३३ प्रति किलोवर आला आहे. ही घट केवळ देशांतर्गतच नव्हे, तर आशियाई आणि आंतरराष्ट्रीय बाजारातही दिसली आहे. अनेक महिन्यांच्या विक्रमी वाढीनंतर नफा वसुली सुरू झाल्यामुळे किमती घसरत आहेत.

**जम्मू-काश्मीर राज्यसभा निवडणुक निकाल**

# नॅशनल कॉन्फरन्स 3, तर भाजपचा 1 जागेवर विजय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**जम्मू-काश्मीरमधीलराज्यसभा निवडणुकीचे निकाल आज (२४ ऑक्टोबर) जाहीर झाले. राज्यातील सत्ताधारी



नॅशनल कन्फरन्स (NC) नं ४ पैकी ३ जागा जिंकल्या, तर भारतीय जनता पक्षानं एका जागेवर विजय मिळवला. नॅशनल कान्फरन्सचे उमेदवार चौधरी मोहम्मद रमजान, सज्जाद किचलू आणि शमी ओबेराय यांनी निवडणुकीत विजय मिळवला, तर भाजपचे सत शर्मा यांनी जिंकले.

**कोणाला किती मतं मिळाली?**

चौधरी मो.रमजान (NC) - ५८ मतं
सज्जाद किचलू (NC) - ५७ मतं
गुरु विंदर सिंग उर्फ शम्मी ओबेराय (NC) - ३१ मतं (जम्मू-काश्मीरमधून राज्यसभेत जाणारे पहिले शीख नेते)
सत शर्मा (BJP) - ३२ मतं

ही राज्यसभा निवडणूक अतिशय महत्वाची होती. कारण, कलम ३७० रद्द झाल्यानंतरची पहिली राज्यसभा निवडणूक आहे. ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू-कश्मीरचा विशेष दर्जा संपुष्टात आल्यान्तर आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांत विभाजन झाल्यान्तर, राज्यसभा निवडणुकीकडं सर्वांचं लक्ष लागलं होतं. निवडणूक आयोगानं या चार जागांसाठी तीन वेगवेगळ्या अधिसूचना काढल्या होत्या. दोन जागांसाठी स्वतंत्र निवडणुका, तर दोन जागांसाठी एकत्र निवडणूक घेण्यात आली.







# मानवनिर्मित तलाव ‘वेटलँड’ नाही

**सरन्यायाधीशांच्या निर्णयामुळे विकासाचा मार्ग मोकळा**

**नागपूर/प्रतिनिधी :**नागपूर शहराच्या सौंदर्यात भर घालणारा फुटाळा तलावातील संगीत कारंजी आणि मल्टीपल लेव्हल्ससह पार्किंग प्लाझा या प्रकल्पाला पर्यावरणवादी संघटनांनी विरोध केला होता. हे प्रकरण न्यायालयात गेल्याने प्रकल्पाचे काम ठप्प झाले. सुमारे दीड वर्षांपासून प्रकल्प बंद असल्यामुळे १५ कोटींहून अधिक रुपयांचे नुकसान झाले आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या मंजुरीनंतर आता या प्रकल्पाचे काम पुन्हा सुरू होत असून, त्यासाठी आवश्यक सर्वेक्षण सुरू झाले आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.



महामेट्रोने फुटाळा तलाव परिसरात प्रेक्षक दीर्घा, सिमेंट रस्ता आणि पार्किंग प्लाझा या प्रकल्पांचे काम हाती घेतले आहे. केंद्रीय रस्ता निधी (सीआरएफ) अंतर्गत सुरू झालेल्या या प्रकल्पाची एकूण किंमत सुमारे ११३ कोटी रुपये आहे. प्रकल्पात प्रोजेक्टर रूम विथ व्ह्यूइंग गॅलरी, मल्टीपल लेव्हल पार्किंग प्लाझा आणि सिमेंट रस्ता असे तीन प्रमुख घटक आहेत. मल्टीमीडिया लेझर डिस्प्ले तयार करण्याचे काम नागपूर सुधार प्रन्यासकडे आहे. या प्रकल्पाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्याने काम ठप्प पडले होते. नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडला ३४२ मीटर लांबीच्या मातीच्या बंधाऱ्याचे मजबुतीकरण करण्याचे आदेश देण्यात आले असून, उर्वरित ९५२ मीटरचा खर्च राज्य सरकारने करावा, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. बंधाऱ्याच्या दीर्घकालीन सुरक्षेसाठी जलसंपदा विभागाला १४ एप्रिल २०२६ पर्यंत सविस्तर आराखडा सादर करण्यास (पान २ वर)

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

Name Change

I have change my name Old name was MOHAMMED MUSHFIQUE ABDUL MATIN now my new name is MOHAMMED MUSHFIQUE ABDUL MATEEN.

Address

Masha Allah Manzil, Near Madina Masjid, Khair Mohammad Plot Old City Akola MH - 444002

Passport No. L5136167

# मक्का पिकाला २४०० रुपयांचा भाव द्या

## आदिवासी शेतक-यांची पत्रकार परिषदेत मागणी

*अमरावती/प्रतिनिधी-*

मेळघाटमधील आदिवासी शेतक-यांनी मोठ्या कष्टाने, मेहनतीने कर्ज काढून मक्का पीक घेतले आहे. या पिकांना योग्य भाव मिळत नसल्याने शेतक-यांवर संकट कोसळले आहे. मका पिकाला २४०० रुपयेचा भाव देण्याची मागणी आज शुक्रवार २४ ऑक्टोबर रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये करण्यात आली आहे. आदिवासी शेतक-यांचे म्हणणे आहे की, मेळघाटच्या पायथ्याशी असणा-या जंगलात शेती करणे आणि पीक घेणे फार कठीण असताना आम्ही शेती करीत आहोत. स्वाभिमानाने जगण्याचा प्रामाणिक हा प्रयत्न आहे. दिवस-रात्र एक करून आम्ही मक्का चे पीक घेतले. मागील वर्षी मकाला चांगले भाव मिळाले होते ,पण यंदा शेतमालाला कवडीमोल भाव मिळत आहे. मका पिकाला १००० ते १२०० क्विंटलचा भाव आहे. या मध्ये उत्पादन खर्च निघणे ही मुश्कील झाले आहे. व्यापारी शेतक-यांची लूट करत आहे. यामुळे मका खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी अन्नपुरवठा विभागाने निर्णय काढणे आवश्यक आहे. शासन व्यापारी वर्गाला मदत करीत आहे ,जर शासनाने मका खरेदी केंद्र सुरू केले तर आदिवासी बांधव आपला मका आदिवासी विकास मंडळात विकू शकतात. त्यामुळे त्यांची लूट थांबू शकते. परंतु शासन प्रशासन जमिनीवर उतरून समस्याचे गांभीर्य समजून घेण्याचे टाळत आहे. आदिवासी बांधवांची गरिबी दूर करण्याचा प्रयत्न शासनाने केला तर ही संधी त्यांना मिळू शकते. गेल्या दहा दिवसापासून नव्हे तर गेल्या दोन महिन्यापासून आम्ही मका पिकाला चांगले भाव मिळाले पाहिजे म्हणून प्रशासनाला कळविले आहे. परंतु स्थानिक प्रशासनाने कोणतीही दखल अजून पर्यंत घेतलेली नाही. मेळघाट आणि आजूबाजूच्या क्षेत्रात मका पेरल्याचे दिसत आहे. शासनाने यासाठी योग्य पाउल उचलावे अशी मागणी करण्यात येत आहे. पत्रकार परिषदमध्ये रामबाबू दहीकर, रामदास भिलावेकर, अविनाश बेलसरे, ओंकार कास्देकर, करण दारसिंबे, एड. दशरथ बावनकर, एड बंड्या साने आदि उपस्थित होते.




# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा यवतमाळ दौरा रविवारी

## विविध विकासकामांचा घेणार आढावा, पदाधिकारी मेळाव्यास उपस्थिती

**यवतमाळ** - राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा रविवारी, दि. २६ ऑक्टोबर रोजी यवतमाळ दौरा निश्चित झाला असून या दौ-यात ते जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक होणार असून, प्रशासनाच्या कामकाजाचा आढावा घेत विकास योजना गतीमान करण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना दिल्या जाणार आहेत.दौ-याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांचे रविवारी दुपारी ३.३० वाजता पोलीस कवायत मैदान, हेलिपॅड, यवतमाळ येथे आगमन होईल. त्यानंतर दुपारी ३.३५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्ह्यातील विविध विकासकामांच्या आढावा बैठकीस ते उपस्थित राहतील.



या बैठकीत जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी तसेच जनप्रतिनिधी सहभागी होणार आहेत. यानंतर सायंकाळी ४.१५ वाजता उपमुख्यमंत्री शिंदे द व्हेनेशियन हाटेलाक डे प्रयाण करतील. येथे पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत शिवसेवा पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला असून, शिंदे कार्यकर्त्यांशी संवाद साधून आगामी विकास योजनांबाबत मार्गदर्शन करणार आहेत.सायंकाळी ७.०० वाजता ते मोटारीने नागपूर विमानतळाकडे प्रयाण करतील. त्यांच्या या दौ-यामुळे जिल्ह्यातील प्रशासन आणि शिवसेना पदाधिकारी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# दिवाळीत आनंदाचा शिधा गेला दूर, ज्वारी तरी चांगली द्या साहेब!

**पांढरकवडा** : दिवाळीच्या तोंडावर नागरिकांना आनंदाचा शिधा वाटप होईल, अशी अपेक्षा होती. परंतु अद्यापपर्यंत शिधा वितरण न झाल्याने सर्वसामान्यांत नाराजी व्यक्तहोत आहे. त्यातच शासनाने पुरविलेल्या ज्वारीची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.'आनंदाचा शिधा तर दूर, ज्वारी तरी चांगली द्या साहेब!' असा संतप्त स्वर सर्वसामान्यांमधून उमटत असून, गरीब कुटुंबांना दरवर्षी दिला जाणारा दिवाळी शिधा या वर्षी मिळणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

किराणा दुकानांत आणि शिधा केंद्रांवर नागरिकांची गर्दी दिसत असली तरी अधिकारी वर्गाकडून स्पष्ट माहिती दिली जात नसल्याचे दिसते. दरम्यान, शासनाकडून मिळणा-या धान्याच्या निकृष्ट गुणवत्तेमुळे लोकांचा संताप अधिक वाढला आहे.गरिब जनतेला दिवाळीत थोडासा दिलासा मिळावा, हीच त्यांची अपेक्षा आहे. मात्र, आनंदाचा शिधा अद्यापही कागदावरच असल्याने प्रशासनावरील नाराजी वाढत आहे.

# शहा फडणविसांविरोधात, त्यांचेही फोन टॅप होत असतील-राऊतांचा आरोप

**मुंबई/प्रतिनिधी** : सगळ्यांचे फोन सर्वेलन्सवर टाकले आहेत. गुरुपवर तुम्ही कोणाशी काय बोलता, संवाद होतो यावर लक्ष आहे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेयांच्या या विधानामुळे दिवाळीत नंतर ब?म्ब फुटला असून आता त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. याच मुद्यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी भाजपवर व राज्यातील सरकारवर टीकास्त्र सोडले. हे राष्ट्रद्रोही कृत्य आहे, अजित पवार, शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, मी, यांच्यासह अनेक लोक या रडारवर आहेत असे म्हणतानाच राउत यांनी आणखी एक खळबळजनक आरोप केला.



देशाचे गृहमंत्री, अमित शहा हे फडणवीसांच्या विरोधात आहेत, त्यामुळे शहा यांचाही फोन टॅप होत असेल असा आरोप करत या लोकांचा काही भारोसा नाही अशी खोचक टीका राउत यांनी केली. आम्ही फोन टॅप करतोय हे, चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे स्पष्ट शब्दांत मान्य केले आहे. याआधी २०१९ साली आमचे सरकार येत असताना हे प्रकार उघड झाले. सरकारने गुन्हे दाखल केले. देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या तेव्हाच्या पोलिस महासंचालक या सूत्रधार होत्या, गुन्हे दाखल झाले.(टॅपिंगचा) हा अटकेचा आणि कठोर शिक्षा देण्याचा गुन्हा आहे. म्हणून तर त्यांना सारखी भीती वाटत होती की मला पकडले जाईल. ते जे बोलत होतो ना मला अटक केली जाईल, हीच भीती होती. आता हा गुन्हा गंभीर आहे असे जर देवेंद्र फडणवीस, गृहमंर्त्यांना वाटत असेल तर त्यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांना तत्काळ बरखास्त करून, गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली पाहिजे. विरोधी पक्षांचे, स्वतः:च्या कार्यकर्त्यांचे, सहकारी पक्षांच्या लोकांचे फोन टॅप करणे हा कायदेशीर गुन्हा आहे आणि त्यासाठी कायद्यामध्ये कठोर तरतूद घटनेने केली आहे.

**तेव्हाही फोन टॅप होत होते-**जर खुद्द महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे सांगत असतील की आम्ही आजही फोन टॅप करतो म्हणजे, तेव्हाही (२०१९ साली) फोन टॅप होत होते, त्यावेळी आमचे बोलणे ऐकत जात होते असा आरोप राउतांनी केला. या फोन टॅपिंगच्या रडारवर कोण कोण आहे, असा सवाल राउत यांना विचारण्यात आला. तेव्हा त्यांनी थेट उत्तर दिले, पत्रकारसुद्धा रडारवर आहेत. जे फडणवीस गटाचे लोक नाहीत ते रडावर आहे, मिंध्यांचे (शिंदे गट) बहुतेक लोक आहेत, माझ्या माहितीप्रमाणे, स्वतः अजित पवारही रडावर आहेत असा खळबळजनक आरोप राउतांनी केला.शरद पवार असोत, उद्धव ठाकरे, राज ठाकरे असतील, मी असेन, कॉंग्रेसची लोकं असतील, सर्वांवर व्हिजीलन्स चालू आहे. या महाराष्ट्रात कोणत्या प्रकारची सेन्स?रशिप लावली आहे? हे फक्त आम्ही बोलत नाही आहोत, पण जर स्वतः राज्याचे महसूल मंत्री ( फोन टॅपिंगबद्दल) हे सांगत असतील, देशाच्या गृहमंत्र्यांनी राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली देखील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे अशी मागणी राउत यांनी केली. हा अतिशय गंभीर गुन्हा आहे, काय सांगाव ते अमित शह यांचेही फोन टॅप करत असतील, असा आरोपही राउत यांनी केला. कारण अमित शहा हे फडणवीसांच्या विरोधात आहेत, त्यांचा काही भरोसा नाही. अशा प्रकारची यंत्रणा वापरली जात असेल तर ते अत्यंत राष्ट्रद्रोही कृत्य आहे अशा शब्दात राउतांनी टीकास्त्र सोडले.

# 112 औषधे गुणवत्ता तपासणीत अपयशी

**नवी दिल्ली** : देशातील औषधांच्या गुणवत्तेबाबत सरकारने धक्कादायक माहिती उघड केली असून सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या तपासणीत ११२ औषधांचे नमुने गुणवत्ता चाचणीत अपयशी ठरले. याचा अर्थ असा की, ही औषधे रुग्णांना बरे करण्याऐवजी नुकसान पोहोचवू शकतात. या ११२ नमुन्यांपैकी ५२ नमुने केंद्रीय औषध प्रयोगशाळेने



तपासले होते, तर ६० नमुने राज्य प्रयोगशाळांनी मानक दर्जाचे (एनएसक्यू) नसल्याचे आढळून आले. छत्तीसगडमधील एका औषधाचा नमुनाही बनावट असल्याचे आढळून आले. आरोग्य मंत्रालयाने अहवाल प्रसिद्ध केला. एका अधिका-याने सांगितले की, औषधांच्या गुणवत्तेची तपासणी दरमहा केली जाते. सप्टेंबरमध्ये अनेक शहरांमधून औषधांचे नमुने गोळा करण्यात आले. चाचण्यांमध्ये असे दिसून आले की, ११२ औषधे एक किंवा अधिक गुणवत्ता मापदंडांमध्ये अपयशी ठरली, जसे की सक्रिय घटकाची योग्य मात्रा गहाळ होणे किंवा इतर काही कमतरता असणे. अधिका-यांनी सांगितले की, ही समस्या फक्त चाचणी केलेल्या बॅचेसमध्ये आहे. याचा अर्थ असा नाही की कंपनीची इतर औषधे देखील सदोष आहेत. याचा परिणाम सध्या बाजारात असलेल्या इतर औषधांवर होत नाही, ज्यामध्ये अनेक मोठ्या कंपन्यांची औषधे देखील समाविष्ट आहेत. छत्तीसगडमध्ये आढळलेले बनावट औषध एका विनापरवाना कंपनीने बनवले होते, ज्याने दुस-या कंपनीचे ब्रँड नाव वापरले होते. आरोग्य मंत्रालयाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे आणि चौकशी सुरू केली आहे.

पान १ व १० वरून

## पीएसआयच्या छळापाई

आहे. पीएसआय गोपाल बदनेने चारवेळा बलात्कार केल्याचे या महिलेने हातावर नमूद केले आहे. आपल्यावर बलात्कार झाला असे मृत ड?क्टरच्या असा मजकूर लिहिलेला आढळला आहे. माझ्या मरण्याचे कारण ढरक गोपाल आहे. त्याने माझा चार वेळा बलात्कार केला आणि प्रशांत बनकर यांनी मला ४ महिने शारीरिक आणि मानसिक त्रास दिला असे या महिला ड?क्टरच्या हातावर लिहिल्याचे आढळून आले आहे.

**कठोर कारवाई केली जाईल : पालकमंत्री देसाई**

मला आतापर्यंत या घटनेचे अधिकृत कारण अधिका-यांकडून कळलेले नाही. मी पोलिस अधिक्षकांशी बोललो आहे की, तुम्ही प्रत्यक्ष घटनास्थळी जा. तेथे सुसाईड नोट वगैरे काही आढळली असेल तर ते अत्यंत खेदजनक आहे. या प्रकरणात खोलवर तपास करू . या प्रकरणातील सर्व पुरावे गोळे करू . मुलीच्या नातेवाईकांशी संपर्क साधून त्यांचा अजून कोणावर संशय असेल तर त्यांची देखील माहिती घेउ. या घटनेत जो कोणी दोषी असेल तरी त्याला सोडले जाणार नाही. या प्रकरणात कठोर कारवाई केली जाईल अशी प्रतिक्रिया साता-याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

**अतिशय गंभीर आणि दुर्दैवी घटना : अंधारे**

ही घटना धक्कादायक म्हणण्यापेक्षा अतिशय गंभीर आणि दुर्दैवी आहे. एखाद्या व्यक्तीला इतके ट?र्चर केले जात आहे आणि तीन महिन्यांपासून कोणतीच मदत उपलब्ध होत नाही. मदत उपलब्ध झाली असती तर, जे अघटीत पाउल ड?क्टर तरुणीने उचलले आहे, ते उचलले गेले नसते. आत्महत्या हा काही पर्याय असू शकत नाही.. हे आपल्यासाठी म्हणणे सोपे आहे आणि तो असू ही शकत नाही हे देखील बरोबर आहे असे सुषमा अंधारे म्हणाल्या.

**तपास सुरू आहे : चाकणकर**

सातारा येथील ड?. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येनंतर अनेक मोठ-मोठे खुलासे होत आहेत. आता महिला ड?क्टर आत्महत्या प्रकरणाची राज्य महिला आयोयाकडून दखल घेण्यात आली असून वक्तव्य राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकरणकर यांनी याप्रकरणी धक्कादायक खुलासे केले आहेत. दोन्ही आरोपींबद्दल त्यांनी मोठे सत्य सांगितले आहे. शिवाय ड?क्टर महिला आणि पोलिसांनी एकमेकांविरोधात यापूर्वी तक्रार दाखल केल्याची माहिती देखील समोर येत आहे. तर पुढील तपास सुरु आहे असे रुपाली चाकणकर यांनी सांगितले आहे.

**पीएसआय गोपाल बदने फरार; महिला आयोगाने घेतली दखल**

सातारा जिल्ह्यातील फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या महिला डाक्टरने पोलीस उपनिरिक्षकावर लैंगिक अत्याचाराचे आरोप करत आत्महत्या केली आहे. यामुळे राज्यात खळबळ उडाली असून महिला आयोगानेही याची दखल घेतली आहे. दोन महिन्यांपूर्वी खासदारांच्या दोन पीएंचा उल्लेख असणारे पत्र महिला डााक्टरनेपोलिसांना दिले होते. या तक्रारीचे काय झाले, असाही सवाल महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी केला आहे. दरम्यान संशयित आरोपी बदने व त्याच्या साथीदार बनकर हे दोघेही फरार असल्याचे समोर येत आहे. महिला डाक्टरने आत्महत्येपूर्वी हातावरच एक चिठ्ठी लिहिली होती. यात ग्रामीण पोलीस ठाण्याचा पीएसआय गोपाल बदने आणि अन्य एका व्यक्तीचे नाव लिहिले होते. सुरुवातीला हा पोलीसच असल्याचे यात म्हटले होते. परंतू, तो पोलीस नसल्याचे आता प्रशासन सांगत आहे. प्रशांत बनकर याचे त्यात नाव असून त्याने मानसिक आणि शारिरीक त्रास दिल्याचे या ड?क्टरने हातावर लिहिले होते. पीडित महिलेने याआधी त्यांना होणा-या त्रासाबाबत तक्रार केली असल्यास त्यांना मदत का मिळाली नाही, याचीही चौकशी व्हावी आणि संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशा सूचना आयोगाने पोलिसांना दिल्या आहेत, असे महिला आयोगाने एक्स अकाउंटवर म्हटले आहे. याचबरोबर मयत डाक्टर यांचे शव विच्छेदनसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. फरार आरोपींचा तातडीने शोध घेउन संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करावा असे निर्देश आयोगाने पोलीस अधीक्षक, सातारा यांना दिले आहेत.

दोन्ही आरोपी फरार असून त्यांच्याविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्या तपासासाठी दोन पथके तयार करण्यात आली असल्याची माहिती चाकणकर यांनी दिली आहे. समाजाच्या रक्षकानेच असे कृत्य करावे हे अत्यंत दुर्दैवी आहे. आरोपींवर कठोर करावाई होण्यासाठी आम्ही पाठपुरावा करणार असल्याचे चाकणकर म्हणाल्या.

## आदित्य ठाकरेही फोडणार

**तर निवडणुकीचा अर्थ नाही : आदित्य ठाकरे**

शिवसेनेने गेल्या काही महिन्यांपासून मतदार यादीतील घोटाळ्याचा मुद्दा सातत्याने पुढे आणला आहे. आदित्य ठाकरे यांनी यापूर्वीही अनेकदा निवडणूक आयोगाकडे तक्रारी दाखल करून मतदार नोंदणीची पारदर्शकता मागितली होती. मतदार यादीच दोषपूर्ण असेल तर निवडणुकीला अर्थ उरत नाही, असे ठाकरेंचे मत आहे. विधानसभा निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर बाहेरील मतदारांना याद्यांमध्ये समाविष्ट करण्यात आले, असा गंभीर आरोप ठाकरेंच्या शिवसेनेने यापूर्वी केला होता. त्यांच्या मते, बिहार, उत्तर प्रदेशसारख्या राज्यांतील मतदारांची नावे याद्यांमध्ये आढळतात, तर स्थानिक रहिवाशांची नावे गायब आहेत, ही स्थिती लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचवणारी आहे. ठाकरेंच्या गटाने निवडणूक आयोगाला वारंवार निवेदन दिले असले तरी अजून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

**बिहारसारखा नमुना दाखवणार-**

शिवसेना ठाकरे गटाने बिहारच्या निवडणुकीतील मतदार यादीचे उदाहरणही पुढे केले आहे. बिहारमध्ये मतदार यादीची छाननी केल्यानंतर जवळपास ४८ लाख बोगस मतदार वगळले गेले होते. त्याच धर्तीवर मुंबईतील मतदार याद्या तपासल्यास किती मोठ्या प्रमाणावर डुप्लिकेट किंवा मृत व्यक्तींची नावे नोंदवली गेली आहेत, हे आदित्य ठाकरे सोमवारी सादरीकरणात दाखवणार आहेत. तसेच, भविष्यात होणा-या महापालिका निवडणुकीत बोगस मतदान होउ नये म्हणून काय खबरदारी घ्यावी, याबद्दल मार्गदर्शनही ते करणार आहेत. मतदार याद्यांची पारदर्शकता वाढवण्यासाठी स्थानिक नागरिकांनी स्वतः पुढाकार घेउन आपल्या मतदार नोंदी तपासाव्यात, अशी विनंती ते करणार असल्याची शक्यता आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस अन् मनोज

**मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर विशेष महत्त्व**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून गेल्या काही महिन्यांत जरांगे पाटलांच्या नेतृत्वात राज्यात तीव्र आंदोलन झाले. त्यांनी अनेकवेळा देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधातही वक्तव्ये केली. या सर्व घडामोडीमुळे राज्यातील वातावरण चांगलेच तापले होते. या पार्श्वभूमीवर हा सोहळा महत्वाचा मानला जातोय. आता या कार्यक्रमाला जरांगे पाटील येणार का, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. जरांगे पाटील या कार्यक्रमाला आले, तर ही मोठी घडामोड असेल.

## मानवनिर्मित तलाव

सांगण्यात आले आहे. त्याचा खर्च एनएमआरसीएल, नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास यांच्याकडून वसूल करण्यास राज्य सरकारला परवानगी देण्यात आली आहे. दुस-या बाजूला, फुटाळा तलाव परिसरातील फाउंटेन शो, तरंगते रेस्टारंट, बॅन्क्वेट हॉल आणि व्ह्यूइंग गॅलरीच्या उभारणीविरोधात स्वच्छ असोसिएशन या नागपूरस्थित एनजीओने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांनी तलावाला पाणतळ स्थळ म्हणून घोषित करण्याची मागणी केली होती. मात्र सरन्यायाधीश भूषण गवई, न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारीया यांच्या पीठाने ही याचिका फेटाळली. तलाव हा मानवनिर्मित जलाशय असल्याने तो पाणतळ स्थळ म्हणून ओळखला जाउ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे येथे तात्पुरत्या स्वरूपातील पर्यटक सुविधा उभारण्यास कायदेशीर अडथळा उरलेला नाही. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले की, मानवी कृती जर पर्यावरणाशी सुसंगत असतील, तर त्या कायद्याच्या चौकटीत राहून प्रोत्साहित केल्या पाहिजेत. तसेच, सार्वजनिक ट्रस्ट तत्त्वज्ञान हे नैसर्गिक तसेच मानवनिर्मित संसाधनांवरही लागू होत असल्याने, प्रशासन आणि नागरिक या दोघांचीही जबाबदारी आहे की त्यांनी निरोगी पर्यावरण टिकवण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

## श्रद्धा वालकरवर अजूनही

याचा तपास केला आणि अखेर आफताबला अटक झाली. आता तीन वर्षे झाली तरी श्रद्धा वालकरवर अंत्यसंस्कार करण्यात आलेले नाही. याचीच दखल घेत न्यायालयाने सर्व पक्षांना आवश्यक साहित्यासह नियोजित तारखांना उपस्थित राहण्याचे निर्देश दिले जेणेकरून हा खटला जलदगतीने पुढे नेता येईल.श्रद्धाची तिच्या लिव्ह-इन पार्टनर आफताब अमीन पूनवालाने १८ मे २०२२ रोजी दिल्लीतील मेहरौली येथे हत्या केल्याचा आरोप आहे. साकेत न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश (पीटीसी) हरगुरविंदर सिंग जग्गी यांनी १७ ऑक्टोबर रोजी याबाबत आदेश दिला आहे. आदेशानुसार, प्रकरणाची संवेदनशीलता आणि मृत/पीडितेवर अद्याप अंत्यसंस्कार झालेले नाहीत हे लक्षात घेउन न्यायालयाने सर्व पक्षांना नियोजित तारखांना उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने ११, १२, १४ आणि १५ नोव्हेंबर दुपारी २ वाजता या खटल्याची सुनावणी होणार असल्याचं म्हटलं आहे. आरोपीने न्यायाधीशांसमोर कबूल केलं की त्याने रागाच्या भरात श्रद्धाची हत्या केली होती. दिल्लीच्या साकेट कोर्टात झालेल्या सुनावणीदरम्यान आफताबने न्यायाधीशांना सांगितलं की, 'मी जे काही केलं ते रागाच्या भरात केलं आहे.' या घटनेने सर्वांनाच मोठा धक्का बसला होता.

## अवघ्या पाच तासांत

अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, तसेच अचलपूर उपविभागाचे सहायक पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुरेश म्हस्के, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय अत्राम, पो.हे.कॉ. सचिन होले, सुधीर राऊत, पो.कॉ. विवेक ठाकरे, घनश्याम किरोले, शुभम शर्मा, जितेश बाबील, सचिन कोकणे, विराज काकुर आणि पियुष वानखडे यांनी केली.

## अनैतिक संबंधातून कृषी

आणि तपास सुरू केला. या दरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की विनोद राऊत गुरुवारी सकाळी घरून लोन केसच्या कामाकरिता अमरावती येथे जातो असे सांगून निघाले होते. मात्र अचानक सायंकाळी त्याचा मृतदेह आढळला. पोलिसांना तपासादरम्यान माहिती मिळाली की विनोद राऊत यांचे कृषी कार्यालयातील गार्डच्या पत्नीसोबत अनैतिक संबंध होते. या संबंधाबाबत पती धनराज वानखडे याला माहिती पडल्याने त्याच्या मनामध्ये विनोद राऊत यांच्या विषयी द्वेष निर्माण झाला होता. याद्वेष भावनेतून धनराज वानखडे यांनी विनोद राऊत यांची चांदूरबाजार रोड येथील तालुका कृषी कार्यालय परिसरात हत्या केली असावी. या संशयावरून पोलिसांनी आरोपी धनराज सुखदेव वानखडे याला ताब्यात घेतले.चौकशीमध्ये त्याने खून केल्याची कबुली दिली. विनोद राऊत यांचा मुलगा तेजस राऊत याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात मोर्शी येथील उपनिरीक्षक शिवराज पवार, आकाश शिवणकर, अमंलदार छत्रपती करपते, स्वप्निल बायस्कर ,अथर्व कोहळे यांनी केली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक राहुल गवई करत आहे.

## कोंडेश्वर रोडवरील जंगलात

पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कलम ६५ (क), (फ), (ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई शहरातील अवैध धंद्यांवर अंकुश घालण्यासाठी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या निर्देशानुसार पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, श्याम घुगे, तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अंमलदार दिपक सुंदरकर, जहीर शेख, अतूल संभे, संग्राम भोजने, सुरज चव्हाण, चेतन कराळे आणि संदीप खंडारे यांनी केली.

## कवंर नगर हिट अँड

करून या मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा सुगावा प्राप्त केला आणि आरोपी रोहित नंदागवळी याला ताब्यात घेतले. राजापेठ पोलीस ठाण्याचे निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात पीएसआय हिवारे,हेड कॉन्स्टेबल मनीष करपे, रवी लिखितकर ,पंकज खते, सागर भजगवरे, अर्जुन कदम यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला. आरोपी नशेमध्ये असल्याची माहिती पण समोर आली आहे. त्याने आणखीन काही वाहनांना धडक दिल्याचेही समोर येत आहे.

## ठेवीदार शिक्षण व

केलेल्या ठेवींचे निराकरण करणे तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासंबंधी मार्गदर्शन शिबिरात करण्यात आले. वित्तीय सेवा विभाग आणि राज्यस्तरीय बँकर्स समिती यांच्या निर्देशानुसार हे शिबिर घेण्यात आले.

ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत नामनिर्देशित, लाभार्थी या शिबिरास उपस्थित होते. शिबिराचे प्रास्ताविक सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय प्रबंधक सुनील पांडेय यांनी केले. संचालन नरेश हेडाऊ जिल्हा व्यवस्थापक अग्रणी बँक यांनी तर आभार लीड बँकेचे रोहन पोंक्षे यांनी केले.

## लैंगिक अत्याचारपिडितेने दिला

घटनेनंतर पीडितेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. पीडितेच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी आरोपी राहुल पिसे याच्याविरुद्ध अल्पवयीन मुलीवर अत्याचार व लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## शेतकरी व बैलजोडीच्या

नाही, असा गंभीर आरोप फिर्यादीने केला आहे. या निष्काळजीपणामुळे एका शेतकऱ्याचा आणि दोन निरपराध जनावरांचा जीव गेला. त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी फिर्यादीच्या जबाबावरून लाईनमनविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## दिवाळीत बाहेर गावी

आणि सुरक्षित दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न करावा. तसेच घराच्या सुरक्षिततेसाठी आणि सणाच्या काळात गैरप्रकार टाळण्यासाठी पोलिस सूचना काटेकोरपणे पाळाव्यात.या काळात सावध आणि सजग राहणे गरजेचे असल्याचे ठाणेदार सुनिल वानखडे यांनी आवाहन केले आहे, जेणेकरून सर्वजण आनंदाने आणि सुरक्षितपणे दिवाळी उत्सव साजरा करू शकतील. बाहेरगावी फिरण्यासाठी व नातेवाईकांकडे जात असताना आपल्या घराची जबाबदारी शेजाऱ्यांना सांगावी तसेच एक रीतसर पोलिस स्टेशनला सुद्धा कळवावे जेणेकरून घरामधील घडणाऱ्या अनुचित प्रकारच्या घटना चोरी याला आळा बसेल. त्यासाठी शहरातील नागरिकांनी जागृत असणे महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले. यासह मौल्यवान वस्तू दागिने पैसे व महागड्या वस्तू यांची सुरक्षितता राखावी असे दिवाळी सणावर समाज हितार्थ आवाहन ठाणेदार सुनिल वानखडे यांनी नागरिकांना केले आहे.

## राहुल लांजेवार शिवसेना

त्यांनी अनेकदा राजकिय व सामाजिक क्षेत्रात महत्वाची भुमिका बजावली आहे.अधिवेशन स्थळी मुंबई, नागपूर, अमरावती,पुणे अशा अनेक ठिकाणी कार्यरत होते.त्यामुळे त्यांना शिवसेना (शिंदे गट)मध्यवर्ती कार्यालय मध्ये पद नियुक्ती पत्र देण्यात आले.वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते ना.एकनाथ शिंदे (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या प्रभारी विधानसभा संघटक पदी (कार्यक्षेत्र -तिवसा विधानसभा) नियुक्ती करण्यात आली.यावेळी शाम देशमुख (शिवसेना शिंदे गट सहसंपर्कप्रमुख) , आशिष धर्माळे (जिल्हा प्रमुख शिवसेना शिंदे गट ) यांच्यासह अनेक पदाधिकारी यांच्या उपस्थितीत राहुल लांजेवार यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

## ३५ गोवंशाला मिळाले

पोलिसांनी गोवंशला ताब्यात घेऊन त्यांना गोरक्षण संस्थेच्या स्वाधीन केले. पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पीएसआय सुषमा मांडवकर व त्यांच्या पथकाने पेट्रोलिंग दरम्यान ही कार्यवाही केली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २५ ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा बहुमान श्री शिवाजी महाविद्यालयास

### उद्घाटक चंद्रकांतदादा पाटील तर स्वागताध्यक्ष राहणार श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख

■ प्रतिनिधी | अकोला ■

**श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचालित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला व मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ४ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४८ राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आले असून यात उद्घाटक म्हणून चंद्रकांतदादा पाटील तर स्वागताध्यक्ष राहणार म्हणून श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख उपस्थित राहणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.**



श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित या पत्रकार परिषदेत यावेळीमराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ विलास खंदारे, कार्यवाह खजिनदार डॉ.मारोती तेगमपुरे, महाविद्यालयाचे प्राचार्य व परिषदचे स्थानिक कार्याध्यक्ष डॉ रामेश्वर भिसे, आयक्युएसी समन्वयक डॉ. आशीष राऊत आदी उपस्थित होते.या आधी परिषदेचे दहावे अधिवेशन २५,२६ व २७ ऑक?टोंबर १९८६ रोजी तर ७,८ व ९ नो०?हेंबर २०१४ रोजी ३८ वे अधिवेशनाचे यशस्वी आयोजन शिवाजी महाविद्यालयात करण्यात आले होते. ह्यावर्षी पण या ४८ व्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनाचा मान पुनः एकदा श्री शिवाजी महाविद्यालयाला देण्यात आला आहे. यात स्वागताध्यक्ष म्हणून श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख व उद्घाटक म्हणून चंद्रकांतदादा पाटील उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमा चे अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ विलास खंदारे राहणार आहेत. परिषदेच्या तीन दिवसीय अधिवेशना दरम्यान अनेक विषयावर मंथन होणार आहे.यात धोके व परताव्याचे सिद्धांत, डॉ. मनमोहन सिंह यांचे अर्थशास्त्रीय विचार आणि, महाराष्ट्रातील व्यसनाधीनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू या विषयावर विचारमंथन होणार आहे. या तीनही चर्चासत्रात आलेल्या शोधनिबंधाचे प्रकाशन व वाचन केले जाणार आहे. तसेच परिषदेच्या अध्यक्षांच्या वतीने ऐनवेळीच्या विषयावरील चर्चेसाठी 'अमेरिकेचे प्रशुल्क धोरण : भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने व संधी' या विषयावर चर्चा घडवून आणली जाणार आहे. सदर परिषदेला महाराष्ट्रभरातून अर्थशास्त्रातील प्राध्यापकांची मोठ्या संख्येने ३ दिवस उपस्थिती असणार आहे. अधिवेशन दरम्यान होणाऱ्या व्याख्यान, चर्चासत्र, परिसंवाद निवास व्यवस्था बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. या परिषदेचा संबंधितांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.


## घराला कुलूप असल्याचे पाहून चोरट्यांनी केली घरफोडी

### साईलीलानगरातील घरातून सव्वा लाखाचा ऐवज लंपास

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील साईलीला नगर परिसरात दिवाळीच्या सुट्टीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत सोनं, चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण सव्वा लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना २३ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली.

या प्रकरणी कुलभूषण लक्ष्मणराव एकाडे (रा. साईलीला नगर, काकडदाती रोड, वाशिम) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून वाशिम पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी कुलभूषण एकाडे हे कुत्र्यांच्या खाद्य विक्रीचे दुकान चालवतात. दिवाळी सुट्टीमुळे त्यांचा भाऊ विक्रांत एकाडे आपल्या कुटुंबासह मामाच्या गावी मंगरुळपीर येथे गेला होता. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता कुलभूषण नेहमीप्रमाणे दुकानावर गेले. दुपारी जेवणासाठी एक वाजता घरी परतल्यावर त्यांना घराचे कुलूप तोडलेले आढळले. घरात प्रवेश केल्यावर संपूर्ण साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. वरच्या मजल्यावरील आलमारीचे कुलूप तोडून सोन्याचे अंदाजे एक तोळ्याचे मंगळसूत्र (किंमत सुमारे १,१०,०००), चांदीचे ब्रॅसलेट व अंगठी



(५,०००) तसेच १०,००० रोख रक्कम असा एकूण १,२५,००० किमतीचा ऐवज चोरीस गेला असल्याचे लक्षात आले. घटनेची माहिती मिळताच वाशिम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या घटनेचा पुढील तपास एएसआय क्रमांक ६९४ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून चोरट्यांचा शोध सुरु आहे.

## काकाकडून पुतणीवर चाकूने हल्ला : किरकोळ कारणावरून घडली घटना

■ प्रतिनिधी | रिसोड ■

बकऱ्याच्या कोठ्यावर मेनकापड टाकल्याच्या किरकोळ कारणावरून काकाने पुतणीवर चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना रिसोड तालुक्यातील भरजहागीर येथे घडली. ही घटना २३ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास घडली असून या प्रकरणी रिसोड पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी दिपाली ज्ञानेश्वर मानवतकर (रा. अंढेरा, ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) या भाऊबीज निमित्त माहेर भरजहागीर येथे आल्या होत्या. त्यांच्या शेजारीच त्यांचे काका अर्जुन बाबुराव घोडके राहतात. ते दारूचे व्यसनाधीन असून त्यांचे वडील महादेव बाबुराव घोडके यांच्याशी नेहमी वाद होत असतात. घटनेच्या दिवशी ढगाळ वातावरण असल्याने महादेव घोडके यांनी बकऱ्याच्या कोठ्यावर मेनकापड टाकले. यावरून काका अर्जुन घोडके यांनी वाद घालत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी दिपाली यांनी काकांना शिवीगाळ का करता असा जाब विचारला असता, संतापलेल्या अर्जुन घोडके यांनी घरात जाऊन चाकू आणला आणि दिपालीच्या हातावर वार केला.

ही घटना पाहून घरातील सदस्य व शेजाऱ्यांनी मध्यस्थी करून भांडण सोडविले. जखमी दिपाली यांना तातडीने रिसोड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी रिसोड पोलिसांनी आरोपी अर्जुन बाबुराव घोडके याच्याविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ११८(१), ३५२, ३५१(३) अन्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## लाडकी बहीण योजनेतील ई-केवायसी प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती

### आगामी निवडणुका लक्षात घेऊन सरकारचा निर्णय

■ प्रतिनिधी | वाशिम ■

लोकप्रिय असलेल्या लाडकी बहीण योजनेतील ई-केवायसी प्रक्रिया सरकारने अखेर तात्पुरती स्थगित केली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महिलावर्गाची नाराजी टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे समजते. या निर्णयामुळे महिलांना ऑटोबर महिन्याचा हप्ता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, लाभार्थी महिलांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

गेल्या वर्षी सुरू झालेल्या लाडकी बहीण योजनेने राज्यातील महिलांपर्यंत थेट आर्थिक मदत पोहोचवून महायुती सरकारसाठी मोठा राजकीय फायदा मिळवून दिला होता. विशेषतः विधानसभा निवडणुकीदरम्यान या योजनेने सरकारसाठी गेमचेंजर ठरल्याचे मानले जाते. मात्र, अलीकडेच राज्याच्या आर्थिक ताणाचा विचार करून सरकारने कठोर भूमिका घेत महिलांसाठी ई-केवायसी प्रक्रिया सक्तीची केली. त्यामुळे अनेक महिलांना हप्ता मिळण्यात अडथळे आले आणि नाराजी निर्माण झाली होती. महिलांमधील असंतोष वाढत असल्याचे लक्षात घेऊन सरकारने ई-केवायसी प्रक्रियेला तात्पुरती



स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ऑटोबर महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता लवकरच पात्र महिलांच्या खात्यात जमा होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

ऑगस्ट २०२५ पर्यंत १४ हप्त्यांचे वितरण पूर्ण झाले असून, सप्टेंबरसाठीचा निधीही उपलब्ध झाल्याने योजनेचा वेग पुन्हा वाढण्याची शयता आहे. ऑटोबर २०२४ पर्यंत र महिलांनी या योजनेसाठी अर्ज केले होते. ग्रामीण व शहरी भागात महिलांना थेट आर्थिक मदतीचा फायदा पोहोचविणारी ही योजना महाराष्ट्रात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आधारस्तंभ ठरली आहे. दरम्यान, लाभार्थ्यांच्या पात्रतेची पडताळणी करताना शासनाने काही महिलांना योजनेतून वगळले आहे. यामध्ये चारचाकी वाहनधारक महिला, केंद्र-राज्य शासनाच्या अन्य योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी, शासकीय सेवेतील कर्मचारी, एकाच कुटुंबातील अनेक लाभार्थी भगिनी, तसेच वयाची चुकीची नोंद किंवा निकषांचे उल्लंघन करणाऱ्या महिला यांचा समावेश आहे.ई-केवायसी प्रक्रिया थांबवण्याच्या निर्णयानंतर अनेक महिलांनी सरकारचे आभार मानले आहेत. कागदपत्रे आणि पडताळणीच्या ताणामुळे हप्ता मिळण्यात विलंब होत होता. आता आमची दिवाळी उजळेल, अशी प्रतिक्रिया अनेक लाडया बहिणींनी व्यक्त केली.

**लाडक्या बहिणींच्या नाराजीवर राजकीय मलम :** ई-केवायसी प्रक्रिया स्थगित करणे हा निर्णय प्रशासनिक असला तरी त्यामागे स्पष्टपणे राजकीय गणित दडलेले आहे, अशी चर्चा रंगली आहे. महिलांच्या नाराजीचा सूर ओसरावा आणि आगामी निवडणुकांपूर्वी सरकारविषयीचा विश्वास परत मिळावा, यासाठीच ही तात्पुरती स्थगिती असल्याचे राजकीय वर्तुळात म्हटले जात आहे.

## वंचित महिलांची दिवाळी केली गोड

### गोरगरिबांच्या चेहऱ्यावर फुलला आनंद



■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील केनवड येथे दिवाळीनिमित्त वंचितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले दिवाळी हा आनंद, प्रकाश आणि एकात्मतेचा सण असला तरी प्रत्येकाच्याच आयुष्यात हा उजेड समानतेने पोहोचत नाही. पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे अनेक गरजू कुटुंबांना या सणाचा आनंद लांबच राहतो. याच पार्श्वभूमीवर समाजातील वंचित घटकांपर्यंत आनंदाचा किरण पोहोचविण्याच्या हेतूने जय गजानन महिला सेवाधारी गट आणि गजानन गोळे यांच्या संयुक्त विद्यमाने केनवड येथे एक सुंदर सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत गावातील अनेक गोरगरिब कुटुंबांना दिवाळी फराळाचे साहित्य तसेच कपड्यांचे वाटप करण्यात आले. या निमित्ताने दिवाळी साजरी करण्याची संधी मिळाल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले. गावातील सामाजिक बांधिलकीचे हे एक प्रेरणादायी उदाहरण ठरले.

## गंधकुटी येथील श्रामनेर शिबिरास ऊत्साहात प्रारंभ



■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील राजगाव जवळच्या पैनगंगा नदीकाठावर निसर्गरम्य वातावरणात असलेल्या गंधकुटी येथील श्रामनेर शिबिरास उत्साहात प्रारंभ झाला असून या शिबिरामध्ये उपासकांनी श्रामनेराची दीक्षा घेतली. शिबीरात परिसरातील एकुन पाच युवकांनी श्रामनेराची दीक्षा घेऊन आजिवन दसशीलाचे पालन करण्याचा संकल्प केला.

पूज्य भंते प्रज्ञापाल महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली भदंत नागमार्ग यांनी आयोजित केलेल्या शिबिराच्या पहिल्याच दिवशी चांगला प्रतिसाद मिळाला दुसऱ्या दिवसीही श्रामनेर शिबीरास प्रशिक्षणार्थी विधीपूर्वक सहभागी झाले ह्याप्रसंगी बौद्धविहार समितीचे समन्वयक डॉ.दीपक ढोले यांनी नवोदीत श्रामनेर शिबिरार्थिंचे कौतुक केले. ह्याप्रसंगी राजगावचे सरपंच आत्माराम ढोले, पोलिस पाटील विजयराव जाधव यांनी भेटी दिल्या .तसेच, प्रविण ढोले, गंगाधर ढोले ज्ञानबा विसावे, धम्मशिल विसावे, सत्वशिला विसावे, पिऊताई, जाधवताई व परिसरातील उपासक बहूसंख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणार्थिंना बुद्ध, धम्म, संघ वंदना, त्रिशरण, पंचशिल, आर्य अष्टांगिक मार्ग, बावीस प्रतिज्ञा, मिलिंद प्रश्न ,बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथाचे पठण भिक्खू संघ बौद्धाचार्य, विचारवंताद्वारा मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराचे संयोजक भंते नागमार्ग हे श्रामणेरांना मार्गदर्शन करीत आहेत. शिबिराच्या यशस्वीते करीता ग्रा.प सदस्य गौतम जाधव, धम्मपाल जाधव आदींनी परीश्रम घेतले. धम्मबांधवांनी या भेटी द्याव्यात असे आवाहन भिक्खू नागमार्ग यांनी केले.

## रेल्वे कॉलनी परिसरात अनोळखी पुरुषाचा मृतदेह; पोलिस तपास सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील रेल्वे कॉलनी परिसरात २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास एक अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून, वाशिम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आहे. सध्या मृतकाची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

प्राप्त माहितीनुसार, वाशिम रेल्वे स्टेशन परिसरातील जुने रेल्वेगेटनजिक असलेल्या ड्युटी गेटमनच्या बंद चौकीच्या व्हरांड्यात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह पडलेला असल्याचे पॉईंट्स मॅन अनिल अशोक उमाळे (रा. रेल्वे कॉलनी, वाशिम) यांनी पाहिले. त्यांनी तत्काळ वाशिम पोलिसांना या घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेहाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला.

मृतकाची उंची अंदाजे ५ फूट ६ इंच असून, रंग काळा सावळा आहे. त्याने अंगात फिकट रंगाचा शर्ट आणि पँट परिधान केली होती. प्राथमिक तपासानुसार मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मृतदेहाचे शवविच्छेदन जिल्हा सामान्य रुग्णालयात करण्यात येणार आहे. या घटनेने रेल्वे कॉलनी परिसरात भीतीचे आणि चर्चेचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी आसपासच्या रहिवाशांकडून माहिती घेण्यास सुरुवात केली.

## वाशिमच्या संगिताने जागतिक पातळीवर वाजवला विजयाचा नगारा!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दक्षिण आफ्रिकेतील केप टाऊन येथे दि. १० ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर २०२५ दरम्यान पार पडलेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२५ क्लासिकल पॉवरलिफ्टिंग व इक्युप पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत ४२ देशांच्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत वाशिम पोलीस विभागातील संगीता मारोती ढोले हिने उत्तुंग यश संपादन केले आहे.

क्लासिकल पॉवरलिफ्टिंगमधील ४७ किलो वजन गटात संगिताने



दमदार कामगिरी करत ब्राँझ मेडल पटकावले आणि भारताचे नाव जागतिक स्तरावर उजळविले. यानंतर दि. १९ ऑक्टोबर रोजी झालेल्या इक्युप पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत तिने त्याच वजन गटात उत्कृष्ट खेळ दाखवत गोल्ड मेडल पटकावले. संगिताच्या या दुहेरी यशामुळे भारतासह वाशिम जिल्हा आणि तिचे गाव अभिमानाने उजळून निघाले आहे. तिने या यशाचे श्रेय माननीय पोलीस अधीक्षक अनुज तारे, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड , गृह पोलीस उपाध्यक्ष वर्मा, राखीव पोलीस निरीक्षक शर्मा, प्रशिक्षक जयस्वाल तसेच तिचे आई-वडील मारोती आणि रेणुका ढोले व भाऊ भाग्यवान यांना दिले आहे.

संगिताच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे वाशिम जिल्ह्याचे नाव जागतिक क्रीडा क्षेत्रात चमकले असून, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पेडगावात पाईप मागण्यावरून सख्ख्या भावाकडून भावजयसह कुटुंबीयांवर हल्ला

■ प्रतिनिधी | रिसोड ■

शेतातील सामाईक पाईप मागण्याच्या कारणावरून सख्ख्या भावाने भावजयसह कुटुंबीयांना मारहाण केल्याची घटना रिसोड तालुक्यातील पेडगाव येथे २२ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता घडली. या प्रकरणी रिसोड पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिपमाला विष्णू बुंदे या पेडगाव येथील असून सध्या आपल्या पती आणि कुटुंबीयांसह रिसोड येथील ड्रीमलँड सिटीमध्ये वास्तव्यास आहेत. दिवाळी निमित्त त्या पतीसह गावाकडे आल्या असता, दिनांक २२ ऑक्टोबर रोजी सकाळी त्या शेतीतील सामाईक पाईप मागण्यासाठी आपल्या दीर संतोष विश्वास बुंदे यांच्या घरी गेल्या. यावेळी किरकोळ वादातून संतोष बुंदे यांनी त्यांच्याशी शिवीगाळ करून वाद घातला. दरम्यान, त्यांच्या पती विष्णू बुंदे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, संतोष बुंदे, वैशाली बुंदे, हेमंत बुंदे आणि पुनम बुंदे या चौघांनी मिळून लाथाबुक्क्यांनी, चापट्यांनी तसेच काठीने दोघांवर हल्ला केला. या मारहाणीमध्ये दोघेही किरकोळ जखमी झाले असून परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेनंतर दिपमाला बुंदे यांनी रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून संतोष विश्वास बुंदे, वैशाली बुंदे, हेमंत बुंदे आणि पुनम बुंदे या चौघांविरुद्ध भारतीय दंड विधान कलम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास रिसोड पोलिसांकडून सुरू असून ग्रामस्थांत या कौटुंबिक वादाच्या घटनेची मोठी चर्चा रंगली आहे.

## वाशीम येथे सहा ते आठ फेब्रुवारी रोजी भरणार कुतूहल विज्ञान प्रदर्शन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विज्ञान भारती ही संघटना विविध उपक्रमाच्या माध्यमातून विज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करते. त्याच अनुषंगातून वाशिम येथे कुतूहल हे विज्ञान प्रदर्शन स ६ ते ८ फरवरी २०२६ ला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चिखली रोड सिव्हिल लाईन वाशिम येथे संपन्न होत आहे. स्थानिक माँ गंगा मेमोरियल बाहेती हॉस्पिटल येथील सभागृहात दिनांक २३ ऑक्टोबर रोजी कुतूहल संघटनेची बैठक पार पडली यावेळी मान्यवरांच्या हस्ते कुतूहल विज्ञान प्रदर्शन पत्रिकेचे विमोचन श्री साईबाबा यांच्या चरणी करण्यात आले.

सदर विमोचन व बैठकीला संघटनेचे डॉक्टर हरीश बाहेती, ललित भुरे, उद्योजक गिरधारीलाल सारडा, समाजसेवक वसंतराव धाडवे, डॉक्टर श्रद्धा बाहेती, प्राध्यापक शैलेश चव्हाण राजेश वाघ किशोर कुंडाळ संदीप मुसळे प्राध्यापक गजानन वाघ, सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी राम धनगर साहित्यिक मधुरानी बनसोड, प्राध्यापक मधुकर बनसोड आदेश बनसोड, दिगंबर इंगळे, समवेत मान्यवर उपस्थित होते.

या प्रदर्शनी मध्ये मानवाच्या शरीरातील सर्व अवयवाचे प्रदर्शन मांडण्यात येणार आहे. जसे की



ओरिजनल हृदय, डोळे, फुफ्फुस, मेंदु सह इतर अवयव ठेवण्यात येतील साधारण १५० स्टॉल राहतील. त्याच सोबत आरोग्य क्षेत्रामध्ये लागणाऱ्या मशिनरी जसे एक्स-रे मशीन, डायबिटीस टेस्ट मशीन, डायलेसिस मशीन,सोनोग्राफी मशीन, सिटीस्कॅन मशीन सह ऑपरेशन थिएटर चे सुद्धा स्टॉल राहणार ह्या मशीन कशाप्रकारे कार्य करतात हे सुद्धा तिथे समजावून सांगणार. या प्रदर्शनीमध्ये शासकीय महाविद्यालयासह जिल्ह्यामध्ये असणारे फार्मसी कॉलेज, नर्सिंग कॉलेज व फिजिओथेरपिस्ट कॉलेज सुद्धा सहभागी होतील.त्यांचे सुद्धा त्यामध्ये स्टॉल राहतील. जिल्ह्यामध्ये विकणाऱ्या सर्व मेडिकल कंपन्यांचे तसेच ब्लड यूरिन टेस्ट करणाऱ्या लॅब चे सुद्धा यामध्ये स्टॉल राहतील . एकंदरीत आरोग्याशी निगडित असणाऱ्या सर्व बाबी या ठिकाणी विद्यार्थ्यांना अभ्यासाला व बघायला मिळतील. वाशिम जिल्ह्यातील जवळपास ५० हजार विद्यार्थी या प्रदर्शनीला भेट देतील.ही प्रदर्शनी माननीय जिल्हा अधिकारी योगेश कुंभोजकर व शासकीय जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी ठोंबरे, यांच्या मार्गदर्शना खाली या प्रदर्शनीचे अध्यक्ष शासकीय महाविद्यालयाने वाशिमचे प्राचार्य डॉक्टर सतीश मेश्राम तर उपाध्यक्ष वाशिम येथील प्रसिद्ध डॉक्टर हरीश बाहेती काम पाहत आहेत. समन्वयकाच्या भूमिकेमध्ये रोहित गणोरकर व ललित भुरे हे काम पाहत आहेत. तसेच ऑर्गनायझिंग कमिटी मध्ये विजय भड, राजेश वाघ, किशोर उंडाळ, मनीष गावंडे, डॉ श्रद्धा बाहेती, डॉक्टर पंकज वाडेकर, डॉक्टर किशोर पवार डॉक्टर पूजा कांबळे डॉक्टर अनुष्का तायडे डॉक्टर स्वाती कलंत्री डॉक्टर स्वाती नागरे डॉक्टर प्रशांत वांडेस्कर, डॉक्टर सचिन सानप , निलेश सोमानी राम धनगर, सह अनेक विज्ञान प्रेमी चा सहभाग आहे.

या प्रदर्शनीचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होईल. तर कार्यक्रमाचे प्रमुख महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ते राहतील. तसेच या कार्यक्रमाला आरोग्य मंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री दत्तराव भरणे, खासदार संजय धोत्रे,खासदार अनुप धोत्रे,आमदार शाम खोडे आमदार सहित डाके आमदार किरण राव सरनाईक आमदार वसंतराव खंडेराव आमदार भावनाताई गवळी आमदार धीरज लिंगाडे,आमदार बाबू सिंग महाराज माजी आमदार विजयराव जाधव माजी खासदार अनंतराव देशमुख माजी आमदार सुभाष ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहतील . या विज्ञान प्रदर्शनीचे प्रसिद्ध प्रमुख म्हणून निलेश सोमानी व राम धनगर हे काम पाहत आहेत . यापूर्वी सदर प्रदर्शनी संपूर्ण देशभरात दोन ठिकाणी पार पडली असून तिसऱ्यांदा वाशिम येथे होत आहे. विद्यार्थी व नागरिकांना या प्रदर्शनीचा लाभ मिळणार आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२५ ■ शनिवार, २५ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# निरामय वर्धा अभियान सन्मान सोहळा व पीएचसीचे ई-भूमिपूजन

## आरोग्य राज्यमंत्र्यांसह पालकमंत्री उपस्थित राहणार

### अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा होणार सन्मान

**वर्धा जनमाध्यम :** मोतीबिंदू विरहित वर्धा अभियानांतर्गत (निरामय वर्धा अभियान) उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा सन्मान सोहळा तसेच साटोडा व बोरगाव मेघे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ई-भूमिपूजन दि.२६ ऑक्टोंबर रोजी आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या उपस्थित होणार आहे.

सावंगी मेघे येथील दत्ता मेघे सभागृह येथे दुपारी १२ वाजता



आयोजित कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार डॉ.अनिल बोंडे, खासदार अमर काळे, आ.दादाराव केचे, आ.अभिजित वंजारी, आ.सुधाकर अडबाले, आ.समीर कुणावार, आ.राजेश बकाने, आ.सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, आरोग्य उपसंचालक डॉ.शशिकांत शंभरकर, दत्ता मेघे उच्च शिक्षण आणि संशोधन संस्थेचे कुलगुरु डॉ. ललीतभूषण वाघमारे यांची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमात जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या निरामय वर्धा अभियानात (मोतीबिंदू विरहित अभियान) उत्कृष्ठ कामगिरी कामासाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, महात्मे आय हॉस्पीटल नागपूर, महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस सेवाग्राम, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे, इंडियन मेडिकल असोशिएशन, वर्धा आप्थाल्मिक सोसायटी, निमा वर्धा या संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, विश्वत्रिवेणी कॉटस्पिन प्राईवेट लिमिटेड हिंगणघाट, सर्व तालुका प्रशासन, निरामय वर्धा अभियानचे जिल्हा समन्वयक, तालुका समन्वयक, आकांक्षित तालुका कारंजा समन्वयक, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष, आशा स्वयंसेविकांना मान्यवरांच्याहस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वडगाव खुर्द येथे भीषण आग; दोन घरे व गोठा खाक

## -खा.अमर काळेंची पीडितांना भेट, तातडीने मदतीचे आदेश

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील वडगाव खुर्द येथे गुरुवारी मध्यरात्री लागलेल्या आगीत दोन घरे आणि एक गोठा जळून खाक झाल्याची धक्कादायक घटना घडली. या आगीत प्रवीण झामरे आणि गोपाल झामरे यांची घरे जळून घरातील सर्व साहित्य भस्मसात झाले. शेजारील मोहन खोंडे यांचा गोठा व चारा सुद्धा आगीत जळून गेला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.घटना घडली तेव्हा सर्व कुटुंब गाढ झोपेत होते.



झामरे कुटुंबातील लहान मुलगी जागी झाल्याने तिने प्रसंगावधान ठेवून सर्वांना बाहेर काढले. गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने आग आणखी भडकली. झामरे यांनी बचत गटाकडून घेतलेले कर्जाचे पैसेही घरात असल्याने तेही आगीत नष्ट झाले. गोठ्यातील जनावरांना भाजल्या गेल्या असून पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तत्काळ उपचार केले.घटनेची माहिती मिळताच खासदार अमर काळे यांनी आपला दौरा थांबवून तातडीने वडगाव खुर्द येथे धाव घेतली. त्यांनी नुकसानीची पाहणी करून तहसील आणि कृषी अधिकाऱ्यांना पंचनामा करून त्वरीत मदतीचा प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले. तसेच पीडित कुटुंबीयांचे सांत्वन करताना जखमी जनावरांचीही स्थिती जाणून घेतली.यावेळी शेखर शेंडे, काशीनाथ लोणकर, सचिन पारसे, हरीश पारसे, सौरभ शेळके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्वरांच्या मैफलीत रंगली दिवाळी पहाट

## हिंगणघाटात भाजपाच्यावतीने आयोजित संगीतमय सोहळयास उत्स्फूर्त प्रतिसाद

**हिंगणघाट जनमाध्यम :** संगीताच्या स्वरांनी सजलेली दिवाळीची पहाट हिंगणघाटकरांसाठी अविस्मरणीय ठरली. भारतीय जनता पक्षाच्या वतीने राममंदिर चौकात आयोजित दिवाळी पहाट या सांगीतिक कार्यक्रमात सुप्रसिद्ध कलावंतांनी आपल्या सादरीकरणाने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला.पहाटेच्या प्रसन्न वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात गायिका शमिका भिडे आणि गायक राजयोग धुरी यांच्या सुरेल गायनाने रसिक भारावून गेले.



शमिका भिडे यांच्या गोड स्वरांनी संगीतप्रेमींच्या मनात भावनांची लहर निर्माण केली, तर राजयोग धुरी यांनी दमदार आवाज आणि कौशल्यपूर्ण सादरीकरणाने वातावरण रंगवले. भतीगीते, भावगीते आणि नाट्यसंगीताचा सुश्राव्य संगम श्रोत्यांना अनुभायला मिळाला.या प्रसंगी आमदार समीर कुणावार, माजी खासदार सुरेश वाघमारे, भाजपा जिल्हाध्यक्ष संजय गाते, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सचिव रमेश धारकर यांच्यासह शहरातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. स्वरांच्या सुमधुर वातावरणात दिवाळीचा मंगल आरंभ हिंगणघाटकरांनी उत्साहात साजरा केला.

# हिंगणघाटात रेती माफियावर सर्जिकल स्ट्राईक

## -ट्रॅक्टर, ट्रॉली आणि काळी रेतीसह ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट जनमाध्यम :** उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, हिंगणघाट यांच्या पथकाने रेती माफियाविरुद्ध मोठी कारवाई करत एक ट्रॅक्टर, ट्रॉली आणि १ ब्रास काळी रेती असा एकूण ८ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई शुक्रवारी (दि. २४ ऑक्टो.) लाडकी नदी परिसरात करण्यात आली.पोलीस पथकाला मिळालेल्या खबरीनुसार, आरोपी प्रवीण प्रोफेश्वर मरापे (रा. पिंपळगाव) हा ट्रॅक्टर क्रमांक एमएच ३२ पी ५४५ मार्फत ट्रॅक्टर मालक योगेश देवराव सातपुते यांच्या सांगण्यावरून मौजा लाडकी नदी घाटातून काळी रेती चोरी करून मौजा बुरकोणी कडे वाहतूक करत होता.सदर



ठिकाणी सापळा लावून पोलिसांनी ट्रॅक्टर थांबवून तपासणी केली असता १ ब्रास काळी रेती (गौण खनिज) बिना रॉयल्टीचे वाहतूक करताना आरोपी रंगेहात पकडला. जागीच जप्ती पंचनामा करून ट्रॅक्टर, ट्रॉलीसह रेती ताब्यात घेण्यात आली. एकूण ८ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून आरोपी विरुद्ध हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# उद्या रंगणार डब्लूसीसीएलचा जल्लोष

## पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या हस्ते स्पर्धेचा शुभारंभ

### क्रिकेटपटू प्रशांत वैद्य राहणार उपस्थित

**वर्धा जनमाध्यम :** क्रिकेटप्रेमींसाठी वर्धा शहरात क्रीडाचा जल्लोष रंगणार आहे. वर्धा क्रिकेट चॅम्पियन लीग (डब्लूसीसीएल) स्पर्धेचा भव्य शुभारंभ उद्या रविवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता शहीद भगतसिंग मैदान, सर्कस ग्राउंड, रामनगर येथे होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या शुभहस्ते संपन्न होईल. कार्यक्रमाला आमदार राजेश बकाणे, माजी खासदार रामदास तडस, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुराग जैन, भाजप शहराध्यक्ष निलेश किटे, माजी नगरसेवक प्रदीपसिंग ठाकूर, सौ. वंदनाताई भूते, ऐवोनिथ स्टील कंपनीचे आर. के. शर्मा, पलाश ठमेकर, डॉ. विपीन राऊत, वरुण दफ्तरी, सौरभ ढोमणे, तसेच अभय पुणेवार यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्याची शान ठरणार आहेत प्रसिद्ध क्रिकेटपटू प्रशांत वैद्य. क्रिकेटप्रेमींसाठी रोमांचक खेळाचा आस्वाद घेण्याची संधी मिळणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक डॉ. राजीव भोला, भरत नागपाल, राकेश शिंदे, आबिद शेख, अक्षय तोटे आणि राकेश दंडारे यांनी केले आहे.

# सहकारासाठी लढवैय्या कोठारींचे योगदान अमोल: पालकमंत्री

## -जिल्ह्यातील सहकार चळवळ उभी ठेवण्याचे श्रेय कोठारींचे

**हिंगणघाट जनमाध्यम :** जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राला दिशा देताना अॅड. सुधीर कोठारी यांनी दाखवलेली निष्ठा आणि नेतृत्व आज युवकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. सहकार क्षेत्र स्वच्छ, पारदर्शक आणि लोकाभिमुख ठेवण्यात कोठारी यांनी दिलेले योगदान मोलाचे असल्याचे गौरवोद्गार राज्याचे सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी काढले.वणा नागरिक सहकारी बँकेच्या मांडगाव येथे सुरू झालेल्या अकराव्या शाखेच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. या वेळी माजी राज्यमंत्री रणजित कांबळे, आमदार समीर कुणावार, हिंगणघाट बाजार समितीचे सभापती अॅड. कोठारी, माजी आमदार राजू तिमांडे, नपं अध्यक्ष योगिता तुळणकर, उपाध्यक्ष



बाबाराव थुटे, हिम्मत चतुर आदी मान्यवर उपस्थित होते.ना. भोयर म्हणाले, जनतेच्या विश्वासावर बँक उभी राहते आणि कोठारी यांनी हा विश्वास अधिक मजबूत केला आहे. त्यांनी रोजगारनिर्मिती, कर्जसहाय्य आणि लोकसेवा या तिन्ही मोर्चावर प्रभावी कार्य केले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँक वाचविण्याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाते, हेही त्यांनी सांगितले.आमदार समीर कुणावार म्हणाले, कोठारी हे सहकार चळवळीतील निष्ठावान योद्धे आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळेच हिंगणघाटची बाजार समिती आज राज्यात उदाहरण ठरत आहे. माजी मंत्री रणजित कांबळे यांनी वणा बँकेचा एनपीए शून्य ठेवणाऱ्या त्यांच्या पारदर्शक कामगिरीचे कौतुक केले. माजी आमदार राजू तिमांडे यांनीही कोठारी यांच्या नेतृत्वाबद्दल आदर व्यक्त केला.प्रास्ताविक अॅड. कोठारी यांनी केले. स्वागत डॉ. निर्मेश कोठारी यांनी केले तर सूत्रसंचालन दीपक माडे आणि आभार प्रदर्शन हेमंत पाहुणे यांनी केले. कार्यक्रमाला वणा बँकेचे उपाध्यक्ष सुरेश सायंकार, संचालक वरुण लोढा, अक्षय ओस्तवाल, कामगार नेते आफताब खान व इतर मान्यवर उपस्थित होते.

# भाऊबिजेच्या रात्री शेतकरी पुत्राची गळफास घेत आत्महत्या

**समुद्रपूर जनमाध्यम :** दिवाळीच्या सणाचा जल्लोष सर्वत्र सुरू असताना सावरखेडा गावात मात्र दुर्दैवी घटना घडली. भाऊबिजेच्या रात्री हर्षल नत्थूजी राऊत (वय २५) या शेतकरी पुत्राने आपल्या शेताच्या बांधावर गळफास घेऊन जीवन संपवले. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.माहितीनुसार, २३ ऑक्टोबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास हर्षल हा घरून जेवण करून बाहेर गेला. त्यानंतर त्याने थेट शेत गाठून झाडाला टी-शर्ट बांधून गळफास घेतला.



पहाटेपर्यंत तो घरी परतला नाही म्हणून चिंतित झालेल्या नातेवाईकांनी शोध घेतला असता त्याचा मृतदेह बांधावर आढळला. घटनेची माहिती मिळताच समुद्रपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात हलवला. हर्षल हा घरातील कर्ता सदस्य होता. वडिलांच्या नावावरील शेती तोच पाहत होता. मात्र गेल्या काही महिन्यांतील अतिवृष्टीमुळे पीक हातातून गेले. त्यातच आजारी वडिलांची जबाबदारी, आर्थिक ताण, दिवाळीचा खर्च आणि लग्नाची चिंता या कारणांनी तो मानसिक तणावात होता. शेवटी निराशेच्या भरात त्याने आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले, अशी चर्चा गावात सुरू आहे.भाऊबिजेच्या रात्री घडलेल्या या घटनेने सावरखेडा परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून पुढील तपास समुद्रपूर पोलिस करीत आहेत.


**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर**

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)**

**कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा**

(ई मेल : eewidn@gmail.com दुरध्वनी क्र.०७१५२-२४३५४८)

**ई-निविदा सुचना क्र. १४/वपावि/ २०२५-२६**

**Main Portal:https://mahatenders.gov.in**

कार्यकारी अभियंता, **वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा,** यांचे खालील कामा करिता सक्षम असलेल्या कंत्राटदाराकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** येथून डाउनलोड करण्यात यावे. तसेच स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची निविदा रक्कम | बयाना रक्कम | को-या निविदेची रक्कम | पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दहेगाव शाखा अंतर्गत बोर प्रकल्पावर रब्बी सिंचनकरिता सन २०२५-२६ चे मनुष्यबळ पुरविणे तसेच देखभाल व दुरुस्तीचे काम | रु.१२१५८९४/- | रु.१२५००/- | ६ महिने | मजुर सहकारी संस्थाकरीता राखीव | ६ महिने |
| | हिंगणी शाखा अंतर्गत बोर प्रकल्पावर रब्बी सिंचनकरिता सन २०२५-२६ चे मनुष्यबळ पुरविणे तसेच देखभाल व दुरुस्तीचे काम | रु.९७८१८२/- | रु.१००००/- | ६ महिने | मजुर सहकारी संस्थाकरीता राखीव | ६ महिने |
| | केळझर शाखा अंतर्गत बोर प्रकल्पावर रब्बी सिंचनकरिता सन २०२५-२६ चे मनुष्यबळ पुरविणे तसेच देखभाल व दुरुस्तीचे काम | रु.१०४७८९२/- | रु.१०५००/- | ६ महिने | मजुर सहकारी संस्थाकरीता राखीव | ६ महिने |

(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल )

१. सविस्तर ई-निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रानिक टेन्डर management http://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्ड वर दि.३०.१०.२०२५ पासुन पहावयास मिळेल.

**जा.क्र.३२२०/नि.लि./२०२५ दि.१७.१०.२०२५**

**क्र.जिमाका-वर्धा/१४१/२०२५-२६**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**वर्धा पाटबंधारे विभाग वर्धा**


# शेतकऱ्यांचा माल पावसात वाहून गेला, समिती प्रशासन कोमात

## व्यापाऱ्यांना शेड, शेतकऱ्यांना पाऊस : हीच का 'लोकशाही'?

**सेलू जनमाध्यम :** सेलूत पडलेल्या केवळ पंधरा मिनिटांच्या पावसाने बाजार समिती प्रशासन पाण्यात गेलं. मेहनती शेतकऱ्यांनी दिवसरात्र कष्ट करून आणलेला सोयाबीनचा माल भिजून गेला, पण व्यापाऱ्यांचा माल मात्र शेडखाली सुखरूप, शुक्रवारी दुपारी अवघ्या पंधरा मिनिटांच्या पावसाने सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीची बेफिकिरी उघडी पडली. अचानक आलेल्या पावसाने बाजार परिसरात पाणी साचले आणि शेतकऱ्यांचा सोयाबीनसह माल भिजून नुकसान झाले. व्यापाऱ्यांचा माल मात्र शेडखाली सुरक्षित राहिला, तर शेतकऱ्यांचा उघड्यावर ठेवलेला माल पावसाच्या तडाख्यात सापडला. शेतकऱ्यांनी याविषयी तीव्र नाराजी व्यक्त करत समिती व्यापाऱ्यांची की शेतकऱ्यांची ? असा प्रश्न उपस्थित केला आहे. बाजार समितीकडे शेतकऱ्यांना शेडची सुविधा देण्यासाठी आवश्यक व्यवस्था असूनही त्या वापरात आणल्या जात नाहीत, अशी चर्चा परिसरात रंगली आहे. दरम्यान, समितीचे अधिकारी घटनास्थळी न दिसल्याने ग्रामस्थांनीही निष्क्रीय प्रशासनावर संताप व्यक्त केला.शेतकऱ्यांचे म्हणणे आहे



की, आमचा माल भिजून नुकसान झाले, पण व्यापाऱ्यांच्या मालासाठी शेड तयार आहे. हाच अन्याय संपवण्यासाठी अधिकारी व जनप्रतिनिधींनी पुढे यावे. प्रशासनाकडून याबाबत कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण मिळालेले नाही.


व्यापाराच्या मालाने भरलेली ही बाजार समिती की व्यापारी संघटना ? अशी संतप्त प्रतिक्रिया एका शेतकऱ्याने दिली, निवडणुकीत मत देताना शेतकऱ्यांच्या नावाने गळे फाडणारे राजकीय नेते आता गप्प का असाही प्रश्न यावेळी उपस्थित केला आहे, बाजार समिती प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधी जबाबदारी निश्चित करून या अन्यायाला आळा घालावा अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### 'अबकी बार मोदी सरकार' लिहिणारे पीयूष पांडे यांचे निधन



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जाहिरात गुरू पीयूष पांडे यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांनी वयाच्या ७० व्या वर्षी मुंबईत अखेरचा श्वास घेतला. ते 'अबकी बार मोदी सरकार' या घोषवाक्याचे आणि 'मिले सूर मेरा तुम्हारा' या गाण्याचे लेखक होते. सुहेल सेठ यांनी एक्सवरील एका पोस्टद्वारे त्यांच्या मृत्यूची घोषणा केली. पीयूष यांच्या मृत्यूचे कारण अद्याप कळलेले नाही. अहवालानुसार ते गंभीर संसर्गाने ग्रस्त होते. आज सकाळी ११ वाजता मुंबईत अंत्यसंस्कार केले जातील. पीयूष पांडे यांचा जन्म १९५५ मध्ये जयपूर येथे झाला. त्यांचे भाउ प्रसून पांडे हे एक प्रसिद्ध दिग्दर्शक आहेत आणि त्यांची बहीण इला अरुण एक गायिका आणि अभिनेत्री आहेत. पांडे यांचे वडील एका बँकेत काम करत होते. पीयूष अनेक वर्षे क्रिकेटही खेळले.

पीयूष यांनी वयाच्या २७ व्या वर्षी जाहिरात क्षेत्रात प्रवेश केला. त्यांनी त्याचे भाउ प्रसून पांडे यांच्यापासून सुरुवात केली. दोघांनीही दैनंदिन उत्पादनांसाठी रेडिओ जिंगल्समध्ये आवाज दिला. ते १९८२ मध्ये ओगिल्वी जाहिरात कंपनीत सामील झाले. १९९४ मध्ये त्यांना ओगिल्वीच्या बोर्डावर नामांकन मिळाले. २०१६ मध्ये भारत सरकारने पीयूष यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. याशिवाय, २०२४ मध्ये त्यांना ख्क्ष्त्र्ृ लेजेंड पुरस्कार मिळाला. फेविकालची 'ट्रक जाहिरात': पीयूष यांनी २००७ मध्ये प्रदर्शित झालेल्या एका साध्या चिकटपणाचे घराघरात रूपांतर केले. या जाहिरातीत एक ट्रक दाखवण्यात आला आहे ज्यावर असंख्य लोक बसलेले आहेत आणि ते वाहन खडबडीत रस्त्यावर न पडता पुढे जात राहते. या जाहिरातीने गोंदाचे फेविक?लमध्ये रूपांतर केले. या जाहिरातीने केवळ असंख्य पुरस्कार जिंकले नाहीत तर प्रेक्षकांच्या मनावरही छाप पाडली. २००७ मध्ये प्रदर्शित झाली. त्यात भारताचे क्रिकेटवरील प्रेम दाखवण्यात आले होते, एका मुलाने षटकार मारला आणि आनंदाने नाचला, ज्यामुळे संपूर्ण परिसर सामील झाला. पांडेंच्या आवाजाने मजा वाढवली. 'कुछ खास है जिंदगी में!' या ओळीने प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडली. २००२ ची जाहिरात 'हर घर कुछ कहता है' मध्ये एका कुटुंबाची कहाणी सांगितली गेली जिथे वडिलांच्या आठवणी भिंतींवर जिवंत होतात. 'हर घर कुछ कहता है' या टॅगलाइनने लाखो घरांना स्पर्श केला आणि एशियन पेंट्सला मार्केट लीडर बनवले. २०१४ मध्ये, भाजपचे 'अबकी बार मोदी सरकार' हे घोषवाक्य देखील पीयुष पांडे यांनी तयार केले होते, जे आज प्रत्येक घरात प्रसिद्ध आहे. पियुष पांडे यांनी 'दो बूँदें जिंदगी की' ही पल्स पोलिओची जाहिरातही केली होती, जी अजूनही लोकांच्या ओठांवर आहे.

### ओला-उबरचा बाजार ऊठणार...! राज्यांत सरकारी 'भारत टॅक्सी' येणार

**नवी दिल्ली:** ॲप आधारित टॅक्सी सेवेत ओला आणि उबरची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी केंद्र सरकारच्या सहकार विभागाच्या पुढाकाराने देशात लवकरच 'भारत टॅक्सी' ही नवीन सेवा सुरू होत आहे. 'मल्टी-स्टेट सहकारी टॅक्सी कोऑपरेटिव्ह लिमिटेड' अंतर्गत ही सेवा चालवली जाईल, जी देशातील पहिली सहकारी टॅक्सी सेवा असेल. पायलट प्रोजेक्ट म्हणून ही सेवा सुरुवातीला दिल्ली, महाराष्ट्र, गुजरात आणि उत्तर प्रदेशात सुरू केली जाईल आणि त्यानंतर ती देशभरात विस्तारित केली जाईल. ओला, उबर आणि 'भारत टॅक्सी'चा सर्वात मोठा फरक म्हणजे, या माडेलमध्ये टॅक्सी चालक हे केवळ नोकर नसून ते या सहकारी संस्थेचे सह-मालक असतील. यामुळे नफा थेट चालकांना मिळेल, त्यांची आर्थिक पिळवणूक थांबेल आणि त्यांना व्यवसायात सन्मान मिळेल. 'नो-कमिशन' आणि वाढलेले उत्पन्न: ओला-उबरसारख्या कंपन्यांकडून चालकांच्या उत्पन्नातून घेतले जाणारे जास्त कमिशन या सहकारी माडेलमध्ये घेतले जाणार नाही. याचा थेट फायदा चालकांना होईल आणि त्यांचे मासिक उत्पन्न वाढेल. 'नो-सर्ज प्राइसिंग' : सणासुदीच्या काळात किंवा जास्त मागणी असताना खासगी अग्रीगेटर्सकडून आकारले जाणारे अवाजवी 'सर्ज प्राइसिंग' (वाढीव दर) या ॲपमध्ये असणार नाही. यामुळे प्रवाशांना पारदर्शक आणि परवडणा-या दरात टॅक्सी उपलब्ध होईल. ३०० कोटींचे भांडवल आणि संस्थात्मक पाठबळ: या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ३०० कोटी रुपयांचे अधिकृत भांडवल उभारण्यात आले आहे. या सेवेला देशातील आठ प्रमुख सहकारी संस्थांचा भक्कम पाठिंबा आहे, ज्यात अमूल, राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ, आणि इफको यांसारख्या मोठ्या संस्थांचा समावेश आहे. व्यवस्थापन: अमूलचे व्यवस्थापकीय संचालक जयेन मेहता यांची या 'सहकार टॅक्सी' संस्थेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या वर्षाच्या अखेरीस या ॲपचे राष्ट्रीय स्तरावर लोकार्पण होण्याची शक्यता आहे.

### भारतानेही ट्रम्प यांच्या इशा-यावरून रशियन तेल खरेदी कमी केले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर रशियाच्या तेल खरेदीवरून दबाव आणला आहे. भारताने रशियाकडून तेल करणे थांबवणार नसल्याचे दावा केला होता. दरम्यान, आता भारताने रशियाकडून तेल खरेदी कमी केल्याचा दावा व्हाईट हाउसने पुन्हा एकदा केला आहे. त्यांचे उर्जा धोरण केवळ राष्ट्रीय हित आणि ग्राहक संरक्षणावर आधारित आहे. व्हाईट हाउसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी पत्रकार परिषदेत याबाबत विधान केले. रशिया-युक्रेन युद्ध संपवण्याच्या दिशेने प्रगती न झाल्याने अध्यक्ष ट्रम्प निराश असल्याचे त्यांनी सांगितले. रशियन तेल कंपन्यांवरील निर्बंधांचा एक नवीन टप्पा मॉस्कोच्या अर्थव्यवस्थेला मोठा धक्का देईल, असा विश्वास व्यक्त केला. 'जर तुम्ही निर्बंध वाचले आणि त्यांचे काळजीपूर्वक परीक्षण केले तर तुम्हाला दिसेल की ते बरेच कठोर आहेत. मी आज सकाळी काही आंतरराष्ट्रीय बातम्या पाहिल्या की चीन रशियाकडून तेल खरेदी कमी करत आहे. भारताने राष्ट्रपतींच्या विनंतीवरून असेच केले आहे. राष्ट्रपतींनी आमच्या सहयोगी युरोपियन देशांना, रशियन तेल खरेदी थांबवण्याचे आवाहन देखील केले आहे, असंही लेविट म्हणाले.अमेरिकेने रशियाच्या दोन सर्वात मोठ्या तेल कंपन्यांवर, रोझनेफ्ट आणि लुकोइलवर नवीन निर्बंध लादले आहेत, या निर्बंधाचा उद्देश क्रेमलिनच्या उर्जा उत्पन्नावर आणखी मर्यादा घालणे आहे. दरम्यान, व्हाईट हाउसने यावर प्रतिक्रिया दिली. 'हा निश्चितच दबाव आणण्याचा प्रयत्न आहे आणि काल अर्थमंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे हे निर्बंध हानिकारक असतील अशी आम्हाला अपेक्षा आहे, असेही सांगण्यात आले आहे.

### सामाजिक कार्यकर्त्याची पत्नीकडूनच हत्या

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्याजवळील चिंचवड परिसरातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास पती सारखा चारित्र्यावरून संशय घेत असल्याने पत्नीने पतीचा गळा आवळून खून केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी चिंचवड पोलिसांनी आरोपी पत्नीला ताब्यात घेतले आहे. चिंचवडमधील माणिक कॉलनी लिंक रोड परिसरातील ही घटना आहे. मयत पतीचे नाव नकुल आनंद भोईर (वय-४०, रा. माणिक कॉलनी लिंकरोड, चिंचवड) असे असून पत्नीचे नाव चैताली नकुल भोईर असे आहे. पहाटे ०२.३० ते ०२.४५ वाजेच्या दरम्यान चैतालीने नकुलचा खून केला आहे. आरोपी पत्नी चैताली भोईर हिने पती नकुल भोईर यांचा कपड्याने गळा आवळून खून केला. प्राथमिक माहितीनुसार, मयत नकुल आनंद भोईर हे आरोपी पत्नी चैताली भोईर यांच्या चारित्र्यावर वारंवार संशय घेत होते. यातूनच दोघांमध्ये वाद होत असत. हा वाद विकोपाला जाउन चैताली यांनी पतीचा गळा आवळून खून केल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मयत नकुल भोईर हे सामाजिक कार्यात सक्रिय होते. ते मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी होते, ज्यामुळे या घटनेने स्थानिक राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.

### भारतानंतर आणखी एक देश पाकिस्तानचे पाणी अडवणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताने 'ऑपरेशन सिंदूर' वेळी पाकिस्तानसोबतचा 'सिंधू जल करार' रद्द केला. यामुळे पाकिस्तानला जाणारे पाणी बंद करण्यात आले. पाकिस्तानच्या अनेक भागात दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली. दरम्यान, आता तालिबानशासित अफगाणिस्तान पाकिस्तानला होणारा पाणीपुरवठा मर्यादित करण्याची आणि नदीवर धरणे बांधण्याची तयारी करत आहे.अफगाणिस्तानच्या माहिती मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, तालिबानचा सर्वोच्च नेता मौलवी हिबतुल्लाह अखुंदजादा यांनी कुनार नदीवर शक्य तितक्या लवकर धरण बांधण्याचे आदेश दिले आहेत. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या युद्धानंतर हे पाउल उचलले जात आहे, पाकिस्तानसोबत पाणी वाटप करण्याच्या भारताच्या निर्णयानंतर अफगाणिस्तानचा हा निर्णय आला आहे. सर्वोच्च नेते अखुंदजादा यांनी मंत्रालयाला कुनार नदीवर लवकरच धरण बांधण्याचे आणि देशांतर्गत कंपन्यांशी करार करण्याचे निर्देश दिले आहेत. उप माहिती मंत्री मुहाजेर फराही यांनी गुरुवारी एक्स वर ही माहिती शेअर केली. युसुफझाई यांच्या मते, सर्वोच्च नेते यांनी मंत्रालयाला परदेशी कंपन्यांची वाट पाहण्याऐवजी देशांतर्गत अफगाण कंपन्यांशी करार करण्याचे आदेश दिले. ४८० किलोमीटर लांबीची कुनार नदी पाकिस्तान सीमेजवळ अफगाणिस्तानातील हिंदू कुश पर्वतरांगांमधील ब्रोघिल खिंडीजवळ उगम पावते. ती कुनार आणि नांगरहार प्रांतांमधून दक्षिणेकडे वाहते. नंतर ती पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वामध्ये प्रवेश करते, तिथे ती जलालाबाद शहराजवळ काबूल नदीला मिळते.

# देशात पहिल्यांदाच एका दिवसात तीन अवयव प्रत्यारोपण

## केरळच्या रुग्णालयात हृदय, फुप्फुस आणि मूत्रपिंड शस्त्रक्रिया, देशातील पहिले फुप्फुस प्रत्यारोपण

**कोट्टायम वृत्तसंस्था :** केरळमधील कोट्टायम सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात २३ ऑक्टोबर रोजी तिहेरी अवयव प्रत्यारोपण करण्यात आले. हृदय, फुप्फुस आणि मूत्रपिंड-एकाच दिवशी तिहेरी अवयव प्रत्यारोपण करणारे हे भारतातील पहिले सरकारी रुग्णालय बनले. सरकारी रुग्णालयात फुप्फुस प्रत्यारोपण करण्याची ही पहिलीच वेळ आहे. देशात फुप्फुस प्रत्यारोपण ही एक अत्यंत दुर्मिळ शस्त्रक्रिया मानली जाते, अगदी खासगी रुग्णालयांमध्येही जिथे अवयवदानाला परवानगी आहे. कोट्टायम मेडिकल क?लेजच्या अधिका-यांनी सांगितले की, सरकारी रुग्णालयात एकाच दिवसात तीन अवयव प्रत्यारोपण करण्यात आल्याची ही देशातील पहिलीच वेळ आहे, त्यापैकी एक फुप्फुसाचे होते. दान केलेल्या अवयवांमध्ये हृदय, फुप्फुस, दोन्ही मूत्रपिंडे, स्वादुपिंड, यकृत, एक हात आणि दोन्ही कार्निया यांचा समावेश होता. यापैकी एक मूत्रपिंड, हृदय आणि फुप्फुस कोट्टायम मेडिकल कालेजमधील रुग्णांना प्रत्यारोपित करण्यात आले. बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी रात्री ८:३० वाजता ही शस्त्रक्रिया सुरू झाली आणि पहाटे २:३० वाजेपर्यंत चालली. त्यानंतर अवयव इतर रुग्णांमध्ये प्रत्यारोपण करण्यात आले. २३ ऑक्टोबर रोजी दुपारी ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली.

**अनिशच्या कुटुंबाने त्याची इच्छा पूर्ण केली-** शरीराचे हे भाग ३८ वर्षीय ए.आर. अनिश यांचे होते, ज्यांचा कोट्टायम मेडिकल कॉलेजमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. अनिश तिरुवनंतपुरममधील पूजापुरा मध्यवर्ती कारागृहात अधिकारी होते. १८ ऑक्टोबर रोजी, सबरीमाला ड्युटीवरून परतत असताना, ते पंपा बस स्टँडवर अचानक कोसळले. २२ ऑक्टोबर रोजी कोट्टायम मेडिकल कॉलेजमध्ये त्यांचा मृत्यू झाला. अनिशने यापूर्वी त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे अवयव दान करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यांच्या मृत्यूची पुष्टी झाल्यानंतर, त्यांच्या आई आणि बहिणीसह त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी त्यांची इच्छा पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. राज्याच्या आरोग्यमंत्री वीणा जॉर्ज यांनी दुःखाच्या वेळीही अवयव दान करण्यास सहमती दर्शविल्याबद्दल कुटुंबाचे आभार मानले. डॉ. जयकुमार आणि त्यांच्या टीमने ही शस्त्रक्रिया केली.

# भुजबळांचा जामीन रद्द करून मंत्रिमंडळातून बाहेर काढा

## ■ जरांगेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी ■

**जालना/प्रतिनिधी :** मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून राज्य सरकारवर तीव्र हल्लाबोल केला आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट उद्देशून म्हटले की, हैदराबाद गॅझेटनुसार तातडीने प्रमाणपत्र वाटप सुरू करा. तुम्ही मराठ्यांची मने जिंकली आहेत, ती कायम ठेवायची असतील तर वेळ घालवू नका.



यावेळी जरांगे पाटलांनी छगन भुजबळ यांच्यावरही निशाणा साधला. मुख्यमंत्र्यांना उद्देशून ते म्हणाले, सरकारमधील लोकं हैदराबाद गॅझेट विरोधात कोर्टात जात आहेत, हे कसे चालतंय? छगन भुजबळांनी गॅझेटविरोधात पाच याचिका दाखल केल्या, हे तुमच्या परवानगीशिवाय शक्य आहे का? देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास असल्याचे सांगत जरांगे म्हणाले, फडणवीस साहेब, लोकांनी तुमच्यावर मोकळ्या मनाने प्रेम केले आहे. तुम्ही मोठ्या मनाने जीआर काढला, पण भुजबळ त्याला विरोध करताहेत. तुमच्या बळाशिवाय ते असे करुच शकत नाहीत. जरांगे यांनी स्पष्ट मागणी केली की, भुजबळांचा जमीन रद्द करुन त्यांना मंत्रिमंडळात बाहेरचा रस्ता दाखवा. तसेच, येत्या कॅबिनेट बैठकीत सातारा संस्थांचे गॅझेट काढा. आता आमच्यात थांबायची क्षमता नाही. सरकारने विलंब केला, तर आम्ही पुन्हा निर्णायक आंदोलन छेडू. मराठा समाजाची सहनशीलता आता संपत आली आहे असेही जरांगे पाटलांनी यावेळी स्पष्ट केले.

# बोगस कार्यक्रम चाललाय, प्रत्येक गोष्टीचा पुरावा मागा मुरलीधर मोहोळांचे धंगेकरांना चॅलेंज

**पुणे/प्रतिनिधी :** एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे पुण्याचे महागनगरप्रमुख रविंद्र धंगेकर गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. त्यांनी पुण्याच्या जैन बोर्डिंगच्या जागेच्या व्यवहाराचा मुद्दा उचलून धरला आहे. या प्रकरणात पुण्याचे भाजपचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर आरोप केले आहेत. भगवान महावीरांचे मंदिर आणि जैन बोर्डीगची जागा लुटण्याचा व्यवहार रद्द होउन भगवान महावीरांच्या मूर्तीवरील कर्जाचा बोजा चढविणा-या व्यक्ती विरोधात कारवाई होत नाही, तोपर्यंत माझा हा लढा सुरूच राहील असेही त्यांनी एक्स पोस्टच्या माध्यमातून सांगितले आहे. त्यानंतर धंगेकर मुरलीधर मोहोळ यांना टार्गेट करून वारंवार ट्विट करताना दिसून येत आहेत. पुणे महानगरपालिकेत महापौर हे संविधानिक पद सांभाळत असताना एका खाजगी व्यावसायिकाचे वाहन वापरणे हे महापौरांच्या नीतिमत्तेला धरून आहे का? असा सवाल त्यांनी एक्स पोस्टच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. मी आपणास काही माहिती देउ इच्छितो, मोहोळ हे खासदार होण्याच्या अगोदर पुणे नगरीचे महापौर होते. हे महापौर असताना पुणे महानगरपालिकेची अधिकृत शासकीय पाटी लावून महापौर पांढ-या रंगाची इनोव्हा क्रिस्टा वापरायचे.



त्या गाडीचा नंबर होता एमएच १२ एसडब्ल्यू ०९०९ ही गाडी ना मोहोळ यांची होती ना पुणे महानगरपालिकेचे शासकीय वाहन. ही गाडी होती कोथरूडच्या बढेकर बिल्डरची. हे तेच बिल्डर आहे ज्यांनी जैन होस्टेल खरेदी करण्यासाठी दोन नंबरचा लिलाव लावला आणि हे देखील पुन्हा मुरलीधर मोहोळ यांचे पार्टनर असल्याचा आरोप धंगेकर यांनी केला आहे. त्यावरून मुरलीधर मोहोळ यांनी धंगेकरांना चॅलेंज केले आहे. पुण्यात त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

मोहोळ म्हणाले, रोज सकाळी तुम्ही तिथे जाता, बोगस ट्विट करतात ते आणि तुम्ही दाखवता. प्रत्येक गोष्टीचा त्यांच्याकडून पुरावा मागितला पाहिजे. महापालिकेची गाडी मी वापरली नाही, लोकसभा निवडणुकीत मध्ये मी दिलं आहे की, मी स्वतःची गाडी वापरली. पुण्याला एक महापौर असा मिळाला स्वतःची गाडी वापरणारा आहे. हा बोगस कार्यक्रम चालला आहे. त्याचा, कागद दाखवा आणि बातमी दाखवा. मला या माणसाबद्दल काही बोलायचे नाही. २०११ मध्ये जमीन हडपली म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल आहे. १० गुन्हे त्यांच्यावर दखल आहेत माझ्यावर एकही नाही. त्यांना काय काम धंदा नसल्याचे मोहोळ यांनी सांगितले आहे.

# तोपर्यंत पोलिसी अत्याचाराला आळा बसणार नाही -वडेट्टीवार

**नागपूर/प्रतिनिधी :** साता-यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर काही महिन्यांपासून पोलिस आणि आरोग्य विभागाच्या एका वादात अडकली होती. तपासणीसंदर्भात पोलिसांशी झालेल्या वादानंतर तिच्यावर अंतर्गत चौकशी सुरू झाली. या चौकशीमुळे ती महिला ड?क्टर मोठ्या मानसिक तणावाखाली होती. तसेच, पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे तिने हातावर लिहिले आणि त्यानंतर तिने टोकाचे पाउल उचलले. घडलेल्या घटनेनंतर राजकीय नेतेमंडळींकडून महायुती सरकारवर टीका केली जात आहे. काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनीही यावर चिंता व्यक्त केली असून रोखठोक भूमिका मांडली आहे. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणावर सोशल मीडिया एक्सवरून प्रतिक्रिया दिली. जेव्हा रक्षकच बनतो भक्षक! फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने फाशी घेत आत्महत्या केली. आत्महत्या करताना त्यांनी हातावर सुसाईड नोट लिहिली आहे. त्यात उल्लेख आहे, पोलिस निरीक्षक गोपाल बदने याने त्यांच्यावर चार वेळा बलात्कार केला, तर पोलिस प्रशांत बनकर याने त्यांना सतत मानसिक त्रास दिला.



पोलिसांचे काम हे रक्षण करण्याचे आहे पण तेच जर महिला डॉक्टरचे शोषण करत असतील तर न्याय मिळणार कसा? या मुलीने याआधी तक्रार करू नही कारवाई का झाली नाही? महायुती सरकार वारंवार पोलिसांना पाठीशी घालत आहे, त्यातूनच पोलिस अत्याचार वाढत आहे. या प्रकरणी नुसते चौकशीचे आदेश देउन उपयोग नाही. या पोलिसांना नोकरीतून बडतर्फ केले पाहिजे. नाही तर तपासावर ते दबाव टाकू शकतात. आधी तक्रार करूनही त्याची दखल का घेण्यात आली. आधी, कोणी दुर्लक्ष केले, या पोलिसांना पाठीशी घालणा-यांवर कारवाई केली पाहिजे. पोलिसांवर कारवाई होत नाही तोपर्यंत पोलिसी अत्याचाराला आळा बसणार नाही असे वडेट्टीवार यांनी ठणकावून सांगितले.

# सुजात आंबेडकरांच्या नेतृत्वात छत्रपती संभाजीनगरमध्ये वंचितचा जनआक्रोश मोर्चा

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काही कार्यकर्त्यांनी छत्रपती संभाजीनगरमधी एका कालेजसमोर सदस्य नोंदणी अभियान राबवले. यावरुन राज्यातील वातावरण तापले आहे. याच पार्श्वभूमीवर आज वंचित बहुजन आघाडीनं (सुजात आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली शहरातील संघाच्या कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढला आहे.पोलिसांनी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होउ शकतो, असा इशारा देत मोर्चाला परवानगी नाकारली होती. तरीदेखील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते क्रांती चौकात मोठ्या संख्येनं जमले. हातात फलक आणि झेंडे घेउन त्यांनी एकच साहेब, बाबासाहेब आणि RSS विरोधातील घोषणांनी परिसर दणाणून सोडला. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी क्रांती चौक ते संघाच्या कार्यालयाकडे जाणारे सर्व मार्ग बंद केले असून, मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.मोर्चादरम्यान बोलताना सुजात आंबेडकर म्हणाले की, आमच्याकडे एकही खासदार, आमदार नाही. आम्ही सत्तेतही नाही. पण, संविधान वाचवण्यासाठी, न्याय आणि हक्कासाठी आम्ही सर्वात पुढे आहोत. संघाने भारतीय कायद्यानुसार आपली नोंदणी





केली आहे का? असेल तर त्यांनी नोंदणी प्रमाणपत्र दाखवावं. नसेल, तर प्रथम संघानं स्वताची नोंदणी करावी आणि भारतीय कायद्यांनुसार कामकाज करावं. आरएसएसची नोंदणी आहे का, हे देशाला माहीत असणं गरजेचं आहे. यावेळी क्रांती चौकात कार्यकर्त्यांकडून भाजप आणि संघविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.हा मोर्चा वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते राहुल मकासरे आणि आंबेडकरवादी तरुणांवर दाखल केलेल्या गुन्ह्यांविरोधात आयोजित करण्यात आला आहे. युवा जिल्हाध्यक्ष सतीश गायकवाड यांनी या वेळी उपस्थितांना शपथ दिली की, आंदोलनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि संविधानिक चौकटीत राहून लढा द्यावा.

# पाक भारतात खेळणार नाही

## पाकने वर्ल्डकपमधून नाव काढून घेतले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पाकिस्तानचे क्रीडा क्षेत्र उद्ध्वस्त होताना दिसू लागले आहे. भारतात पुढील महिन्यात होणा-या एफआयएच पुरुष ज्युनियर हॉकी विश्वचषक स्पर्धेतून पाकिस्तानने आपल्या संघाचे नाव काढून घेतले आहे. भारतासोबतचा तणाव आणि सुरक्षा अशी दोन कारणे देत पाकिस्तानने पळ काढला आहे.२८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत चेन्नई आणि मदुराई येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. पाकिस्तान हॉकी महासंघाने या स्पर्धेतून माघार घेतल्याची माहिती दिली आहे. पाकिस्तानची महिला क्रिकेट टीम विश्वचषक स्पर्धेसाठी भारतात आहे. तसेच २०२३ मध्ये पाकिस्तानी क्रिकेट संघदेखील भारतात खेळून गेला आहे. नुकत्याच झालेल्या आशिया कपवेळी मात्र पाकिस्तान संघाने भारतात न खेळण्याची भूमिका घेतली होती. परंतू, हॉकी संघाला सुरक्षेची कोणती काळजी लागली आहे, हे पाकिस्तानलाच माहिती आहे. पाकिस्तान हॉकी महासंघाचे सचिव राणा मुजाहिद यांनी दिलेल्या माहितीनुसार, आम्ही आपल्या सरकारचा सल्ला घेतला



आहे. सध्याची परिस्थिती अनुकूल नाही. विद्यमान राजकीय तणावामुळे ज्युनियर संघाला भारतात पाठवणे शक्य होणार नाही, कारण हा एक मोठा सुरक्षा धोका असणार आहे, असे सरकारने म्हटले आहे. तसेच आम्ही अलीकडील आशिया कप क्रिकेट स्पर्धेत भारत-पाकिस्तान संबंधात अंतर पाहिले. भारतीय खेळाडूंनी आमच्या खेळाडूंशी हस्तांदोलन केले नाही आणि त्यांनी मोहसिन नकवीकडून ट्रॉफी स्वीकारण्यासही नकार दिला आहे.

# कार्बाइड गनमुळे 150 जणांची दृष्टी गेली:मध्यप्रदेशात 300 लोक ॲडमिट

## डॉक्टरांनी सांगितले- प्रत्यारोपणासाठी कॉर्निया मिळवणे कठीण

**भोपाळ/वृत्तसंस्था :** दिवाळीत फटाक्यांऐवजी वापरल्या जाणा-या घरगुती कार्बाइड बंदुकांमुळे मध्य प्रदेशात आतापर्यंत ३०० लोकांना डोळ्यांना दुखापत झाली आहे. नेत्रतज्ज्ञांच्या मते, सुमारे ५०% रुग्णांची दृष्टी गेली आहे. त्यांना फक्त वार्म व्हाइट लाइट गोल दिसतो.डोळे वाचवण्यासाठी अम्नीओटिक मेम्ब्रेन इम्प्लांट्स आणि टिश्यू ग्राफिटंगसारख्या प्रक्रियांचा प्रयत्न केला जात आहे. कार्नियल प्रत्यारोपण हा शेवटचा उपाय असेल, परंतु इतक्या मोठ्या संख्येने प्रत्यारोपणासाठी आवश्यक असलेले कार्निया मिळवणे कठीण आहे.भोपाळमध्ये अशा १६२ लोकांना विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ग्वाल्हेर, इंदूर आणि विदिशासह इतर ठिकाणी अशाच प्रकारच्या घटनांमध्ये ७ ते १४ वयोगटातील मुले प्रभावित झाली आहेत. मोठ्या संख्येने झालेल्या जीवितहानीनंतर प्रशासन जागे झाले आणि गुरुवारी रात्री कार्बाइड बंदुकांच्या विक्री, खरेदी आणि साठवणुकीवर बंदी घातली. भोपाळ आणि ग्वाल्हेरमध्ये बंदुका विकताना आढळलेल्या दोघांना अटक करण्यात आली. आयसीएमआरने दोन वर्षांपूर्वी इशारा दिला





होता.या घटनांमध्ये, हे देखील समोर आले आहे की ही कार्बाइड गन घरगुती माकडांना दूर ठेवणारी म्हणून सोशल मीडियावर प्रसारित केली जात होती. २०२३ मध्ये, आयसीएमआर (इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च) भोपाळने या सुधारित प्रणालीबद्दल इशारा जारी केला होता.संस्थेतील शास्त्रज्ञांनी त्यांच्या संशोधनात असे उघड केले की कॅल्शियम कार्बाइड आणि पाण्याच्या रासायनिक अभिक्रियेतून निर्माण होणारा एसिटिलीन हा वायू केवळ स्फोटक स्फोट घडवून आणत नाही तर दृष्टीलाही हानी पोहोचवू शकतो. हा अभ्यास इंडियन जर्नल ऑफ ऑप्थॅल्मोलाजीमध्ये प्रकाशित झाला होता. असे असूनही, वेळेत योग्य कारवाई करण्यात आली नाही.शुक्रवारी सकाळी ७ वाजताच्या सुमारास उपमुख्यमंत्री राजेंद्र शुक्ला कार्बाइन गनने जखमी झालेल्या तरुण आणि मुलांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी हमीदिया रुग्णालयात पोहोचले. त्यांनी डॉक्टरांकडून जखमींची विचारपूस केली आणि त्यांच्यावर होणा-या उपचारांवर सतत लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. शुक्ला सुमारे एक तास रुग्णालयात होते.अपघातात जखमी झालेल्या ३७ रुग्णांपैकी ३२ रुग्णांना आवश्यक उपचारानंतर घरी सोडण्यात आल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पाच रुग्णांवर अजूनही उपचार सुरू आहेत. बेकायदेशीरपणे फटाके बनवणा-या किंवा स्फोटक पदार्थ बाळगणा-यांविरुद्ध सखोल चौकशी सुरू असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. दोषी आढळणा-यांवर कठोर कारवाई केली जाईल. विविध रुग्णालयांमधून मिळालेल्या माहितीनुसार, भोपाळमध्ये आतापर्यंत कार्बाइड गनच्या दुखापतींचे १६२ रुग्ण आढळले आहेत. आरोग्य विभागाला अद्याप या संपूर्ण प्रकरणाची माहिती देण्यात आलेली नाही. परिस्थिती इतकी भयानक आहे की विभागाने अधिकृत आकडेवारीही जाहीर केलेली नाही.

आयसीएमआरच्या संशोधकांच्या मते, या तोफांमध्ये असलेले कॅल्शियम कार्बाइड पाण्याच्या संपर्कात आल्यावर एसिटिलीन वायू तयार करते. हा वायू अत्यंत ज्वलनशील आहे आणि जेव्हा तो पेटवला जातो तेव्हा सूक्ष्म स्फोट होतो, ज्यामुळे डोळ्यांना थेट नुकसान होते. सहा रुग्णांवर केलेल्या संशोधनातून असे दिसून आले की बंदुकीने क?र्निया देखील जाळला होता. दोन रुग्णांच्या पापण्या आणि त्वचेला जळाल्या होत्या, तर एका रुग्णाच्या क?र्नियलमध्ये छिद्र पडले होते. एका ९ वर्षांच्या मुलाच्या डोळ्याला इतके गंभीर नुकसान झाले होते की त्याची दृश्य तीक्ष्णता ६/६० पर्यंत घसरली, म्हणजेच त्याला फक्त सावल्याच दिसत होत्या. जवळजवळ सर्व प्रकरणांमध्ये, दुखापतीनंतर २४ तासांनी कॉर्निया पांढरा झाला, ज्यामुळे जवळजवळ पूर्णपणे दृष्टी गेली.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# हा व्यर्थ भार विद्येचा ?

अमेरिकेच्या शहराशहरांत ट्रम्प यांचा निषेध हजारोंच्या उपस्थितीत होऊ लागलेला आहे; त्यात अमेरिकावासी भारतीय सध्या तरी मोठ्या प्रमाणावर दिसत नाहीत.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची जाहीर विधाने आणि पूर्वी रेकॉर्ड अडकण्याचे व्हायचे तसे प्रकार यांत विलक्षण साम्य दिसते. भारताने यापुढे रशियाकडून तेल खरेदी न करण्याचे निर्णय घेतल्याचे विधान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा केले. यातून हे साम्य पुन्हा समोर येते. याआधी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध आपण थांबविले हे विधान त्यांनी आतापर्यंत ३५ वेळा वा अधिक प्रसंगी केल्याचे आढळेल. त्यात तुलनेत भारत-रशिया तेल खरेदीबाबतचे विधान तूर्त तीन वेळाच झालेले आहे. पण हे तीनही प्रसंग दोन दिवसांतील आहेत. सर्वसाधारण कोणी इसम असता तर दोन दिवसांत तीन वेळा म्हणजे दोन महिन्यांत किती वेळा असे काही त्रैराशिक मांडताही आले असते. पण ट्रम्प यांच्याबाबत तीही सोय नाही. गडी कोणत्याच समीकरणात बसत नाही. आता तर ते नुसते रशियाचे तेल भारत खरेदी करणार नाही, इतकेच म्हणून थांबत नाहीत. तर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपणास तसे दूरध्वनीवरील संभाषणात सांगितल्याचे त्यांचे म्हणणे आहे. पण यास ना पंतप्रधान मोदी दुजोरा देतात ना सरकार असे काही घडल्याचे नाकारते. म्हणजे आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीत होकार नाही याचा अर्थ नकार असेलच असे नाही असे ज्याप्रमाणे मानले जाते त्याप्रमाणे याही प्रकरणी ट्रम्प संवाद झाल्याचे अद्याप नाकारण्यात आलेले नाही म्हणून तो तसा झाला असेही मानण्याचे कारण नाही. तो झाला असेलही. वा नसेलही. आपण रशियाकडून तेल खरेदी सुरूही ठेवू शकतो. किंवा ती थांबवूदेखील शकतो. प्रश्न तेलाचा नाही. तर ट्रम्प यांचे करायचे तरी काय; हा आहे. या ट्रम्प यांचे पुन्हा नव्याने व्हाइट हाऊसात नसणे हे आपणासाठी खोळंबा असेल असे आपले आपणास सुरुवातीस वाटले. त्यातूनच 'अगली बारष्ठ' ची हाळी गेल्या वेळी दिली गेली. पण तेव्हा ती फळली नाही. त्या हाकेस आता प्रतिसाद मिळाला आणि खरोखरच ते आले. त्यामुळे आपणास आणि अमेरिकेतील 'आपल्यांस' कोण आनंद झाला. विश्वाच्या प्रगतीचा सूर्य आता पूर्वेकडील भारतात उगवणार आणि पश्चिमेच्या अमेरिकेत मावळणार असेच जणू सर्वांस वाटू लागले. अमेरिकेतील अनेक भारतीयांस तर इतका हर्षवायू झाला की तो वायू शरीरांत मावेना. तो मुक्त झाल्याने अमेरिकेच्या किनाऱ्यावर वादळे आली. तथापि ट्रम्प यांनी या सगळ्यावर आपल्या वर्तनाने पाणी ओतले. त्यामुळे भारतातील अमेरिकावाद्यांचा जसा हिरमोड झाला त्यापेक्षा अधिक दुःख 'ग्रीनकार्ड'धारी असूनही भगवा जीव की प्राण मानणाऱ्यांचा झाला. अनेकांनी तर 'हेचि फल काय मम तपाला' असे म्हणत कपाळास हात लावला, असे म्हणतात. ट्रम्प सत्तेवर यावेत यासाठी भारतीयांनी काय नाही केले? अनुष्ठाने केली, जपजाप्य केले, रिपब्लिकनांना निधी दिला, आअमेरिकी (आसेतुच्या धर्तीवर) हिंदूंचे मेळावे घेतले. या सगळ्याचा परिणाम होऊन ते सत्तेवर आलेही. पण घास भरवणाऱ्या हाताचाच चावा घेण्याचा उच्च दर्जाचा कृतघ्नपणा त्यांनी दाखवला आणि भारतालाच वरचेवर अडचणीत आणणे सुरू केले. आयात शुल्क म्हणू नका, पाकिस्तानची तळी उचलणे म्हणू नका, भारताची बदनामी म्हणू नकाष्ठ ! ट्रम्प यांनी आपला जमेल तितका अवमानच केला. आपण काही चीन वा ब्राझीलसारखे उद्धट नाही. चांगले संस्कार झालेले आहेत आपल्यावर. त्यामुळे या अपमानामुळे अंगाला भोके तर नाही ना पडतष्ठ असा विचार करत, आपल्या निसर्गदत्त सहिष्णुतेचे प्रदर्शन करत आपण ट्रम्प यांच्या वर्तनाकडे दुर्लक्ष केले. आपण लोकशाहीची जननी. म्हणजे माता. म्हणजेच मूर्तिमंत क्षमाशीलता. तिचाच आविष्कार या दुर्लक्षातून दिसतो. पण यातून काही धडा घेतील तर ते ट्रम्प कसले. त्यांची टकळी आपली सुरूच. भारत-पाकिस्तान युद्ध आपण थांबवल्याची (असत्य) दर्पोक्ती त्यांनी किती करावी? ती संपायच्या आत आता हा रशियन तेल खरेदी भारत थांबवणार असल्याचा ते देत असलेला निर्वाळा. त्याकडे आपल्या नेतृत्वाने दुर्लक्ष केले ते योग्यच. खातेऱ्यात दगड टाकला की घाणीचे शिंतोडे आपल्यावरच उडतात, हे लक्षात घेऊन आपल्या नेत्यांनी ट्रम्प यांच्या सर्वच वक्तव्यांकडे काणाडोळा करण्याचा पोक्तपणा नेहमीच दाखवला. ट्रम्प, चीनचे क्षी जिनपिंग वगैरेंबाबत आपण काही बोलतच नाही तेच बरे. पण आपल्या नेत्यांचे मौन त्यांच्या अमेरिकावासी समर्थकांनीही पाळावे असे काही नाही. म्हणूनच भारत सरकारने ट्रम्प वक्तव्यांकडे दुर्लक्ष करण्याचा मार्ग चोखाळला असला तरी अमेरिकावासी भारतीयांनी मात्र आता ठाम भूमिका घेण्याची वेळ आलेली आहे, हे निश्चित. या अमेरिकास्थित भारतीयांची मातृभूमीवर (म्हणजे भरतभूवर) किती निष्ठा आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. 'एचवनबी' मार्गाने असो, 'एमएस' करण्याच्या मिषाने असो वा तेथे आधीच गेलेल्याचे जोडीदार म्हणून जाणे असो; सच्चा भारतीय हा अमेरिकेत जाण्याची एकही संधी सोडत नाही. पण त्यामागे त्यांचे भारतावर असलेले प्रचंड प्रेम असते हे येथे राहणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे. 'घार हिंडते आकाशी, चित्त तिचे पिलांपाशी', हा झाला इतिहास. वर्तमान 'पिल्ले कमावती डॉलर, चित्त त्यांचे रुपयावर' असे आहे. हे सारे भारतमाताप्रेमी तेथे राहून घाम गाळतात, डॉलर कमावतात आणि त्यांच्या मूठभर डॉलरांची घरवापसी करून भारतात परातभर रुपये होतात ही केवढी देशसेवा. भारतमातेच्या चरणी गेल्या वर्षी जवळपास १३,५०० कोटी डॉलर जमा झाले. त्यातील साधारण २७-२८ टक्के एकट्या अमेरिकेतून आले. यावरून अमेरिकावासी भारतीय किती कमावतात हे दिसते. आता या साऱ्यांनी आपली शारीरिक आणि आर्थिक कमाई देशप्रेमासाठी- म्हणजे ट्रम्प यांच्या विरोधात- पणाला लावावी आणि भारताचा वारंवार अपमान करणाऱ्या या अमेरिकी अध्यक्षास धडा शिकवावा. अनेक हिंदू-धर्माभिमानी संघटनांच्या अमेरिकी शाखा आहेत. त्या शाखाशाखांतून ट्रम्प यांच्याविरोधात राजकीय डावपेचांचे आदेश देता येतील. त्याचबरोबर ट्रम्प यांस घायकुतीला आणण्याचा आणखी एक मार्ग सध्या अमेरिकेत उपलब्ध झालेला आहे. तो म्हणजे निदर्शनांचा. 'सम्राट' ट्रम्प यांच्या विरोधात त्या देशातील लोकशाहीप्रेमी एकवटले असून अमेरिकेच्या शहरा-शहरांत ट्रम्प यांचा निषेध हजारोंच्या उपस्थितीत होऊ लागलेला आहे. या जमावात अमेरिकावासी भारतीय सध्या तरी मोठ्या प्रमाणावर दिसत नाहीत, पण देशप्रेमासाठी त्यांनी जरूर सामील व्हावे आणि भारतीयांच्या संख्येची ताकद दाखवावी. त्यासाठी वाटल्यास आपल्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचे सहाय्य घ्यावे. इतरांचा कात्रजचा घाट करण्याचे कौशल्य त्यांच्या ठायी मुबलक आहे असे मानण्याचा प्रघात आहे. तेव्हा त्यांची मदत घेऊन ट्रम्प यांच्या विरोधात तेथील भारतीयांनी अवघा हलकल्लोळ करावा. तो करता येणे आपल्या भारतीयांस तसे अवघड न जावे. नवरात्रीतील गरबा, गणेशोत्सव आदींच्या मिरवणुका परदेशी भूमींवर काढून तेथील मंडळींची श्रवणशक्ती बधिर करण्याचा अनुभव तसेही परदेशस्थ भारतीयांसही मुबलक असेलच. तो त्यांनी आता ट्रम्प यांच्या भारतविरोधी भूमिकेच्या विरोधासाठी कामी आणून त्यांच्यावरील दबाव वाढवावा. आपल्या नेत्यांची ट्रम्प यांच्याकडून वारंवार केली जाणारी अडचण रोखायची असेल तर आता हाच एक मार्ग आहे. अमेरिकेतील भारतीयांनो एक व्हाष्ठ! तसे आपण ट्रम्प यांच्या विरोधात एक झालो नाही तर 'हा व्यर्थ भार विद्योचा' असेच म्हणावे लागेल आणि त्यानंतर 'ही फसगत झाली तैशी' हे मान्य करून उपयोग होणार नाही.

**काश्मीर खोरे हा एक सुंदर, पण वादग्रस्त हिमालयीन प्रदेश आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तान आणि भारतात अनेक युद्धे झाली आहेत. चीनचेदेखील या प्रदेशाच्या उत्तरेकडील दोन भागांवर नियंत्रण आहे. भारताने पाकव्याप्त काश्मीर परत घेण्याची भाषा वारंवार वापरली आहे. चीन पाकिस्तानचा मित्र असला, तरी पाकिस्तान चीनने व्यापलेल्या भागांशिवाय संपूर्ण काश्मीरवर दावा करतो. २०१७च्या जनगणनेनुसार पाकव्याप्त काश्मीरची लोकसंख्या ४० लाखांहून अधिक आहे. पाकव्याप्त काश्मीरला पंतप्रधान आणि विधानसभेला अर्ध-स्वायत्तता आहे.**

# पाकव्याप्त काश्मीरमधील होरपळ



पाकव्याप्त काश्मीरमध्ये निदर्शक आणि सुरक्षा दलांमध्ये अलीकडेच झालेल्या हिंसक चकमकीत तीन पोलीस अधिकाऱ्यांसह नऊजणांचा मृत्यू झाला. दोन्ही बाजूंचे डझनभर लोक जखमी झाले. परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी संघीय सरकारने एक वाटाघाटी समिती पाठवली होती. नुकतीच पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीर संयुक्त अवामी कृती समिती (जेएएसी) सोबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यासाठी ती मुझफ्फराबाद येथे पोहोचली होती. ही समिती व्यापाऱ्यांचे आणि नागरी समाज गटांचे प्रतिनिधित्व करणारी एक प्रमुख संघटना आहे, जी संपूर्ण प्रदेशातील तळागाळातील असंतोषाचा आवाज म्हणून उदयास आली आहे. या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, कार्यकर्ते शौकत नवाज मीर यांच्या नेतृत्वाखाली 'जेएएसी'ने आयोजित केलेला बंद २९ सप्टेंबर रोजी सुरू झाला. त्यामुळे पाकिस्तान प्रशासित काश्मीरमधील अनेक जिल्हे, ज्यांना स्थानिक पातळीवर आझाद जम्मू आणि काश्मीर (एजेएके) म्हणून ओळखले जाते, ते पूर्णपणे ठप्प झाले.

सरकारने तिथे २८ सप्टेंबरपासून संपूर्ण संप्रेषण ब्लॅकआउट लागू केले आहे, रहिवाशांचे मोबाइल टेलिकम्युनिकेशन आणि इंटरनेट कनेक्शन खंडित केले आहे. मुझफ्फराबादमधील गजबजलेल्या बाजारपेठा बंद आहेत, तर रस्त्यावर विक्रेतेही नाहीत. सार्वजनिक वाहतूक ठप्प आहे. या गोंधळामुळे प्रदेशातील सुमारे ४० लाख रहिवासी अनिश्चिततेच्या स्थितीत बुडाले आहेत. सरकारने एका निवेदनात म्हटले आहे, की अधिकारी सुव्यवस्था पुनर्संचयित करण्यासाठी काम करत आहेत आणि जनतेला विशिष्ट अजेंडा घेऊन 'सोशल मीडिया'वर पसरवल्या जाणाऱ्या प्रचार आणि खोट्या बातम्यांनी प्रभावित होऊ नये, असे आवाहन केले आहे. गेल्या दोन वर्षांमधील या भागात हे तिसरे मोठे आंदोलन आहे. सरकारने समितीच्या ३८ सूत्री मागण्या मान्य न केल्यामुळे हे आंदोलन सुरू झाले. पाकव्याप्त काश्मीरमधील स्थानिक सरकार आणि आंदोलकांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून सुरू झालेला संघर्ष थांबायला तयार नाही. या संघर्षामागचे कारण जाणून घेतले पाहिजे.

काश्मीर खोरे हा एक सुंदर, पण वादग्रस्त हिमालयीन प्रदेश आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तान आणि भारतात अनेक युद्धे झाली आहेत. चीनचेदेखील या प्रदेशाच्या उत्तरेकडील दोन भागांवर नियंत्रण आहे. भारताने पाकव्याप्त काश्मीर परत घेण्याची भाषा वारंवार वापरली आहे. चीन पाकिस्तानचा मित्र असला, तरी पाकिस्तान चीनने व्यापलेल्या भागांशिवाय संपूर्ण काश्मीरवर दावा करतो. २०१७च्या जनगणनेनुसार पाकव्याप्त काश्मीरची लोकसंख्या ४० लाखांहून अधिक आहे. पाकव्याप्त काश्मीरला पंतप्रधान आणि विधानसभेला अर्ध-स्वायत्तता आहे. सध्याच्या अशांततेचे मूळ मे २०२३ मध्ये आहे. या भागातील नागरिक गगनाला भिडणाऱ्या वीज बिलांचा निषेध करण्यासाठी प्रथमच रस्त्यावर उतरले होते. पिठाची प्रचंड तस्करी आणि अनुदानित गव्हाच्या पुरवठ्यात तीव्र कमतरता असल्याच्या तक्रारी होत्या. ऑगस्ट २०२३ पर्यंत या वेगळ्या तक्रारींचे रूपांतर संघटित प्रतिकारात झाले. त्या वर्षी सप्टेंबरमध्ये शेकडो कार्यकर्ते मुझफ्फराबादमध्ये जमले आणि त्यांनी औपचारिकपणे 'जेएएसी'ची स्थापना केली. त्यात या प्रदेशातील सर्व जिल्ह्यांचे प्रतिनिधी समाविष्ट होते.

मे २०२४ मध्ये निदर्शकांनी मुझफ्फराबादकडे 'लाँग मार्च' सुरू केला, तेव्हा या आंदोलनाची पहिली मोठी तीव्रता दिसून आली. आंदोलनाला हिंसक वळण लागले. त्यात एका पोलीस अधिकाऱ्यासह किमान पाच जणांचा मृत्यू झाला. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पिठाच्या किमती आणि वीजदरात कपात यांसारख्या प्रमुख मागण्या मान्य केल्या, तेव्हाच हिंसक निदर्शने थांबली. पीठ परवडणाऱ्या दरात मिळावे आणि वीजदरात कपात करावी, यासाठी सरकारने अब्जावधी रुपयांचे अनुदान वाटप केले. तथापि, ही शांतता फार काळ टिकली नाही. त्याच वर्षी ऑगस्टमध्ये 'जेएएसी'ने आणखी एक टाळेबंदी लागू करण्याची घोषणा केली. 'जेएएसी'ने सादर केलेल्या मागण्यांमध्ये ३८ विशिष्ट मुद्दे समाविष्ट आहेत. या मागण्यांमध्ये मोफत शिक्षण आणि आरोग्य सेवा प्रदान करणे, मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू करणे आणि प्रांतीय कायदेमंडळाची रचना बदलणे यांचा समावेश आहे. या यादीच्या वरच्या भागात सत्ताधारी वर्गाचे विशेषाधिकार संपवण्याची मागणी करण्यात आली आहे. ही मागणी मागील तक्रारींमध्येदेखील अधोरेखित करण्यात आली होती. 'जेएएसी'ने म्हटले आहे, की मे २०२४ च्या निषेधानंतर सरकारने वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या विशेषाधिकारांचा आढावा घेण्यासाठी न्यायिक आयोगाची स्थापना मान्य केली.

ताज्या अस्वस्थतेनंतर मात्र येथे स्थानिक प्रशासनाने दळणवळण बंद केले असून शैक्षणिक संस्था अनिश्चित काळासाठी बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्याहूनही वादग्रस्त म्हणजे त्यांनी अर्धसैनिक दलांसह उर्वरित पाकिस्तानमधून अतिरिक्त पोलीस तुकड्या बोलावल्या आहेत. पाकिस्तानी संघराज्य सरकारने या संघर्षात नऊजणांचा मृत्यू झाल्याचे म्हटले आहे; परंतु वरिष्ठ स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांनी मृतांची संख्या १५ असल्याचे सांगितले आहे. 'जेएएसी'ने अर्धसैनिक दलांच्या तैनातीवर आक्षेप घेतला आहे. 'जेएएसी' नेते मीर यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला पत्रकारांना सांगितले, की स्थानिक पोलीस आधीच उपस्थित असल्यामुळे मुख्य भूमी पाकिस्तानमधून निमलष्करी दलांना बोलावण्याची गरज नाही. पाकव्याप्त काश्मीरचे अर्थमंत्री अब्दुल मजीद खान यांनी कबूल केले, की चर्चेची पहिली फेरी आधीच झाली असली, तरी आता एक नवीन समिती मुझफ्फराबादमध्ये आली आहे. तिला निदर्शकांच्या तक्रारींचे निराकरण करण्याचे काम देण्यात आले आहे. खान यांनी सरकारचा बचाव करताना म्हटले आहे, की गेल्या वर्षी त्यांनी निदर्शने सुरू केली, तेव्हा ते सर्व वीज आणि पिठाच्या किमतींबद्दल होते आणि आम्ही यावर सहमत झालो; परंतु त्यांनी हेदेखील समजून घेणे आवश्यक आहे, की गोष्टी एका रात्रीत बदलू शकत नाहीत आणि त्यासाठी वेळ लागतो. 'जेएएसी'च्या ३८ मुद्द्यांपैकी बहुतेक मुद्द्यांवर सरकारने सहमती दर्शवली आहे; परंतु निर्वासितांसाठी राखीव बारा जागा रद्द करणे आणि 'सत्ताधारी वर्गाचे विशेषाधिकार' संपवण्याच्या मुद्द्यांवर वाटाघाटीवरून बोलणी फिसकटले आहे. उपखंडाच्या फाळणीच्या वेळी झालेल्या गैरसोयीकडे लक्ष वेधून मंत्र्यांनी निर्वासितांसाठी राखीव जागा रद्द करण्यामागील तर्काला आव्हान दिले. खान यांनी युक्तिवाद केला, की हे असे लोक आहेत, ज्यांचे कुटुंब भारतातून आले होते. तिथे ते जमीनदार आणि व्यापारी होते; परंतु त्यांची मालमत्ता मागे सोडून अत्यंत गरिबीत पाकिस्तानात पळून गेले.

'जेएएसी'ला वाटते, की त्यांना जागांचा कोटा देणे अन्यायकारक आहे. मंत्री स्वतः या प्रदेशातील अंदाजे २.७ दशलक्ष लोकांमध्ये आहेत, ज्यांच्या कुटुंबांनी भारताच्या काश्मीरमधून स्थलांतर केले. दरम्यान, 'जेएएसी'च्या बहुतांश मागण्या पूर्ण झाल्या आहेत, असा दावा करून खान यांनी पुन्हा निदर्शने करण्याचे कारण काय, असा प्रश्न उपस्थित केला. सरकारी प्रतिनिधी आणि 'जेएएसी' सदस्यांमधील चर्चा कोणत्याही तोडग्याशिवाय संपली. या भागातील नाराजी आणि अस्वस्थता किती लवकर संपेल हे काळच सांगेल.

**प्रा. जयसिंग यादव**

## राजकारणातील 'बेछूट आरोप' हे नवे शस्त्र...

काँग्रेस नेते राहुल गांधी यांना बेछूट आरोप करण्याची सवय आहे. कोणत्याही गोष्टीची शहानिशा न करता आरोप करून मोकळे व्हायचे. त्याचे दुष्परिणाम काय होतात याची काळजी ते घेत नाहीत, कारण ते दुष्परिणाम त्यांना राजकीयदृष्ट्या भोगावे लागत नाहीत.

अलीकडील राजकारणात याची लाट अथवा प्रवृत्ती सर्वच राजकीय नेत्यांमध्ये पसरली आहे, असे वाटू लागले आहे. कारण यासाठी जास्त पैसा खर्च करावा लागत नाही. सहजतेने काम होते आणि समोरच्या राजकीय नेत्यांचे कायमचे राजकीय नुकसान होते. यासाठी फारसे कागदपत्रांचे पुरावे जमा करावे लागत नाहीत.अलीकडील राजकारणात अनेक अशी उदाहरणे आपल्याला दिसतील. जगाच्या सध्याच्या युद्ध नितीत आपण पाहतो की, काही अशी क्षेपणास्त्रे वापरली जात आहेत की ज्यामुळे मानवी जीवितहानी न होता मोठ्या प्रमाणावर समोरच्या शत्रूचे अतोनात नुकसान होते.

हाच फॉर्म्युला आता राजकारणात वापरला जात आहे. जास्तीत जास्त काय होईल? कायदेशीर दृष्ट्या समोरचा नेता अब्रुनुकसानीचा दावा दाखल करेल. तोपर्यंत आरोप करणारा माफी मागून घेतो. कारण 'राजकारणात कोणी कायमचा शत्रू नसतो,' या तत्त्वाचा आधार घेऊन हा प्रश्न मिटवला जातो, कारण यात आरोप करणाऱ्याला फारशी झळ पोहोचत नाही.

सध्याच्या राजकारणात 'सत्य' आणि 'पुराव्याचे राजकारण' हा आधार डळमळीत झाला आहे. बेछूट आरोप हे आता राजकीय शस्त्र बनले आहे; जे शत्रूला मारत नाही, पण त्याला सार्वजनिक दृष्ट्या पूर्णपणे निःशस्त्र करते. राजकारणातील ही नवी प्रवृत्ती दीर्घकाळ चालली, तर 'जबाबदारीची' आणि 'सत्यतेची' संकल्पनाच लोप पावेल. राजकीय आरोप म्हणजे सत्याच्या कसोटीवर सिद्ध झालेले/पारखलेले शस्त्र असायला हवे, नुसते 'टायमिंग' साधून केलेले 'स्फोटक' नको. ही सवय केवळ राजकीय नेत्यांनाच नाही, तर लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाला घातक आहे.

**अविनाश देशपांडे**

## विद्युत रोषणाईमुळे वृक्षसंपदेला बाधा

एकीकडे पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे, वाढत्या प्रदूषणाला आळा बसावा आणि काँक्रीटच्या जंगलात अधिक झाडांमुळे हरितपट्ट्याचा विकास व्हावा या उद्देशाने मुंबईत द्रुतगतीने वाढणाऱ्या जपानी पद्धतीच्या मियावाकी वनांसारखे प्रयोग करण्यात येत आहेत. मुंबईत त्यामुळे काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात हिरवळही निर्माण झाली आहे. असे असताना काही विकृत महाभाग मात्र मुंबईत ५०-६० वर्षे अस्तित्वात असलेल्या झाडांवर खिळे ठोकून फलक, भित्तिपत्रके व जाहिराती लावणे, तारा गुंडाळणे, केबल टाकणे, विद्युत रोषणाई करणे, फोकस लावणे, धागे गुंडाळणे, बुंध्यावर नावे कोरणे यांसारखी झाडांना इजा पोहोचविणारी व मरणयातना देणारी कृत्ये करत आहेत. झाडांना खिळे ठोकल्याने विविध रोगाची लागण होते. झाडांची खोडे पोखरली जाऊन झाड हळूहळू मृतवत होते. झाडांवर विद्युत रोषणाई केल्यामुळे व फोकस लावल्यामुळे झाडांच्या प्रकाश संश्लेषण या जैवरासायनिक प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. या दिवाळीत तर मुंबईत झाडांवरील रोषणाईमुळे रात्रीच्या वेळी झाडेच दिसत नव्हती. झाडावरील अत्याचारांचे हे प्रकार मुंबईपुरते मर्यादित नसून राज्यभरातील सर्व शहरात दिसून येतात. पर्यावरण रक्षणासाठी 'झाडे लावा, झाडे जगवा, वनसंपदेचे संवर्धन करा,' असे संदेश वेळोवेळी देणाऱ्या प्रशासनाने वृक्षांवर खिळे ठोकून विद्युत रोषणाई करून पर्यावरणास बाधा आणणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करणे गरजेचे आहे.

**प्रदीप मोरे**
९८७०७७७२७४

## देशाच्या सुरक्षिततेला धोक्याची शक्यता

अलीकडेच देशातील केंद्रशासित प्रदेश लडाखमध्ये काही दिवसांपासून शांततापूर्ण मार्गाने आंदोलन सुरु होते. लेहमध्ये त्याला अचानक हिंसक वळण लागले. दगडफेक आणि जाळपोळ झाली. हिंसाचारात चारजणांचा मृत्यू झाला. आणि ऐंशीजण जखमी झाल्याच्या बातम्या आहेत. लेहमध्ये अचानक हिंसाचार घडत असेल तर सर्व संबंधित पैलूंचा विचार करणेही क्रमप्राप्त ठरते. लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा द्यावा अशी येथील लोकांची मागणी आहे. या क्षेत्राचा सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश केला जावा अशीही मागणी आहे. शांततापूर्ण आंदोलनाचा अचानक भडका उडाला. आणि त्यात ज्या प्रकारे काही ठिकाणांना लक्ष्य केले गेले ते पाहता यात राजकारणाचा वास येत आहे. राजकारण असावे, मात्र कुठे आणि कोणत्या वेळी याचे तारतम्य असायला पाहिजे. अन्यथा हा प्रकार आपण ज्या फांदीवर बसलो आहे ती फांदीच कापण्याचा शेखचिल्ली प्रकार होतो. बरे त्यावेळी शेखचिल्ली एकटा पडणार होता, येथे लडाखमध्ये भौगोलिक स्थान त्या परिसरातील संवेदनशीलता लक्षात घेता किती जबाबदारीने वागले पाहिजे याची योग्य काळजी घ्यायला पाहिजे. देशाच्या सुरक्षिततेलाच धोका निर्माण होईल असा आगीशी खेळ करण्याची आवश्यकता नाही.

आपल्या मागण्यांसाठी लडाख अपेक्स बॉडी अर्थात एलएबी चे उपोषण सुरु होते. उपोषणात बसलेल्या दोन महिलांची प्रकृती अचानक बिघडली आणि त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. त्यामुळे युवक भडकले. लडाखमध्ये स्वतंत्र विधानसभेचीही एलएबी आणि

संबंधितांची मागणी आहे. लडाखमध्ये त्यांना स्वतंत्र लोकसेवा आयोग पाहिजे आहे. आणि लोकसभेच्या लेह आणि कारगिल अशा दोन स्वतंत्र जागाही पाहिजे आहेत. केंद्र सरकारने यासंदर्भात बोलणी करण्यासाठी तारीख ठरली होती. पण त्याच्या अगोदरच हिंसाचार भडकला. सत्ताधारी पक्षाने केंद्रातीलच प्रमुख विरोधी पक्षाकडे बोट दाखवत कारस्थानाचा संशय व्यक्त केलाय. विरोधकांना शेजारी देश नेपाळसारखी परिस्थिती हवी असल्यामुळे असे घडवले गेले असा गंभीर आरोप त्यांनी केला. नागरिकांना आणि त्यांचे नेतृत्व करणाऱ्या संघटना आणि व्यक्तींना आपल्या मागण्या मांडण्याचा आणि त्यांच्या पूर्ततेसाठी आंदोलन करण्याचा निश्चितच अधिकार आहे. हे सगळे चौकटीत आणि शांततेत राहिले पाहिजे. आपले भौगोलिक स्थान आणि तेथील

असंवेदनशीलतेचा त्यांनीच विचार इला पाहिजे. अनावश्यक अस्थिर वातावरण तयार करून धोक्याचे भूत उभे करण्यात काही अर्थ नसतो.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर -९४२०५६६४०४

## शहरे गुदमरली

सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिवाळीच्या दिवसात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या फटाकेबाजीमुळे देशातील प्रमुख शहरात रात्रीच्या वेळेत हवा प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे समोर आले आहे. मंगळावर ते बुधवार या तिन्ही दिवशी देशातील प्रमुख शहरांच्या हवेचा निर्देशांक वाईट स्तरावर होता त्यामुळे आधीच प्रदूषित असलेल्या शहरांची हवा आणखी प्रदूषित झाली. वास्तविक फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा असे आव्हान अनेक सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी केले होते. शालेय शिक्षण विभागाने तर शालेय विद्यार्थ्यांना फटाके उडवणार नाही अशी शपथ दिली. मात्र वेळेचे बंधन घातले या सगळ्या आव्हानांकडे नागरिकांनी दुर्लक्ष करून मनसोक्त फटाकेबाजी केली वास्तविक फटाक्यांचे दुष्परिणाम सर्वांना माहीत आहे तरीही दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सरकारच्या आणि सेवाभावी संस्थांच्या आव्हानाला हरताळ फासत सर्वत्र फटाक्यांचा बेसुमार धूर काढण्यात आला त्याच्या व्हायचा तो परिणाम झालाच. फटाक्यांमुळे अनेक शहरांची हवा प्रदूषित झाली विशेषतः मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील हवेचे प्रदूषण चिंता वाटावी इतक्या गंभीर पातळीवर जाऊ लागले.

**श्याम ठाणेदार**
पुणे - ९९२२५४६२९५

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### वंचित बालकांसोबत सामाजिक बांधीलकीची अभिनव दिवाळी

**रायगड :** संपर्क बालग्राममधील विद्यार्थ्यांची सलग पाचव्या वर्षी मोफत आरोग्य तपासणी समाजातील काही समाज घटक विशेषत: वंचीत व अनाथ बालकांच्या आयुष्यात दिवाळी सणाचा आनंद फुलवण्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून अलिबाग तालुक्यांतील बांधण-पोयनाड येथील संपर्क बालग्राम मधील बालकांच्या मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार असा उपक्रम करण्यात येतो. यंदा देखील हा उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला आणि बालग्राममधील बालगोपाळ सुखावून गेले होते. यावेळी ४० मुलांची आरोग्य तपासणी करून त्यांना दिवाळी फराळ देखील भेट म्हणून देण्यात आला. माणुसकी प्रतिष्ठान, श्रीजा इंटरप्रायझेस श्रीजालेक्ट्रॉन, जागृती फाउंडेशनचे ,प्रभात गृह उद्योग, उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था, जन शिक्षण संस्थान आदि संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमेचे आयोजन करण्यात येते. यावेळी जन शिक्षण संस्थान रायगडचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, संचालक डॉ. विजय कोकणे, उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव- चव्हाण, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, जागृती फाउंडेशनच्या प्रभात गृह उद्योगाच्या प्रमुख रत्नप्रभा बेल्हेकर तसेच संपर्क बालग्रामचे प्रमुख साईधने व अंकुश पाटील यांच्या प्रमुख उपस्थित होते.

### महादेवा योजनेंतर्गत १३ वर्षांखालील फुटबॉल खेळाडू निवड चाचणी ३१ ऑक्टोबर रोजी

**रायगड :** शासनाचा क्रीडा विभाग,महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र),सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनयांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात फुटबॉल खेळाचा विकास,प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने महादेवा ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचाएक भाग म्हणून राज्यातील १३ वर्षांखालील मुले व मुलींसाठी जिल्हा,विभाग आणि राज्यस्तरावर फुटबॉल निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे.जिल्हास्तर निवड चाचणी ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे.अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महादेवा योजनेच्या माध्यमातून राज्यातील युवा खेळाडूंना फुटबॉल मध्ये करिअर करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. या निवड चाचणीतून निवड होणाऱ्या खेळाडूंना १४ डिसेंबर, २०२५ रोजी मुंबई येथे जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची एक अभूतपूर्व संधी मिळणार आहे. प्रवेश अर्ज,जन्मदाखला सत्यप्रत,आधारकार्ड सत्यप्रत व ०२ फोटो इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत. खेळाडूचा जन्म ०१ डिसेंबर २०१२ नंतर व ३१ डिसेंबर २०१३ पूर्वीचा असावा. https://docs.google.com/forms या लिंकवर अर्ज भरावा. निवड चाचणी दिवशी जन्म दिनांकाबाबत व क्रीडा कामगिरीबाबत आवश्यक कागदपत्रे (आधार कार्ड,जन्मप्रमाणपत्र) सत्यप्रती जोडाव्यात, असेही आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान राज्यातील खेळाडूंकरिता ही मोठी संधी असून अधिकाधीक खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन क्रिडा विभागाकडून करण्यात आले आहे.

# भारतातील ९९.९ टक्के पाणथळ जागा असंरक्षित

## नोकरशाहीच्या ढिलाईमुळे पर्यावरणाचे नुकसान होण्याची भीती

**उरण :**

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने (एमओईएफ)दिलेल्या माहितीनुसार, इस्रोने नकाशाद्वारे निश्चित केलेल्या दोन लाखांहून अधिक पाणथळ जागांपैकी केवळ १०२ पाणथळ जागांनाच भारतात कायदेशीररित्या अधिसूचित करून संरक्षण देण्यात आले आहे. परिणामी ९९.९ टक्के पाणथळ जागांना कायदेशीर संरक्षण नसल्याचे या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. यामुळे पर्यावरण संवर्धन करणाऱ्या संस्था व कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पर्यावरण संवर्धन व निरिक्षण करण्यात व्यस्त नॅटकनेक्ट फाउंडेशन या संस्थेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तातडीने पाणथळ जागांना कायदेशीर संरक्षण देण्याची विनंती केली होती. या पाणथळ जागा पूर नियंत्रण, भूजल पुनर्भरण आणि स्थलांतरित पक्ष्यांसाठी महत्वाचे आश्रयस्थान म्हणून काम करतात, असे या विनंतीत नमुद करण्यात आले होते. नॅटकनेक्टच्या या विनंतीला प्रतिसाद देताना, एमओईएफच्या पाणथळ जागा विभागाने पुष्टी केली की लाख ८९ हजार ६४४ पाणथळ जागांची जमिनीवर पडताळणी झाली आहे



आणि १ लाख १६ हजार ४२५ जागांची हद्द विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी निश्चित केली आहे. तरीही, आतापर्यंत फक्त १०२ पाणथळ जागांच्या संरक्षणासाठी औपचारिक अधिसूचना जारी करण्यात आली आहे. पाणथळ जागा शास्त्रज्ञ पंकज वर्मा यांनी नॅटकनेक्टला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, उर्वरित पाणथळ जागा पडताळण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच, इतर पाणथळ जागा अधिसूचित करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर असून त्यावर मंत्रालयाकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

मात्र, पर्यावरण संरक्षणा व संवर्धन कार्यात मग्न संस्था व कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की अपरिवर्तनीय नुकसान टाळण्यासाठी ही कारवाईची गती अत्यंत कमी आहे. नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार म्हणाले, आम्ही चिंतेत आहोत कारण अधिकृत अधिसूचनेअभावी, शहरी नियोजक पाणथळ जागांकडे दुर्लक्ष करत आहेत आणि पायाभूत सुविधांच्या विकासाच्या नावाखाली त्यांना बुजवत आहेत. कुमार यांनी पीएमओच्या सार्वजनिक तक्रार पोर्टलवर दाखल केलेली तक्रार आता औपचारिकरित्या एमओईएफच्या वेटलँड्स विभागाकडे पाठवण्यात आली आहे. त्यांनी पंतप्रधानांना, एक प्रसिद्ध निसर्गप्रेमी म्हणून, वैयक्तिकरित्या हस्तक्षेप करून देशाच्या या 'निळ्या फुफ्फुसांना' वाचवण्याचे आवाहन केले आहे.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल सांगितले आहे की त्यांनी पाणथळ जागांचे समग्र संवर्धन आणि पुनर्संचयनासाठी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना बळकटी देण्यासाठी 'राष्ट्रीय जलीय परिसंस्थांच्या संवर्धन योजना मार्गदर्शक तत्वे, २०२४' तयार केली आहेत. या योजनेचा उद्देश एकात्मिक, बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून या महत्त्वपूर्ण परिसंस्थांचा ऱ्हास थांबवणे आणि तो पूर्ववत करणे हा आहे.

### दोन लाख पाणथळ जागा गायब होण्यापूर्वी अधिसूचना काढावी

नॅटकनेक्ट संस्थेने आपल्या आवाहनात संयुक्त राष्ट्रांच्या 'जागतिक स्थलांतरित पक्षी दिन २०२५' च्या थीमचाही उल्लेख केला आहे. नॅटकनेक्टने इशारा दिला आहे की, जलद शहरी विस्तार आणि मानवी क्रियाकलाप त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण करत आहेत. त्यांनी सरकारला, इस्रोने आधीच मॅप केलेल्या २.२५ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या सर्व दोन लाखांहून अधिक पाणथळ जागा काँक्रीटखाली गायब होण्यापूर्वी त्यांची अधिसूचना त्वरित करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## पार्किंग केलेली प्रवासी गाडी थेट तलावात कोसळली

### सुदैवाने जीवितहानी टळली



**पनवेल :**

पनवेल तालुक्यातील मोहो गावात पार्किंगची सोय अपुरी असल्याने तलावाभोवती अनेक जण वाहने पार्किंग करतात. मात्र, हीच सवय एका वाहनचालकासाठी चांगलीच धोकादायक ठरली. हँडब्रेक न लावता पार्किंग केलेली प्रवासी इको गाडी २२ ऑक्टोबर रोजी थेट खोल तलावात कोसळली.

या घटनेची माहिती समजताच परिसरात मोठी गर्दी झाली. ग्रामस्थांच्या मदतीने आणि जेसीबीच्या सहाय्याने सुमारे दोन तासांच्या प्रयत्नांनंतर गाडी तलावातून बाहेर काढण्यात आली. सुदैवाने गाडीत प्रवासी नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र वाहनाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

गावातील या तलावाभोवती सुरक्षा कठडे नसल्याने अपघाताचा धोका कायम आहे. रस्ता वळणदार असल्याने विशेषत: नवीन वाहन चालकांना वळणाचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता वाढते.

## रायगड महसुल अधिकाऱ्यांची अनोखी दिवाळी

### आदिवासी वाडीवर जावून जातीच्या दाखल्यांसह दिवाळी फराळाची भेट

**पनवेल :**

दिवाळीच्या निमीत्ताने शासन यंत्रणेस सहा दिवस सलग सुट्टी सारेकाही बंद राहाण अशी सर्वसाधारण धारणा असते. परंतु कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यांतील आदई कातकरीवाडी येथे पनवेल उपविभागीय अधिकारी पवन चांडक, नायब तहसीलदार संतोष पाटील, मंडळ अधिकारी गोवर्धन माने, तलाठी प्रिया वैती, महसूल सहाय्यक दीपक पाटील यांनी आपली आदिवासी बांधवां सोबत अनोख्या पद्धतीने दिवाळी साजरी केली.

आदई कातकरीवाडी मधील आदिवासी कुटूंबांना जातीचे दाखले त्यांच्या घरी पोहोचून दिले तर यावेळी नवीन कपडे, दिवाळी फराळ देखील त्यांना देवून त्यांची दिवाळी आनंददायी केली. या उपक्रमाचे आयोजन उरण सामाजिक संस्थेच्या सहयोगाने करण्यात आले होते. यावेळी उरण सामाजिक संस्थेचे सचिव संतोष पवार , उपाध्यक्ष ॲड. राजेंद्र मढवी, रायगड भूषण दत्ता गोंधळी, सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर हे उपस्थित होते.

आदिवासी बांधवांची दिवाळी आनंददायी साजरी होण्यासाठी उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी स्वत:सर्व लहान मुलांना नवीन कपडे, सर्व कुटुंबांना दिवाळीचा फराळ यांचे वाटप केले. उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून जातीचे दाखले तयार करण्यामध्ये तलाठी प्रिया वैती, तत्कालीन तलाठी शीतल सरगर, मंडळ अधिकारी गोवर्धन माने, आदिवासी विकास प्रकल्प अधीक्षक पनवेल, तहसीलदार पनवेल मीनल भामरे यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमामुळे सर्व आदिवासी लोकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. ॲड राजेंद्र मढवी यांनी सर्व उपस्थित अधिकारी आणि पाहुण्यांचे आभार मानले.



> दिवाळी झाल्यावर आदई कातकरीवाडीतील या आदिवासी कुटूंबांसह पनवेल तालुक्यातील सर्व आदिवासी कुटूंबांच्या घरांसाठी असलेला घरठाण योजने अंतर्गत घरांचा प्रस्ताव तयार करून त्याची सातबारा उताऱ्यावर अधिकृत नोंद करून देण्याची विशेष मोहीम राबविण्यात आहे.
>
> **- पवन चांडक,**
> उपविभागीय अधिकारी,पनवेल

## महाड ते प्रतापगड सायकल प्रवास

### समीर शितोळेंचा प्रेरणादायी उपक्रम

**नाते :**



पर्यावरण संरक्षण आणि आरोग्य जपण्यासाठी महाड येथील समीर दिलीप शितोळे (वय ३८) याने सायकलवरून महाड ते प्रतापगड असा प्रेरणादायी प्रवास पूर्ण केला आहे. सुमारे ६५ किलोमीटर अंतराचा हा प्रवास त्यांनी एका दिवसात पार केला. या प्रवासाचा उद्देश तरुणांमध्ये शारीरिक क्षमतावृद्धीची जाणीव निर्माण करणे आणि पर्यावरणपूरक वाहतुकीचा संदेश देणे हा होता.

समीर शितोळे यांनी सकाळी महाड येथून निघून सावित्री नदीचा पूल, पोलादपूर, भुईगाव, आणि शेवटी ऐतिहासिक प्रतापगड किल्ला असा मार्ग पार केला. डोंगराळ रस्ता, वळ-णावळणाच्या घाटमार्गातील कठीण परिस्थितीतही त्यांनी अविरत सायकल चालवत गडावर पोहोचून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले.

प्रवासादरम्यान स्थानिक नागरिकांनी त्यांचे स्वागत करत 'हरित प्रवास - आरोग्याचा श्वास' या संदेशाला दाद दिली. शितोळे यांनी सांगितले की, सायकल चालवणे हे केवळ व्यायाम नाही, तर पर्यावरण वाचवण्याचं एक प्रभावी साधन आहे.

त्यांच्या या उपक्रमामुळे महाड परिसरातील अनेक युवकांमध्ये सायकलिंगची प्रेरणा निर्माण झाली आहे. महाड शहरात येत्या काळात सायकल डे साजरा करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे.

समीर शितोळे यांचा हा सायकल प्रवास निश्चितच आरोग्य आणि पर्यावरण संरक्षणासाठी अनुकरणीय ठरला आहे.

## दिवाळीसंध्या कार्यक्रमातून कलाकारांना वाव

### माजी नगराध्यक्ष डॉ.सुनील पाटील यांचे प्रतिपादन

**खोपोली :**

दिवाळीचा सण हा आपल्या पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडवणारा सण आहे. या सणाच्या आनंदोत्सवाचा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेला दिवाळीसंध्या या कार्यक्रमातून कलाकारांच्या कलेला वाव मिळाला असल्याचे प्रतिपादन खोपोलीचे माजी नगराध्यक्ष डॉ.सुनील पाटील यांनी केले आहे.

दिवाळी पाडव्याच्या संध्येला खोपोलीतील लायन्स क्लब सभागृहात रोटरॅक्ट क्लब ऑफ खोप-ोली व राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष डॉ.सुनील पाटील यांच्या सहयोगातून आयोजित लोककलेची दिवाळी संध्या-२०२५ या सुरेल गीतांचा मनमोहक कार्यक्रम रसिक प्रेक्षकाच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. यावेळी डॉ.सुनील पाटील बोलत होते. ते पुढे म्हणाले, दिवाळी संध्या कार्यक्रमातून खोपोली शहरातील नवोदित कलाकारांनी आपली कला प्रदर्शित केल्याने सर्व कलाकाराच्या कलेला वाव मिळाला असून यापुढे खोपोलीतील कलाकाराच्या कलेला वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील, असेही त्यांनी अखेरीस नमुद केले.



यावेळी खोपोलीचे माजी नगराध्यक्ष दत्तात्रय मसुरकर, उल्हास देशमुख, अश्विनी पाटील, मनीष यादव, सचिन मसुरकर, सचिन कर्णूक, दिलीप पुरी, रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या अध्यक्षा सुनीता चव्हाण, गणेश गडद, मिजान शेख तसेच रोटरॅक्ट क्लब ऑफ खोपोली अध्यक्ष अनिकेत सरदार, सचिव सृष्टी साठे, खजिनदार जयेश दळवी, रोहन पुरी, गौरव पाटील, ओंकार शिंदे, हर्ष गायकवाड, अनमेय नारवेकर, मिहिर बुटाला, श्लोक रौंदळ, संस्कृति साठे आदी प्रमुखांसह मोठ्या संख्येने खोपोलीकर उपस्थित होते.

दिव्यांचा उत्सव असणारी दिवाळी म्हणजे वर्षातला महत्वाचा सण. यानिमित्त यंदा सलग पाचव्या वर्षी 'लोक कलेची दिवाळी संध्या ' पार्श्वसंगीत मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. मराठी संगीत, मनमोहक स्वर आणि शब्दसुमनांनी सजलेल्या निवेदनाने सायंकाळी रसिकांनी टाळ्यांच्या गजरात कार्यक्रमाचा आनंद घेतला. गायक स्वरा प्रधान, श्रुती पवार, राधा पुरी, गौरव पाटील, दिवेश दापसे, शुभम गंभीरराव यांच्यासह इतर कलाकारांचा डॉ.सुनील पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## पोलादपूर नगरीत नरेंद्राचार्य पादुकांचे जंगी स्वागत

### ऐन दिवाळीत भावीकांना दर्शनाची आगळी पर्वणी

**पोलादपूर शहर :**

पोलादपूर नगरीत आज श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या सिद्ध पादुका या उपपीठ वसई (मुंबई) येथे परत जात असताना नाण-िजधामवरून पोलादपूरमार्गे प्रवास करत होत्या. या वेळी हॉटेल बालाजी येथे स्थानिक साधक व भक्तगणांनी त्यांचे जंगी स्वागत केले.

या स्वागत सोहळ्यात पादुकांचे विधिवत पूजन, आरती आणि मंत्रोच्च-ाराच्या गजरात दर्शन घेण्यात आले. सर्व साधकांच्या मुखातून जय सियाराम! असा घोष घुमत होता.अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेतून ही वसुंधरा पायी दिंडी ४ ऑक्टोबर २०२५ रोजी रामानंद संप्रदायाच्या उपपीठ मुंबई येथून निघाली व २० ऑक्टोबर रोजी मुख्यपीठ श्रीक्षेत्र नाणीजधाम येथे पोहोचली.

या दिंडीतून, सध्या अत्यंत जिकरीच्या पण तेवढ्याच दुर्लक्षित असलेल्या ग्लोबल वॉर्मिंग या विषयावर प्रकाश टाकला जात आहे. यावर केवळ संदेशच न देता त्यांच्या कृतीतूनही संदेश देण्याचा प्रयत्न केलेला आहे. हजारो लोकांची खाण्या पिण्याची, राहण्याची, मलमूत्र विसर्जनाची, अंघोळीची सोय करताना पर्यावरणाला काहीही हानी होणार नाही याची काळजी आयोजकांकडून घेतली जात आहे. मागे कचरा होणार नाही याची खबरदारी घेण्यासाठी विशेष सेवेकरींचे पथक या दिंडीत सहभागी झाले आहे. सोबत टॉयलेट व्हॅन देखील तैनात आहे.तसेच सोबत पिण्याचे पाणी, आणि स्वच्छतेसाठी लागणारे पाणी घेऊन २ स्वतंत्र टँकर्स दिंडी सोबत कायम सज्ज आहेत. त्याचसोबत या दिंडीच्या माध्यमातून दर दिवशी वृक्षारोपण देखील केले जात आहे.



विशेष म्हणजे हि दिंडी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या एका बाजूने, एका रांगेत, एका तालात आणि लयीत, त्यांच्या सांप्रदायिक भजनांच्या गजरावर चालत पुढे सरकत आहे. त्यांच्या वेशभूषा सुद्धा एका रंगसंगती मध्येच आहेत. एका तालावर चालताना वर्दळीच्या भागात हि दिंडी ग्लोबल वॉर्मिंगचा संदेश देताना आढळून आली. अशाप्रकारे वसुंधरा पायी दिंडीचे हे सलग तिसरे वर्ष आहे. आलेल्या सर्व साधकांची भोजन व्यवस्था जयेश लिमानिया व सर्व पोलादपूर मधील साधक निस्वार्थ पणे साधकांची सेवा केली.

## हिरव्या कुशीतलं निसर्गस्वप्न : माथेरान

### ब्रिटीश सरकारने निर्माण केलेले थंड हवेचे ठिकाण आजही लोकप्रिय

**माथेरान :**

**निसर्गाने या भूतलावर असंख्य विलोभनीय आकर्षणे निर्माण केली आहेत. नयनरम्य देखावे, विस्तृत निसर्गाची कलाकृती डोळ्यांचे पारणे फेडणारी आहेत. त्यातील एक म्हणजे रायगड जिल्ह्यातील सह्याद्रीच्या पर्वत रांगेतील निसर्गाच्या कुशीत वसलेले एक सुंदर टुमदार रमणीय पर्यटनस्थळ अर्थातच सर्वांचेच आवडते ठिकाण म्हणजे माथेरान होय. समुद्र सपाटीपासून ८२७ मीटर उंचीवरील हे अनेक नैसर्गिक कलाविष्काराने नटलेले छोटेसे खेडे वजा शहर आहे.**



माथेरान हे पूर्वीच्या काळात एका खडकावर वसलेले असून या गावाची निर्मिती आणि शोध त्याकाळात १८५० मध्ये ब्रिटिश राजवटीत ठाण्याचे कलेक्टर ह्युज मॅलेट यांनी लावल्यावर त्यानंतर अनेकांनी अर्थातच पारसी समाजातील मंडळींनी आपल्या वास्तू बंगल्याच्या स्वरूपात उभारलेल्या आहेत. एकंदरीतच माथेरानच्या डोंगरमाथ्यावर १६७० एकरांचा भूभाग म्हणजे ५२ किलोमीटर परिसरात जवळपास दोनशेहून अधिक बंगले आहेत, सध्यातरी पाच हजार लोकसंख्या असलेले हे गाव स्थानापन्न झालेले आहे.

अनेक ब्रिटिश नामावली प्रमाणे एकूणच ३८ पॉईंट्स जरी असले तरी त्यातील महत्वाचे दहा पॉईंट्स हेच खरे पाहण्याजोगे आहेत. यामध्ये पाच पॉईंट्सच्या सर्कलमधील एको, हनिमून, मलंग,लुईझा पॉईंट हे मुख्य पॉईंट्स आहेत. तर सात पॉईंट्सच्या सर्कल मध्ये अलेक्झांडर, रामबाग, चौक, लिटिल चौक,वन ट्री हिल हे पॉईंट्स पाहण्याजोगे आहेत. बारा पॉईंट्समध्ये याच रांगेतील एको, मलंग पॉईंट, लुईझा पॉईंट सह सनसेट पॉईंट (पार्क्युपाईन पॉईंट) हे महत्वाचे पॉईंट्स आहेत. सूर्योदयासाठी पॅनोरमा, गारबट हे मुख्य पॉईंट्स आहेत, परंतु सध्या पॅनोरमा पॉईंटच्या रस्त्याचे नूतनीकरण काम सुरू आहे.

बाराही महिने इथला निसर्ग सर्वांनाच साद घालून आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत असतो. नेरळ येथून समोर दिसणारा गर्वाने छाती काढून अभिमानाने आपल्याजवळ या म्हणणारा विशाल कातळावर विसावलेला आहे. चोहोबाजूंनी काळ्याकभिन्न धरावर धर अशाच स्वरूपात असून या डोंगरावरील सर्वच माती ही तांबड्या लाल रंगाची म्हणजे निसर्गाचे सौभाग्य म्हणावे लागेल. आजमितीपर्यंत इथल्या स्थानिकांनी हे सौभाग्य कायमस्वरूपी टिकवून ठेवलेले आहे. मोटार वाहन अंतर्गत येऊन डांबराचा काळा डाग म्हणजे पूर्वापार असलेल्या लाल मातीच्या रस्त्यावर त्यागाचे प्रतीक अद्यापही लावलेले नाही. त्यामुळेच इथे आजही गारवा कायम स्वरूपी जाणवत आहे. सर्वत्रच फिरण्यासाठी हातरिक्षा आणि घोड्यावर बसून भ्रमंती करता येते.

### पर्यटकांचे सतत ओघ...

मुंबई पुण्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर नेरळ या मध्यवर्ती ठिकाणी उतरल्यावर माथेरानचे प्रवेशद्वार दस्तुरी नाका सात किलोमीटर अंतरावर आहे. तर मिनिट्रेनने येताना एकूण २१० नागमोडी वळणे पार करीत दीड ते दोन तासात माथेरानला येता येते. या प्रवासाच्या आकर्षणातूनच पर्यटक येथे मोठ्या प्रमाणात सातत्याने येत असतात.

## माजी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात

### माझी शाळा, माझी जबाबदारी या संकल्पनेला गावाचा प्रतिसाद

**वडनेर-**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दोंदुडा यांच्या वतीने माजी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. प्रीती गणेश गुडधे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून वडनेर पोलीस स्टेशनचे ठाणेदार घनश्याम पाटील, विशेष अतिथी म्हणून संतोष तीमांडे गुरुजी, तुकाराम फुलझले गुरुजी, सौ. पुष्पा कोपुलवार मॅडम तसेच शाळेचे मुख्याध्यापक शरदजी ढगे व वरिष्ठ शिक्षिका सौ. वर्षा भोयर उपस्थित होते.कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील भौतिक सुविधांचा विकास करण्याचे आश्वासन देत शाळेला राज्यपातळीवर नावलौकिक मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला. गावातील युवकांनी शाळेला टॅबलेट, डिजिटल पॅनल, आरो प्युरिफायर, खेळ साहित्य व वृक्षदान करून हातभार लावला. माझी शाळा, माझी जबाबदारी या उपक्रमांतर्गत लोकसहभागातून शाळेचा विकास करण्याचे वचन सर्व ग्रामस्थांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी निलेश घिये यांनी केले, तर आभार प्रदर्शन किशोर चिडे यांनी मानले. शाळा व्यवस्थापन समिती, भौतिक सुरक्षा समिती आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हा सोहळा यशस्वीपणे पार पडला.

# अतिवृष्टीचा २.२२ लाख हेक्टरवरील पिकांना फटका

## अमरावती विभागातील 'या' जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान

**अमरावती/का.प्र.**
अतिवृष्टीमुळे विभागातील २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यात अमरावतीतील दोन, अकोला तीन, यवतमाळ ११, बुलढाणा आठ व वाशीम जिल्ह्यातील दोघांचा समावेश आहे. मृतकांपैकी १६ कुटुंबीयांना ६४ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. दहा प्रकरणे प्रलंबित आहेत.

अतिवृष्टीमुळे अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांत सुमारे २ लाख २२ हजार ४९४ शेतजमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सर्वाधिक १ लाख १८ हजार हेक्टरवरील नुकसान बुलढाणा जिल्ह्यात झाले आहे.

पुण्यातील पुरंदर विमानतळाबाबत मोठी अपडेट, विरोध होत असताना एकाच दिवसात ११०० एकर...

अमरावती जिल्ह्यातील तिवसा, अचलपूर, चांदूर बाजार, वरूड, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी व चिखलदरा तालुक्यातील ११ हजार ३९० हेक्टर शेतजमिनीचे नुकसान झाले आहे. २९० गावांना पावसाचा फटका बसला. अकोला जिल्ह्यातील अकोला, पातुर या दोन तालुक्यांतील ६२ गावांत नुकसान झाले आहे. ४२५ हेक्टर जमीन खरडून गेली तर ३ हजार ७९० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, महागाव,



उमरखेड, घाटंजी, आर्णी, झरी-जामणी या पाच तालुक्यांना फटका बसला. जवळपास ७७ गावांतील ६५ हजार ४१५ हेक्टवरील शेतजमिनीचे नुकसान झाले आहे.

लक्ष्मी रोडवर बस आली अन् चालकाला हृदयविकाराचा झटका, सगळे घाबरले; पोलिस झाले डॉक्टर अन्... पुण्यात काय घडलं?

बुलढाणा जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे. मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, चिखली, खामगाव, जळगाव-जामोदला अधिक फटका बसला. सहा तालुक्यांतील २०९ गावे बाधित झाली आहेत. १ लक्ष १८ हजार ९३२ हेक्टवरील पिकांचे नुकसान झाले आहे. वाशीम जिल्ह्यातील वाशीम, रिसोड, मंगरूळपीर, मालेगाव, कारंजा, मानोरा या सहा तालुक्यांतील १२२ गावांना अतिवृष्टीचा फटका बसला. २२ हजार ९६७ हेक्टवरील शेतजमिनीचे नुकसान झाले आहे.

**हजारो घरांची पडझड**

अतिवृष्टीमुळे विभागातील १६३ घरांची पूर्णतः पडझड झाली आहे. यात अमरावती जिल्ह्यातील ७३, अकोला १३, यवतमाळ ६४ तर बुलढाणा जिल्ह्यातील १३ घरांचा समावेश आहे. अंशतः पडझड झालेल्या पक्क्या घरांची संख्या ३६३, कच्चे ७,४७३, झोपड्या दोन तर बाधित गोठ्यांची संख्या १८४ इतकी आहे.

**अतिवृष्टीचा फटका**
**तालुके : २६**
**शहरे : ०६**
**गावे: १२२**
**पीक नुकसान : २,२२,४९४ हेक्टर**

**२६ जणांचा मृत्यू**

अतिवृष्टीमुळे विभागातील २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यात अमरावतीतील दोन, अकोला तीन, यवतमाळ ११, बुलढाणा आठ व वाशीम जिल्ह्यातील दोघांचा समावेश आहे. मृतकांपैकी १६ कुटुंबीयांना ६४ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. दहा प्रकरणे प्रलंबित आहेत.

# अमरावतीत ओबीसींचे बेमुदत उपोषण



**अमरावती/का.प्र.**
मराठा समाजाला आरक्षणासाठी २ सप्टेंबरला काढण्यात आलेला शासन निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी ओबीसी जनमोर्चाचे दोन पदाधिकारी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसले आहेत. ओबीसी प्रवर्गांतर्गत येणाऱ्या विविध जातीच्या समाज व संघटनांनी या उपोषणाला पाठिंबा दिला आहे.

राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण दिले आहे. त्यामुळे ओबीसी समाजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. सरकारने त्यासंबंधी काढलेला शासन निर्णय तत्काळ रद्द करावा, अशी मागणी ओबीसी जनममोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी ओबीसी जनमोर्चाचे पदाधिकारी तुषार ब. वाढोणकर व चंद्रशेखर दे. देशमुख बेमुदत उपोषणास बसले. सत्यशोधक दिनाचे औचित्य साधून उपोषणाची सुरुवात करण्यात आली.

या बेमुदत उपोषणास जिल्ह्यातील ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी, अलुतेदार, बलुतेदार संघटना, क्रांतिज्योती बिग्रेड, म. फुले बहुद्देशीय संस्था, सावता परिषद, बारा बलुतेदार महासंघ, भोई समाज एकता परिषद, माळी महासंघ, सत्यशोधक समाज संस्था, ओबीसी समन्वय समिती, अ.भा.महात्मा फुले समता परिषद आदी ओबीसी संघटनांनी उपोषणास पाठिंबा दर्शविला आहे.

**लोणारमध्ये ओबीसींचा मोर्चा**

मराठा आरक्षणासंदर्भात काढलेला जीआर रद्द करण्याच्या मागणीसाठी बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तहसील कार्यालयावर ओबीसींच्यावतीने मोर्चा काढण्यात आला. 'एकच पर्व ओबोसी सर्व', 'आरक्षण आमच्या हक्काचे...' अशा घोषणा देत मोर्चेकऱ्यांनी मागण्यांकडे लक्ष वेधले.

# प्रियकराला सिलिंडर आणण्यास सांगितल्यामुळे संसारात राडा

**अमरावती/का.प्र.**
अमरावतीतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. प्रेमसंबंधातून पत्नीनेच प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. त्याच्या चेहऱ्यावर वार करून त्याला जिवानिशी ठार करण्यात आलं. पथ्रोट येथील झेंडा चौक येथे मंगळवारी रात्री ही संतापजनक घटना घडली आहे. अरविंद नजीर सुरत्ने (३७, रा. गरजदरी, ह.मु. पथ्रोट) असं मृताचं नाव आहे. या प्रकरणी पथ्रोट पोलिसांनी बुधवारी पहाटे महिलेसह तिच्या प्रियकराविरुद्ध खून व ?ट्रासिटी ?क्ट अन्वये गुन्हा दाखल केला. आरोपी मारेकऱ्याला मंगळवारी रात्रीच पोलिसांनी अटक केली. तर महिलेला बुधवारी अटक करण्यात आली. दोन्ही आरोपींनी खुनाची कबुली दिली आहे.

मृताचा मोठा भाऊ अशोक यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी मारेकरी अमित लवकुश मिश्रा (३३, रा. पथ्रोट) याच्यासह ३८ वर्षीय महिलेला अटक करून त्यांना बुधवारी न्यायालयात हजर केलं. दोघांनाही एका दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. व्यवसायाने चालक असलेल्या अरविंदचा प्रेमविवाह झाला होता. तो पत्नी व दोन मुलांसमवेत झेंडा चौक परिसरात भाड्याने राहत होता. मंघळवारी रोजी रात्री फिर्यादी अशोक हे परतवाडा येथे असताना त्यांना भाचा अनिलने त्यांना फोन केला. अरविंद मामा व मामी यांच्यात अमित मिश्रा याच्याशी असलेल्या प्रेमसंबंधामुळे भांडण झालं आणि त्यांची हत्या झाल्याचं अनिलने फोनवरून सांगितलं. त्या दोघांनीच अरविंदला मारून टाकल्याचं अशोक सुरत्ने यांनी पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत सांगितलं आहे. लाकडी हत्यारानं अरविंदच्या चेहऱ्यावर वार करण्यात आले आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, महिलेनं पतीला झोपेच्या गोळ्या दिल्या होत्या, अशीही माहिती समोर आली आहे.

# विवाहबाह्य संबंधातून आई झाली वैरीण

## पोटच्या मुलाचा जीव घेण्याचा कट, चार तासात डाव कसा उधळला?

**अमरावती/का.प्र.**
अमरावती शहरात एका आईने आपल्या पोटच्या लेकाची हत्या करण्याचा अमानुष कट रचल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या निर्दयी आईसह तिच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली आहे.

अमरावती शहरातील धामणगाव रेल्वे परिसरात ही घटना घडली. मृत मुलाचे नाव गणेश उर्फ शुभम गजानन वारंगणे असून, त्याची आई दुर्गा वारंगणे आहे. दुर्गा यांचे मनोज किर्तने या पुरुषासोबत विवाहबाह्य संबंध होती. पोलिसांच्या तपासात असे समोर आले की, दुर्गाला असे वाटत होते की तिचा मुलगा गणेश त्यांच्या प्रेमसंबंधात अडथळा निर्माण करत आहे. या कारणामुळे ७ ऑक्टोबरला दुर्गा आणि तिच्या प्रियकराने दोन इतर साथीदारांसोबत मिळून गणेशवर हल्ला करण्याचा कट रचला.

मोटरसायकल वरुन घेऊन गेले आणि त्या दिवशी सकाळी गणेशला मोटारसायकलवर बसवून आसेगाव परिसरातील शेतात नेलं गेले, जिथे त्याच्यावर बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीमुळे गणेशचा मृत्यू झाला. तरुणाच्या मामानी या घटनेविरुद्ध दत्तापूर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला.

माहितीनुसार, ८ ऑक्टोबर रोजी दत्तापूर पोलिस ठाण्यात डॉ. आकाश येंडें यांनी सांगितले की, गणेश मृतावस्थेत रुग्णालयात दाखल झाला होता. तपास सुरू केल्यावर पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली. फक्त चार तासांतच पोलिसांनी दुर्गा, तिचा प्रियकर मनोज, तसेच इतर दोन साथीदार अमोल अर्जुने आणि अशोक चवरे यांचा छडा लावून त्यांना अटक केली.

आरोपींना अटक करताच चौकशी केली गेली आणि त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. तपासात स्पष्ट झाले की दुर्गा नेच हा कट रचला आणि आपल्या पोटच्या मुलाचा जीव घेतला. या निर्दयी घटनेमुळे अमरावती शहरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाची संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि उपविभागीय अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. चार तासांत गुन्हेगारांचा शोध लावल्याबद्दल दत्तापूर पोलिसांचे विशेष कौतुक केले जात आहे.



**अमरावती-आकाशवाणी प्रसारण केंद्र, अमरावती येथे नुकतेच प्रसारण केंद्र प्रमुख आशिष गावंडे रजू झालेत, त्यांचे स्वागत स्वाभिमान श्रमिक पत्रकार संघांचे अमरावती जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर, आकाशवाणी लेखक संजय वाघुळे, पत्रकार संजय जिरापुरे, दलितमित्र कय्युम शहा व आकाशवाणी केंद्राचे वरिष्ठ उदघोषक संजय ठाकरे यांनी केले. या प्रसंगी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली तथा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.**

# जीवनात ध्येय प्राप्तीसाठी सातत्य राखणे गरजेचे : निलेश जामठे



**परतवाडा -** जीवनात ध्येय प्राप्तीसाठी सातत्य राखत जीवनात ध्येय निश्चित करा व बेभान होऊन ध्येय प्राप्त करा. सोशल मीडियामुळे मुलाच्या संस्कारावर आघात होत असून त्यापासून दूर राहण्याचा संदेश जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी दिला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीची पुस्तके पालकासमवेत वाचावीत यातून ज्ञानवृद्धी होते असे प्रतिपादन माध्यमिक राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी केले.

परतवाडा येथील विदर्भ मिल रहिवाशी संजय येऊतकर यांचा मुलगा सर्वेश येऊतकर याचा बीटेक कॅम्पुटर सायन्स एमटेक कॅम्पुटर सीओइपी भारतातील व महाराष्ट्रातील सर्वोत्तम कॉलेज, युनिव्हर्सिटी मध्ये प्रवेश झाल्या बद्दल तसेच रिचा संजय येऊतकर हिचा ऑल इंडिया रँक मधुन बी.ए.एम.एस करिता प्रवेश झाल्याबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे दोघांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ व संत रविदास महाराज पुस्तिका देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, जिल्हा उपाध्यक्ष मनोहर कोथळकर,तालुका अध्यक्ष रामा लाहाडके,योगेश रेवस्कर,कैलास मालखेडे, तालुका प्रसिद्धीप्रमुख डॉ.गजानन रेवस्कर,तालुका उपाध्यक्ष जय घोरे, उपसरपंच प्रदिप शेंडे, युवा तालुका अध्यक्ष उमेश गायकवाड,पांडुरंग चव्हाण, अचलपूर शहर अध्यक्ष कृनाल भागवतकर आदि सह परिसरातील समाज बांधवांची उपस्थिती होती.

# वैष्णवीसाठी अमरावतीकरांची धडपड

**अमरावती/का.प्र.**
दिवाळीच्या रात्री कंवरनगर रोडवर काळोख पसरला, त्यावेळी दस्तूरनगरच्या पायल बुंदेले (२२) आणि वैष्णवी थोरात (२२) मंदिर दर्शनासाठी जात होत्या. याचवेळी त्यांना चारचाकी वाहनाने धडक दिल्याने अचानक त्यांचा जीवन मार्ग बदलला. राजापेठ पोलिसांनी वाहनचालका विरुद्ध गुन्हा नोंदवला असून,



तपास सुरू आहे. या घटनेत पीडित मुलगी गरीब कुटुंबातील आहे आणि अमरावतीकर न्याय व मदतीसाठी प्रयत्न करत आहेत.

कंवरनगर रोडवरून आलेल्या चारचाकी वाहनाने पायल व वैष्णवीच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत दोघीही रस्त्यावर कोसळल्या. मागे

**कंवरनगर हिट अँड रन प्रकरण**

बसलेली वैष्णवी ही वाहनाखाली चिरडली गेली. प्रत्यक्षदर्शीच्या मते, वाहनचालक मद्यधुंद अवस्थेत हुल्लडबाजी करत होते. अशी माहिती दिली. या अपघातात वैष्णवीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. डॉक्टरांनी सांगितले की तिच्यावर प्लास्टिक सर्जरी आणि हाडांच्या शस्त्रक्रिया आवश्यक आहेत.

**पालकमंत्र्यांनी लक्ष द्यावे**

नागरिकांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या हिट ॲण्ड रन प्रकरणात स्वतः लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे. जखमी मुलगी गरीब कुटुंबातील असल्याने शासनाने उपचाराचा संपूर्ण खर्च उचलावा, तसेच आरोपी वाहनचालकावर कठोर कारवाई करावी अशी मागणी विजय थोरात, नीलेश कंचनपूरे आणि स्थानिक नागरिकांनी केली असून, लाखो रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. ती गरीब कुटुंबातील असून, ती बीएच्या द्वितीय वर्षाला आहे.

**आरोपी वाहनचालक अद्यापही पसार**

राजापेठ पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपास सुरू केला आहे. दहा पोलिस ठाण्याचे पथक आरोपी वाहनचालकाचा शोध घेत आहे, परंतु अद्याप वाहनाचा क्रमांकच ट्रेस झालेला नाही. सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे, तरीही सुगावा मिळालेला नाही. नागरिकांनी मानवतेच्या भावनेतून मदत करावी, असे तिच्या भावाने राहुल थोरात यांनी आवाहन केले आहे.

# अंजनगाव शहराला गढूळ पाणीपुरवठा

**अंजनगाव सुर्जी -** शहराला गढूळ, दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा आठ दिवसांपासून होत आहे. याबाबत नागरिकांमध्ये संताप असून आमदारांनीदेखील रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंजनगाव सुर्जी शहराला होत असलेला पाणीपुरवठा गेल्या आठ दिवसांपासून अत्यंत गढूळ, दुर्गंधीयुक्त स्वरूपाचा असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दूषित पाण्यामुळे रोगराईचे साम्राज्य पसरण्याची भीती व्यक्त होत असताना, नागरिक या भोंगळ कारभाराबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संबंधित अधिकारी सतत 'नॉट रिचेबल' येत आहे.



अंजनगाव सुर्जी शहरात अशाप्रकारे गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याचे चित्र आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा भोंगळ कारभार, स्थानिक रहिवासी नागरिकांमध्ये संताप**

असल्याने नागरिकांनी तक्रार कोणाकडे करायची, हा प्रश्न शहरवासीयांसमोर उभा ठाकला आहे. दरम्यान, गढूळ, दुर्गंधीयुक्त पाण्याच्या पुरवठ्याबाबत अधिकारी शेंडे यांना सदर प्रतिनिधीने गाठले असता, दोन दिवसांत ही समस्या सोडविण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

**नागरिकांना आरोग्याची चिंता, शुद्ध पाणी द्या**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून शहराला पुरविले जाणारे पाणी इतके गढूळ, दुर्गंधीयुक्त आहे की, ते पिण्यायोग्य तर नाहीच, पण इतर घरगुती कामांसाठी वापरणेही धोक्याचे ठरत आहे. पावसाळ्यामुळे पाण्याच्या स्रोतांमध्ये गढूळपणा वाढू शकते. या दूषित पाण्यामुळे कॉलरा, टायफॉइड आणि इतर जलजन्य आजार पसरण्याची शक्यता असून नागरिक चिंतित आहेत. तरी प्रशासनाने याची काळजी घेत, शुद्ध पाणी पुरवठा करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**अंजनगाव सुर्जी शहरातील पाण्याची स्थिती सुधारली न गेल्यास वरिष्ठ स्तरावर तक्रार करून अधिकाऱ्यांचा समाचार घेतला जाईल.**

**गजानन लवटे, आमदार**

# विदेशातील कुटुंबीयांपर्यंत पोहोचला दिवाळीचा गोडवा

**अमरावती/का.प्र.**
दिवाळी म्हणजे फराळ रेलचेल असते. चिवडा, लाडू, शंकरपाळे, शेव, चकली, अनारसे, करंजी आदीचा फडशा पाडल्याशिवाय दिवाळी काही केल्या पूर्ण होत नाही. अशात डाक विभागाच्या माध्यमातून विदेशात फराळ पाठविण्याचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे. यंदाही डाक विभागाद्वारे रशिया, कॅनडा, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया अन् फ्रान्सलाअमरावतीकरांनी विदेशातील आप्तांसाठी दिवाळी फराळाचा गोडवा स्पीडपोस्टद्वारे पोहोचला आहे.

डाक विभागाने यंदा विशेष उपक्रम हाती



घेत विदेशात राहणाऱ्या नातेवाइकांना दिवाळी फराळ पाठविण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमामुळे विदेशात स्थायिक झालेले तसेच शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने असलेल्या अमरावतीकरांना फराळ पाठविण्याची सोय झाली आहे. त्याचा लाभ मागील काही दिवसांपासून अनेकांनी घेतला आहे. या माध्यमातून डाक विभागाला मोठा महसूल प्राप्त झाला आहे. डाक विभागाकडून प्राप्त माहितीनुसार आतापर्यंत अमरावती येथील डाकघरातून रशिया, कॅनडा, इंग्लंड ऑस्ट्रेलिया, फ्रान्स व अन्य ठिकाणी राहत असलेल्या विदेशातील कुटुंबियांपर्यंत पोहोचला दिवाळीच्या फराळचा गोडवा डाक विभागामार्फत पोहोचविला आहे.

**कोरड्या स्वरूपातील फराळ पाठविण्याची सुविधा**

डाक विभागामार्फत विदेशात पाठविला जाणारा दिवाळी फराळ हा कोरड्या स्वरूपात पाठविता येतो. स्पीड पोस्टद्वारे ३० किलोपर्यंत तर पार्सल सेवेने २० किलोपर्यंत फराळ पाठविण्यात येत आहे. फराळ कुठल्या देशात पाठविण्यात येत आहे. त्यानुसार वेगवेगळे दर आकारण्यात येत आहेत. यासाठी टपाल कार्यालयात सुरक्षित बॉक्समध्ये पॅकिंगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**आतापर्यंत २ क्विंटल फराळ रवाना**

डाक विभागाद्वारे दिवाळीनिमित्त सुरू केलेल्या या सुविधेद्वारे अनेकांनी विदेशात राहणाऱ्या आपल्या आप्तांसाठी ही सुविधा सुरू झाल्यापासून तर आतापर्यंत जवळपास २ क्विंटल दिवाळी फराळ विदेशात पाठविला आहे.

'डाक विभागाद्वारे सुरू केलेल्या या योजनेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या निमित्ताने परदेशात असणाऱ्या प्रियजनांही गावाकडील दिवाळीचा गोडवा अनुभवता येत आहे.'
**- श्रीकांत नवघरे,**
**पोस्टल असिस्टंट मुख्य डाक कार्यालय अमरावती**

# ह्युमनॉइड व्योममित्रः एक क्रांतिकारी पाऊल

भारताने मानव उड्डाणक्षेत्रात पाऊल ठेवण्याचा निर्धार केला असून त्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून 'व्योममित्र' उदयाला येत आहे. हा एक ह्युमनॉइड (अर्धमानवी) रोबो असून इस्रोच्या गगनयान प्रकल्पासोबत प्रयोगात्मक पथ दाखवेल. मानवाच्या स्वरूपात यंत्र बनवण्याची मानवाची इच्छा 'रोबोटिक मित्र' किंवा 'कृत्रिम शरीर' ही कल्पना आणि मानवामधील दरी येत्या काळात कमी होणार आहे. त्या प्रक्रियेची ही एक नांदी आहे.

भारताने आपल्या अवकाशप्रवेश यात्रा क्षेत्रात महत्त्वाची पावले उचलली आहेत. चंद्रयान, मंगलयान, इतर उपग्रह प्रक्षेपण आणि पृथ्वी निरीक्षण मोहिमा यातील यशस्वी उपक्रमांनी इस्रोने जगातील मान्यता मिळवली आहे. पुढे, भारताने मानव उड्डाण क्षेत्रात पाऊल ठेवण्याचे निर्धार केले आहे आणि त्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून उदयाला येत आहे 'व्योममित्र', एक ह्यूमैनॉइड (अर्धमानवी) रोबो, जो इस्रोच्या गगनयान प्रकल्पासोबत प्रयोगात्मक पथ दाखवेल. मानवाची यंत्रांना मानवाच्या स्वरूपात साकारण्याची इच्छा खूप जुनी आहे. 'रोबोटिक मित्र', 'सह-यंत्र' किंवा 'कृत्रिम शरीर' या कल्पना विज्ञान कथेतील अनेक प्रसंगांमध्ये दिसतात. यंत्रमानव आणि मानवामधील दरी आगामी शतकात कमी कमी होणार आहे. त्याच प्रक्रियेची ही एक नांदी समजायला हरकत नाही. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' हे तंत्रज्ञान पुढील वीस वर्षांमध्ये जगाचे चित्रच बदलून टाकणार आहे. या यंत्राचा मेंदू कृत्रिम असला तरी काही दशकांमध्ये तो मानवी मेंदूइतका विचार करून आपले आपण निर्णय घेऊ शकेल आणि त्यापुढील पायरी म्हणजे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'. या तंत्राचा अवलंब करून तो कदाचित आपल्या काही पायऱ्या पुढेही जाऊ शकेल. सौदी अरेबियाने २०१७ मध्ये 'सोफिया' या यंत्रयुवतीला आपल्या देशाचे नागरिकत्व बहाल केले होते. हा एक ऐतिहासिक आणि अनोखा निर्णय होता, कारण ही जगातील पहिली यंत्रयुवती ठरली, जिला एखाद्या देशाचे अधिकृत नागरिकत्व देण्यात आले होते. सोफियाला दिले गेलेले नागरिकत्व हे प्रातिनिधिक आणि प्रतिकात्मक स्वरूपाचे होते. त्यातून सौदी अरेबियाने आपला भविष्याभिमुख, तंत्रस्नेही चेहरा दाखवण्याचा प्रयत्न केला होता.



'व्योममित्र'चा उपयोग असाच एक क्रांतिकारी निर्णय ठरेल. 'व्योममित्र'मध्ये 'व्योम' म्हणजे आकाश किंवा अंतराळ आणि 'मित्र' म्हणजे मैत्रीपूर्ण सहकारी. म्हणजेच, हे नाव अंतराळातील मानवी मित्र अशा अर्थाने आहे. इस्रोने मूळ भारतीय नाव देऊन आपल्या तंत्रज्ञानाचा देशाभिमान जपला आहे. पूर्वी अनेक देशांनी प्रयोगात्मक प्राण्यांचा उपयोग केला (उदा. उड्डाणापूर्वी माकड, कुत्रे इत्यादी) परंतु भारताने त्या पद्धतीऐवजी, मानवाच्या गुणधर्मांची नक्कल करणारा रोबो वापरण्याचा निर्णय घेतला आहे. मानवाऐवजी रोबोची मदत घेतल्यामुळे मानवावर येणाऱ्या किरणोत्सर्ग, गुरुत्वहीनतेचे परिणाम, कंपन आणि दाब इत्यादी परिस्थितींचा प्रत्यक्ष अनुभव न घेता परिणाम तपासता येतो. अशा सूचना भविष्यातील मानवयुक्त मिशनसाठी खूप उपयुक्त ठरतात. म्हणूनच गगनयान मिशन आणि व्योममित्रची भूमिका समजून घेण्याची गरज आहे. 'गगनयान' हे इस्रोचे पहिले मानवी अंतराळ मिशन आहे. यामध्ये दोन अनमॅन्ड फ्लाइट्स (मानवहीन) आणि एक सुसज्ज मानवयुक्त फ्लाइट असे तीन टप्पे आहेत. मानवी मोहिमेपूर्वी व्योममित्रला स्पेसक्राफ्टमध्ये पाठवून, अंतराळासाठी आवश्यक सुरक्षा, उपकरण नियंत्रणे आणि अन्य मानवी आवश्यकतांची चाचणी घेण्यात येईल. त्यामुळे, मानवी अंतराळवीरांचे आरोग्य, सुरक्षा आणि यंत्रणा यांची खात्री होईल.

इस्रोच्या गगनयान मोहिमेमध्ये प्रथमच भारतीय अंतराळवीर अंतराळात पाठवले जाणार आहे. त्याआधी, सर्व यंत्रणा, सुरक्षा आणि कार्यपद्धती तपासण्यासाठी मानवीय गुणधर्म असलेल्या रोबोचा वापर केला जाणे हे ह्युमन मिशनला पूरक ठरून अंतराळात संभाव्य मानवी समस्यांचे परीक्षण करेल, विविध प्रकारची विभागणी करून वैज्ञानिक डेटा गोळा करेल आणि सुरक्षा मानकांची पडताळणी करेल. या पार्श्वभूमीवर व्योममित्रचे शारीरिक स्वरूप आणि यंत्रणा समजून घेण्यासारखे आहे. व्योममित्र पूर्णपणे मानवासारखे दिसतो, बोलतो, प्रतिक्रिया देतो, काम करतो. याला मानवाच्या चेहऱ्यासारखा चेहरा, हात, पाय, आणि पंजे आहेत. प्रमुख तांत्रिक बाबी खास आहेत. व्योममित्र चेहऱ्यावरील भाव खऱ्या मानवासारखे ठेवू शकतो. तो हिंदी आणि इंग्रजी भाषेत संवाद साधू शकतो. हात हलवू शकतो, बटणे दाबू शकतो, लिव्हर खेचू शकतो, उपकरणांचे संचालन करू शकतो. त्याला टेम्परेचर, प्रेशर, गॅस लेवल मॉनिटरिंगसाठी सेन्सर्स लावण्यात आले आहे. त्याच्या कार्यप्रणालीला आर्टिफिशियल इंटेलिजन्सची जोड देण्यात आली आहे. विविध परिस्थितींमध्ये निर्णय घेण्याची क्षमता त्याच्या ठायी आहे. संवाद साधण्यासाठी आणि निदर्शनासाठी त्याच्याकडे नियंत्रित सॉफ्टवेअर आहे. व्योममित्रची कर्तव्ये आणि कामांचे स्वरूप स्पष्ट आहे. तो विविध उपकरणांचे संचालन करू शकतो. केबिनमध्ये हवा, तापमान, आर्द्रता, गॅसेस इत्यादी मॉनिटर करू शकतो. ऑक्सिजन लेवल आणि वातावरणाचे प्रेशर तपासणे, सुरक्षेची खात्री करणे, डाटा गोळा करून ग्राउंड कंट्रोलला पाठवणे, संवाद साधून आदेशांची पूर्तता करणे, इमर्जन्सी सिग्नल पाठवणे, ऑटोमेटेड आणि मॅन्युअल मोडमध्ये काम करणे त्याला जमते. व्योममित्रच्या कामामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंगचा वापर केला जातो.


विविध सेन्सर्स त्याला वातावरणातील बदल त्वरित जाणवण्यास मदत करतात. त्यात फेशियल रिकग्नेशन, व्हॉइस रिकग्नेशन आणि डेटा अनॅलिसिस प्रणाली आहे. त्यामुळे तो गगनयानच्या अंतराळयानात निर्माण होणाऱ्या समस्या किंवा बदलांवर त्वरित आणि शास्त्रीय प्रतिक्रिया देऊ शकतो. त्याच्या पुढील अभियांत्रिकी आणि विकासातील आव्हानांचाही वेध घ्यायला हवा. हुमनॉइड रोबो तयार करणे हे तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीचे आव्हानात्मक काम आहे. व्योममित्रला अंतराळातील निम-गुरुत्व, तापमानातील बदल, रेडिएशनचा धोका, उपकरणांचे बिघाड आणि मानवी परिस्थिती जपता यावी, यासाठी वेगवेगळ्या टेक्निकल टीम्स काम करतात. फेशियल एक्स्प्रेशन्स, हॅप्टिक फीडबॅक, सेन्सर डेटा कलेक्शन, ऑटोमेटेड रिपोर्टिंग यांसाठी विविध मॉड्यूल्सचा वापर केला जातो. जगातील इतर स्पेस एजन्सीजने ह्युमनॉइड रोबो तयार केले आहेत. नासाचा रोबोनॉट स्पेसवॉक्स, उपकरण कंट्रोल यात पारंगत आहे, तर रूसी एजन्सी फेडोर भारी उपकरण ऑपरेशन, सुरक्षा यासाठी कुशल मानला जातो. भारतीय व्योममित्रचे एक विशेष स्थान आहे, कारण तो भारतीय परिस्थितीसाठी आणि भाषेसाठी सुसज्ज असे आहे. त्याचे वेगळे असे राष्ट्रीय आणि जागतिक महत्त्व आहे. भारताने स्पेस टेक्नोलॉजीमध्ये नवीन प्रवाह सादर केला आहे. व्योममित्रमुळे भारतीय स्पेस प्रोग्राम जगात एका वेगळ्या पातळीवर पोहोचला आहे. 'गगनयान' मिशनमधून भारताचा 'स्वतंत्र अंतराळवीर' पाठवण्याचा टप्पा सुरू होणार आहे. स्पेस सायन्समध्ये असा रोबो प्रगतीचे प्रतीक आहे.

इस्रोचे व्योममित्र हे तंत्रज्ञान, बुद्धिमत्ता आणि विज्ञानाचा संगम आहे. भारतीय मानवयुक्त अंतराळ मोहिमेमध्ये त्याचे योगदान अतुलनीय आहे. हा रोबो भविष्यातील अंतराळ संशोधनाला नवी दिशा देईल आणि भारतीय तंत्रज्ञानाला जागतिक उंचीवर नेईल. व्योममित्रमुळे भारताचा अंतराळवीर घरच्या तंत्रज्ञानाच्या आधाराने सुरक्षित, स्मार्ट आणि आधुनिक पद्धतीने अवकाशात जाईल, हे निश्चित आहे. व्योममित्र प्रकल्प यशस्वी झाल्यास भारताची अवकाश क्षेत्रातील स्वावलंबन आणि प्रतिस्पर्धात्मक स्थिती आणखी दृढ होईल. भविष्यातील मानवयुक्त, चंद्र आणि मंगळ मोहिमांसाठी हा एक महत्त्वाचा पाया ठरेल. रोबोटिक्स व एआय तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला एक नवी दिशा मिळेल. परिणामी, हे एक लक्षवेधी आणि बहुपयोगी संशोधन ठरेल. भारतीय शास्त्रज्ञांसाठी हा एक खास प्रकल्प आहे. एखाद्या रोबोने इतकी महत्त्वाची जबाबदारी पेलणे हा भारताचाच बहुमान आहे.

**- डॉ. दीपक शिकारपूर**

# सगुण-निर्गुणः आत्मसंयमयोग

माउली म्हणतात, 'मग तेथ आपण। एकाग्र अंत:करण। करुनि सद्गुरुस्मरण। अनुभविजे॥' सहाव्या अध्यायाच्या सुरुवातीला भगवंत कर्मसंन्यास आणि कर्मयोग या विषयीची चर्चा करताना म्हणतात, जो कर्मफलाच्या ठिकाणी अनाश्रय धरून राहतो, तोच संन्यासी आणि तोच योगी होय. संकल्पाचा त्याग घडल्याशिवाय योगी आणि संन्यासीही होता येणार नाही. कर्मयोग सिद्ध होण्यासाठी लागणारी समबुद्धी संपादन करण्यासाठी भगवंत आत्मसंयमन, म्हणजे ध्यानाचा अभ्यास सांगतात.



ध्यानाला बसण्याचे ठिकाण संतांनी वसविलेले स्थान अथवा आपल्या घरात देव्हाऱ्यासमोर अथवा सद्गुरूंच्या प्रतिमेसमोर असावे. आसन साधे; पण स्वच्छ असावे. सतरंजी अथवा घोंगडी, त्यावर धूतवस्त्राची घडी चालेल. त्या आसनाचा उपयोग शक्यतो ध्यानाखेरीज अन्य कशासाठी शक्यतो केला जाऊ नये. ध्यानासाठी निश्चित केलेली वेळ कायम राखावी. प्रथम सद्गुरूंचे स्मरण करावे; त्यांची मानसपूजा करावी. बसताना डोके, मान, पाठीचा कणा व कंबर सरळ रेषेत असावीत. माउली म्हणतात, 'तैसे स्मरतेनि आदरे। सबाह्य सात्त्विके भरे। जव काठिण्य विरे। अहंभावाचे॥' डोळे पूर्ण वेळ मिटलेले असावेत.

पाठोपाठ साधक ब्रह्मभावाला प्राप्त होतो. प्रगाढ शांती अनुभवतो. माउली म्हणतात, 'जेथ पुढील पैस पारुखे। मागील स्मरावे ते ठाके। ऐसिये सरिसीये भूमिके। समाधी राहे॥' पहिला विचार संपलेला आहे आणि पुढचा विचार उठायचा आहे, यात काही अंतर असते. हे निर्विचार अवस्थेचे क्षण हळूहळू वाढत जाऊन साधकाला क्षणक्षण शांतीचा अनुभव येतो. त्याला 'धारणा' असे म्हणतात. ही निर्विचार अवस्था दीर्घ काळ टिकली, की त्याला ' ध्यान ' असे म्हणतात. पुढे त्याचीच परिणती समाधी अवस्थेत होते.

समाधी म्हणजे संपूर्ण चित्तरहित आत्मस्थिती. स्वामी माधवनाथ म्हणतात, 'निवांत राही ज्योत दिव्याची, तैसे मानस झाले। गुरुकृपेने निर्मळ होऊनी शांत तेवत राहिले॥' अशी शांती अनुभवलेला साधक व्यवहारातही शांती, समाधान आणि आत्यंतिक सुखाचा अनुभव घेतो. ही अवस्था टिकण्यासाठी मनाबरोबर सर्व इंद्रियांना सर्व बाजूंनी उत्तम आवरून धरणे आवश्यक आहे. पुढे त्याला व्यापक आत्मभावाची प्राप्ती कशी होते, ते पुढील लेखात पाहू. स्वामी मकरंदनाथ म्हणतात, 'निजसुखी रमुनी गेलो ध्यानी, सारूनी देहमनास।

**-डॉ. दिलीप शेठ**

# ग्रंथालये : लोकशिक्षणाची विद्यापीठे

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ ही ग्रंथालयांची राज्यस्तरीय शिखर संस्था. या संस्थेचे वार्षिक अधिवेशन दरवर्षी होत असते. असे ३१वे अधिवेशन २७ व २८ फेब्रुवारी, १९८७२ला वाई (जि. सातारा) येथे झाले, त्याचे स्वागताध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. संमेलनाध्यक्ष 'स्वामी'कार रणजित देसाई होते. या संमेलनाचे उद्घाटन प्रा. ग. प्र. प्रधान यांनी केले होते. स्वागतपर भाषणात तर्कतीर्थांनी वाईची ग्रंथपरंपरा विशद करून ग्रंथव्यवहाराचे महत्त्व लक्षात आणून दिले होते. त्या भाषणाचा सारसंक्षेप

ग्रंथ हा माणसाचा चिरंतन शिक्षक आहे. हाडामांसाचा-रक्ताचा शिक्षक केव्हा दूर जाईल, बाजूला होईल वा केव्हा कालवश होईल, याचा नियम नसतो. ग्रंथाचे तसे नसते. तो नीट सांभाळला तर कायम उपलब्ध होतो. ग्रंथ हे अक्षरामध्ये निबद्ध असल्यामुळे त्यातील माहिती किंवा ज्ञानसंपत्ती महत्त्वाची असेल, तर तो कालवश होण्याची भीती कमी असते, तो तसा सहसा होत नाही. शब्दाने ज्ञान चिरस्थायी बनते आणि तो शब्द अक्षर बनला म्हणजे त्याला अमरत्व प्राप्त होण्याची शक्यता प्राप्त होत असते. प्रतिभावंत कवी, विचारवंत, प्रज्ञावंत, शास्त्रकार व कलाकार हे ग्रंथरूपाने वा चित्ररूपाने अमर होतात. ग्रंथकाराची ग्रंथ ही वाङ्मयमूर्ती असते. या वाङ्मयमूर्ती हजारो वर्षे टिकतात आणि ग्रंथालयामध्ये एकत्र जमत जातात.

ज्ञानसंग्रह जितका मोठा तितकी संस्कृती मोठी. पुस्तक हे संस्कृतीचे मस्तक आहे, म्हणून पुस्तक मस्तकावर जे निरंतर धारण करतात, तेच जीवनयात्रेत यशस्वी होतात. पुस्तक ही संसार तारून नेणारी नौका आहे. हे नौदल ज्यांचे अधिक समर्थ ते भवसागरामध्ये अधिक यशस्वी होतात. मनुष्याच्या शिक्षणाचे अत्यंत यशस्वी असे अमोल साधन म्हणजे पुस्तक होय.

प्राचीन ग्रीक संस्कृतीमध्ये जेव्हा विद्या आणि कला यांची सर्व बाजूंनी भरभराट होत होती तेव्हा विचारवंत, लेखक आणि कलाकार यांना आविष्काराचे संपूर्ण स्वातंत्र्य होते. जगज्जेता सम्राट अलेक्झांडर हा जेव्हा सिंहासनावर आला, तेव्हा त्याच्या लक्षात आले की, यापुढे या उच्च पुस्तकी संस्कृतीचा ऱ्हास होण्याची शक्यता आहे. त्याने इजिप्तवर स्वारी केली आणि तेथे नाईलच्या मुखाजवळ भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर 'अलेक्झांड्रिया' या नावाच्या नगरीचे पुनर्वसन केले. त्या नगरीत एक संग्राहक व सर्वोत्तम ग्रंथालय निर्माण केले. ग्रीकांच्या पुस्तकी विद्यांचे संरक्षण होईल अशी तरतूद केली आणि त्याद्वारे ग्रीकांच्या बौद्धिक संस्कृतीला अमरपट्टा प्राप्त करून दिला. अनेक शतके तेथील आंतरराष्ट्रीय विद्यापीठात तत्कालीन विद्या व कला यांचे अध्ययन व अध्यापन चालू होते. इसवी सनाच्या चौथ्या शतकाच्या अखेरीस ख्रिश्चन धर्मवेड्यांनी तेथील ज्युपिटरचे देऊळ, ग्रंथालय व संग्रहालयही धुळीस मिळविले. जेव्हा जेव्हा रासवट रानदांडगे, शस्त्रधारी व सत्ताधारी पुस्तकी संस्कृतीची उपेक्षा करतात व नाश करतात तेव्हा राष्ट्रांचा



ऱ्हास होऊ लागतो. तेथूनच राष्ट्राच्या व विशेषत: भारताच्या ग्रंथसंपदेचा वारंवार विध्वंस केल्याच्या कथा इतिहासात नमूद झाल्या आहेत.


आज भारतात स्वातंत्र्योत्तर काळात संसदीय लोकशाही राज्यपद्धती स्थापन झाली आहे. या लोकशाहीची स्थापना एका उत्कृष्ट राज्यघटनेने घटना समितीद्वारा झाली आहे. लोकशाहीचे लोकशिक्षण हे अधिष्ठान होय. आपल्या देशामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात कनिष्ठ, मध्यम व उच्च पातळीवर हजारो किंवा शेकडो शिक्षण संस्था स्थापन झाल्या आहेत. त्यामानाने ग्रंथालयांचा विस्तार फारच अपुरा आणि तोटका दिसतो. ग्रंथालय हीसुद्धा नागरिकांची मुक्त शिक्षण संस्था असते. बालविद्यालय, माध्यमिक विद्यालय, महाविद्यालय आणि विद्यापीठ या प्रकारच्या आकारिक पद्धतीने शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये शिकणारे आणि शिकवणारे, विद्यार्थी आणि शिक्षक आणि त्यांच्या व्यतिरिक्त असलेले लहान-मोठे नागरिक या सर्वांचे विद्यालय वा महाविद्यालय म्हणजे ग्रंथालय होय. बालपणापासून अखेरच्या क्षणापर्यंत ज्यात प्रवेश मिळतो आणि विद्या मिळते असे विद्यालय म्हणजे ग्रंथालय होय. लोकशाही शिक्षित, समर्थ लोकच चालवू शकतात. त्यामुळे ग्रंथालये ही निरंतर लोकशिक्षण देणारी विद्यापीठेच आहेत. त्यांना ऊर्जितावस्था प्राप्त करून देणे, हे नित्य वाचनानेच शक्य आहे''

**● डॉ. सुनीलकुमार लवटे**

# प्रशांत किशोर फॅक्टर !

बिहार विधानसभा निवडणुकीत प्रशांत किशोर फॅक्टर महत्वाचा आहे.राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडी आणि भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी या दोन आघाड्या महत्वाच्या असल्या तरी प्रशांत किशोर यांच्या नेतृत्वाखालील जनसुराज्य पक्ष हाही बिहार विधानसभा निवडणुकीत सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.प्रशांत किशोर यांचा पक्ष बिहार विधानसभेच्या सर्व जागा लढवणार आहे.

राजकीय रणनितिकार प्रशांत किशोर हे नाव सुपरिचित आहे.२०११ साली गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी रणनितिकार प्रशांत किशोर यांची २०१२ मध्ये होणाऱ्या गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी मदत घेतली होती.त्यांच्या उत्तम रणनितिमुळे २०१२ साली झालेल्या गुजरात विधानसभा निवडणुकीत भाजपाने विजय मिळवला आणि नरेंद्र मोदी पुन्हा एकदा गुजरातचे मुख्यमंत्री झाले.त्यानंतर २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने त्यांची मदत घेतली आणि त्यांच्या उत्तम निवडणुक स्ट्रॅटेजीच्या जोरावर भाजपाला त्या निवडणुकीत स्वबळावर बहुमत मिळाले.२०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर प्रशांत



किशोर यांचे नाव सर्व भारतभर पसरले.प्रशांत किशोर म्हणजे यश असे समिकरण तयार झाले.

२०१५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत नितीशकुमार यांनी प्रशांत किशोर यांची मदत घेतली.भाजपाची साथ सोडल्यानंतर, नितीशकुमार हे लालूप्रसाद यादव यांच्या पक्षाशी आघाडी करून २०१५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुका लढले.त्या निवडणुकीत प्रशांत किशोर यांच्या व्युहरचनेच्या जोरावर नितीशकुमार यांना मोठा विजय मिळाला.त्यानंतर २०१७ साली उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने प्रशांत किशोर यांचे सहाय्य घेतले.काँग्रेसने त्या निवडणुका समाजवादी पक्षाबरोबर आघाडी करून लढवल्या होत्या.काँग्रेसला ऊर्जितावस्था आणण्यासाठी त्यावेळी प्रशांत किशोर यांनी बरेच प्रयोग केले होते.प्रियांका गांधी यांनी निवडणुकीत सक्रिय भाग घेतल्यास काँग्रेससाठी ते फायद्याचे ठरेल असा सल्ला प्रशांत किशोर यांनी काँग्रेसला दिला होता.अखिलेश यादव आणि राहुल गांधी यांचे संयुक्त नेतृत्व, उत्तरप्रदेश मधील मतदारांवर चांगला प्रभाव पाडू शकेल असा त्यांचा अंदाज होता.मात्र त्यांचे डावपेच यशस्वी झाले नाहीत.

२०१७ च्या उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने १०५ जागा लढवल्या होत्या, त्यापैकी केवळ ७ जागा काँग्रेसला जिंकता आल्या आणि काँग्रेसचा दारुण पराभव झाला.प्रशांत किशोर यांच्यासाठी हा मोठाच धक्का होता.प्रशांत किशोर म्हणजे यश ही जी ख्याती त्यांनी मिळवली होती ती उत्तरप्रदेश मधील काँग्रेसच्या लाजिरवाण्या पराभवानंतर धुळीस मिळाली.मात्र उत्तरप्रदेशचा अपवाद वगळता,त्यानंतरही किशोर यांनी पंजाबमध्ये अमरिंदरसिंग यांना, आंध्रप्रदेशमध्ये जगनमोहन रेड्डी यांना, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांना विधानसभा निवडणुकीत चांगले यश मिळवून दिले.

२०२२ साली किशोर यांनी बिहारच्या राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला.ऑक्टोबर २०२२ मध्ये त्यांनी आपली जनसुराज्य पदयात्रा सुरू केली.ती एक वर्षापेक्षा जास्त काळ सुरू होती.त्यांनी आपल्या पदयात्रेच्या दरम्यान बिहार मधील सुमारे पाच हजार गावांना भेटी दिल्या.त्यांनी तेथील लोकांशी चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.त्यानंतर त्यांनी आपल्या जनसुराज्य पक्षाची घोषणा केली.गेल्या काही दिवसांत निरनिराळ्या क्षेत्रांतील लोक जनसुराज्य पक्षात सामील झाले आहेत.मात्र जनसुराज्य पक्षाची मुख्य समस्या अशी आहे की त्यांच्याकडे मजबूत संघटना नाही.प्रशांत किशोर यांच्यासारखा लोकप्रिय असा एकही नेता जनसुराज्य पक्षाकडे नाही.त्यामुळे निवडणुक प्रचाराची सारी धुरा किशोर यांना सांभाळावी लागणार आहे.

किशोर यांनी स्वतः निवडणुक न लढविण्याचा घेतलेला निर्णय सयुक्तिक म्हणावा लागेल,कारण ते त्यामुळे आपल्या मतदारसंघात अडकून पडले असते.सुरूवातीला ते राघोपूर विधानसभा मतदारसंघातून तेजस्वी यादव यांच्या विरोधात निवडणूक लढवणार असल्याचे बोलले जात होते, मात्र आता त्यांनी त्याचा इन्कार केला आहे.किशोर यांच्या पक्षाला निवडणुकीत किती यश मिळेल या बाबत आताच काही सांगता येणार नाही.स्वत: किशोर यांनाही त्याचा अंदाज घेता आलेला दिसत नाही.त्या बाबतीत त्यांनी नुकतेच असे वक्तव्य केले आहे की त्यांच्या पक्षाला एक तर १५० च्या आसपास जागा मिळतील किंवा त्यांच्या पक्षाची गाडी दहा जागांच्या पुढे सरकणार नाही.याचा अर्थ आपल्या पक्षाला निवडणुकीत जनतेचा कसा प्रतिसाद मिळेल या बाबत ते अंधारात चाचपडत आहेत.त्यांच्या सारख्या निष्णात राजकीय रणनितिकाराला त्याबाबत बरोबर अंदाज बांधता येत नसेल तर ती गोष्ट आश्चर्यकारकच म्हणावी लागेल.

जनसुराज्य पक्षाला किती जागा मिळतील या बाबत अंदाज बांधणे कठीण असले तरी तो पक्ष आपले उपद्रव मूल्य सिध्द करु शकेल.राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडी आणि भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांच्या मतांमध्ये मोठ्या प्रमाणात फूट पाडून, विधानसभा निवडणुकीची सारी समिकरणे बदलण्याची ताकत जनसुराज्य पक्षामध्ये नक्कीच आहे आणि ती ताकद तो पक्ष विधानसभा निवडणुकीत निश्चितपणे दाखवेल.कदाचित तो पक्ष किंगमेकरही बनू शकेल.

**● अभय गोखले**

# बांबू वृक्ष संगोपनाच्या देयकात घोळ : शासनाला गंडा

## पातूरच्या चांगेफळ, शिरपूर परिसरातील प्रकार उघडकीस

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत चांगेफळ व शिरपूर परिसरात रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या बांबू वृक्ष लागवडीमध्ये मोठा घोळ उघडकीस आला आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्षात अत्यल्प प्रमाणात बांबू लागवड झालेली असताना, कागदोपत्री शेकडो वृक्ष लागवडीची संख्या दाखवून देयक हडप करून शासनाला गंडा लावल्याचा प्रकार समोर आला आहे.

या प्रकाराकडे पंचायत समितीतील रोजगार हमी योजनेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असून, त्यांच्या आशीर्वादानेच हा आर्थिक गैरप्रकार सुरू असल्याची चर्चा सुरू आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर अल्प प्रमाणातच बांबू वृक्ष दिसून येत असून, कागदोपत्री दाखविलेल्या आकड्यांमध्ये व वास्तवात मोठे अंतर असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. त्यामुळे शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या गैरप्रकारामुळे शासनाला लाखो रुपयांचा तोटा झाला असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून शासनाच्या निधीचा अपव्यय करणाऱ्यांकडून वसुली करावी, अशी मागणी होत आहे.



'पातूर पंचायत समिती अंतर्गत अनेक ठिकाणी वृक्ष लागवड व संगोपनाच्या कामात भ्रष्टाचार सुरू आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या लाचखोरीमुळे शासनाला कोट्यवधी रुपयांचा गंडा बसत आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नाही. रोहियोच्या उपजिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेण्याची गरज आहे.'

**दिलीप परनाटे,** जिल्हाध्यक्ष शिवसंग्राम

................

'चांगेफळ व शिरपूर परिसरातील बांबू लागवड बाबत प्रत्यक्ष मोका पाहणी करून चौकशी करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या बांधावर ज्या प्रमाणात बांबू वृक्ष आढळतील, त्यानुसारच मजुरांना संगोपनाचे देयक अदा करण्यात येईल.'

**आर. बी. चौधरी,** तांत्रिक सहाय्यक, पातूर पंचायत समिती

# आलेगाव परिसरातील रुग्णांसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू

- सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांचा समाजहितार्थ उपक्रम
- रुग्णवाहिका सेवा संपर्क क्रमांक: ८६९८९०१०५७

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील आलेगाव परिसरातील नागरिकांसाठी आरोग्याच्या क्षेत्रात मोठा दिलासा देणारी आनंदवार्ता — सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्या पुढाकारातून आलेगाव व परिसरातील गावांसाठी २४ तास मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली आहे.

या सेवेमुळे तातडीच्या प्रसंगी रुग्णांना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पूर्वी परिसरात रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने गंभीर रुग्णांना वेळेवर उपचार न मिळाल्याने प्राण गमवावे लागत होते. तसेच खाजगी वाहनांमध्ये प्रथमोपचार सुविधा नसल्याने अनेक अडचणी निर्माण होत होत्या.



ही सामाजिक गरज ओळखून निलेश कापकर यांनी स्वखर्चातून रुग्णवाहिका खरेदी करून सेवा सुरू केली आहे. गंभीर अवस्थेतील रुग्णांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, तर आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिकांनी डिझेल खर्चासाठी स्वेच्छेने मदत करावी, असे आवाहन कापकर यांनी केले आहे.

या उपक्रमामुळे आलेगावसह परिसरातील सर्व गावांतील नागरिकांना तात्काळ आणि सुरक्षित वैद्यकीय मदत मिळणार आहे.

# बिर्ला राम मंदिर येथे श्री देवी भागवत कथा ज्ञानयज्ञाचे भव्य आयोजन



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला- ' देवी भागवत कथा 'आयोजन समितीच्या वतीने स्थानिक बिर्ला रोड परिसरातील बिर्ला राम मंदिर येथे भव्य ' देवी भागवत कथा ' उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.लाखो भक्तांचे तारणहार पूज्य योगाभ्यानंद श्री माधवनाथ महाराज यांच्या आशीर्वाद आणि प्रेरणेने तसेच श्रीनाथ मंदिर संस्थान इंदोर , श्रीनाथ दत्त मंदिर ,रामदास पेठ अकोला व बिर्ला राम मंदिर, अकोला यांच्या सहकार्याने दिनांक १३ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर पर्यंत नित्य दुपारी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत बिर्ला राम मंदिर येथे ही देवी भागवत कथा होणार आहे. यजमान आकि. 'संजय महाशब्दे व मंजुषा महाशब्दे यांनी आयोजित केलेल्या या उत्सवात योगाभ्यानंद पूज्य माधवनाथ महाराज यांच्या प्रत्यक्ष उपयोगात आलेल्या पादुकांचे दर्शन देखील भक्तांना नित्य होणार आहे. श्रीनाथ महाराजांच्या पादुका शहरातील अनेक नाथभक्तांकडे पुजनासाठी घरोघरी देखील जाणार असून तशी नोंदणी जोरात सुरू आहे. पादुका पुजनाची तळमळ असलेल्या भक्तांना श्रीनाथ दत्त मंदिरात तशी नोंद आणि मागणी करता येईल. आयोजन समितीने साकारलेल्या या ज्ञानयज्ञात पुणे येथील देवी भागवत कथाकार ,दासबोधाचे गाढे अभ्यासक , समर्थ भक्त मकरंद बुवा सुमंत रामदासी हे आपल्या अमोघ वाणीतुन भागवत कथा सादर करणार आहेत.या उत्सवात वेदमूर्ती श्री नागेश मूर्तीकर हे संहिता वाचन करणार आहेत.या सात दिवसीय कथा ज्ञानयज्ञात श्रीमद देवी भागवत महात्म्य, मधु कैट्भ, व्यास तपश्चर्या, शुक्राचार्य -जनक संवाद, राजा जनमेजय यांना उपदेश, दैवी विमान, देवीच्या बीज मंत्राचे रहस्य, श्रीरामाची देवी उपासना, कर्मवीपाक सिद्धांत, नरनारायण तपचर्या, कृष्ण जन्मोत्सव, महिषासुर, शुंभ निशुंभ वध, राजा सुरथ व समाधी वैश्य कथा, नारद चरित्र, सुकन्या च्यवन, दाक्षायणी कथा, १०८ शक्तीपीठे, देवी गीता, नरक वर्णन, रुद्राक्ष भस्म महिमा, गायत्री महात्म, परिक्षित मोक्ष आदी कथा श्री मकरंद बुवा सुमंत आपल्या कथेत सादर करणार आहेत.बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर रोजी कथेचे अंतिम सप्तम पुष्प सकाळी ८ वाजता सुरू होऊन कथा सप्ताहाची पूर्णाहुती, महाप्रसाद वितरण दुपारी १ वाजता होणार आहे. या उत्सवाची जय्यत तयारी आयोजन समितीच्या वतीने सुरू करण्यात आली आहे. सणांसुदीच्या पावन पर्वात आयोजित या श्रीमद् देवी भागवत कथेचा समस्त महिला पुरुषांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा.

# अनुसूचित जाती उमेदवारांसाठी उद्योजकता प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राद्वारे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील युवक व युवतींसाठी एक महिना कालावधीचे विनामूल्य उद्योजकता विकास प्रशिक्षण आयोजिण्यात आले आहे.

या शिबिराचा सुरूवात दि. ३० ऑक्टोबरला होऊन ते दि. २९ नोव्हेंबरला पूर्ण होईल. अनुसूचित जातीतील युवक-युवती, नवउद्योजकांना उद्योजकता विकासासंबंधी प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःचा उद्योग व्यवसाय - स्वयंरोजगार निर्माण करण्यास प्रवृत्त करणे हा कार्यक्रमाचा उद्देश आहे. अनिवासी स्वरुपाच्या या प्रशिक्षण कार्यक्रमामधून सहभागी प्रशिक्षणार्थींना उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, विविध क्षेत्रातील उद्योगसंधी, उद्योगाची निवड आदींचे प्रशिक्षण मिळेल.

त्याचप्रमाणे, उद्योग उभारणी व व्यवस्थापन ,बाजारपेठ पाहणी व व्यवस्थापन, उद्योग व्यवसायाशी निगडीत कायदे व अंमलबजावणी कार्यपद्धती , उद्योग आधार नोंदणी , शासकीय विविध कर्ज योजना-सोयी सवलती आणि कार्यप्रणाली , सिद्धी प्रेरणा प्रशिक्षण, उत्पादनाच्या किंमती , हिशोब पध्दती , प्रकल्प अहवाल तयार करणे , उद्योजकांचे अनुभव कथन ,उद्योगांना प्रत्यक्ष भेटी , डिजिटल मार्केटिंग तसेच उद्योगाचे वित्तीय व्यवस्थापन याविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे . किमान इयत्ता आठवी उत्तीर्णांना प्रवेश मिळू शकेल. वयोमर्यादा १८ ते ४५ आहे. जातीचे प्रमाणपत्र आवश्यक. आधारपत्र, पॅनकार्ड, शाळा सोडण्याचा दाखला, गुणपत्रिका, छायाचित्रे आदी कागदपत्रे घेऊन दि. २७ ऑक्टोबरला दु. २ वाजेपर्यंत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, शुक्ल सदन, दुर्गा चौक, अकोला येथे हजर राहावे. दुपारी २ वाजता मुलाखती घेऊन प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात येणार आहे अधिक माहितीकरिता प्रसन्न रत्नपारखी, प्रकल्प अधिकारी, एमसीईडी व विजय बेदरकर, प्रकल्प अधिकारी, बार्टी, अकोला यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय अधिकारी किशोर अंभोरे व उद्योग महाव्यवस्थापक संतोष बनसोड यांनी एक पत्रकाद्वारे सांगितले आहे.

# वनी–कानशिवणी रस्ता खड्ड्यांनी भरला

■ प्रतिनिधी | अकोला ■

सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला अंतर्गत येणाऱ्या वनी ते कानशिवणी गावाच्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, या रस्त्यावरून वाहने चालविणे म्हणजे वाहनधारकांसाठी अक्षरशः कसरत ठरत आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेविरुद्ध संतप्त झालेल्या शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सरनाईक यांना निवेदन देऊन तातडीने रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली. हे निवेदन शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मुकेश मुरुमकार आणि शिवसेना उपतालुकाप्रमुख बाळासाहेब अतकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका सरचिटणीस योगेश बोधडे व सर्कल प्रमुख सिद्धेश्वर सारसे यांनी सादर केले. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की

'वनी–कानशिवणी मार्गावर मोठमोठे खड्डे पडले असून, रस्त्याचे डांबर पूर्णपणे निघून गेले आहे. दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी आणि शालेय वाहने या मार्गाने धावतात.

# गरजू कर्णबधिर चिमुकल्याला दिले श्रवणाचे 'सामर्थ्य'



## सामाजिक उपक्रमाची दिवाळी पहाट अंतर्गत मदतीचा हात

■ प्रतिनिधी | अकोला ■

वंचित, गरजू, निराधारांच्या जीवनात दिवाळसणाचा आनंद पेरुन 'सामाजिक उपक्रमांची दिवाळी पहाट' हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम सामर्थ्य फाउंडेशनच्यावतीने गेल्या तीन वर्षांपासून निरंतर राबविण्यात येत आहे. संस्थेच्यावतीने एकविरा फाउंडेशनद्वारे संचालित बालविकास केंद्रातील चिमुकल्या विद्यार्थ्याला कर्णबधिर यंत्राचे उपकरण देऊन त्याचात श्रवणांचे 'सामर्थ्य' निर्माण केले. या भावस्पर्शी उपक्रमातून श्रवण क्षमता प्राप्त केल्याने चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते.

समाजातील गरजू, निराधारांना सुद्धा सणाचा आनंद मिळण्यासाठी सामर्थ्य फाउंडेशनने पुढाकार घेतला. अनेक गरजूंच्या जीवनात दिवाळीचा आनंद पेरण्यासाठी संस्थेच्यावतीने वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून बालविकास केंद्रातील गरजू चिमुकल्याला मदतीचा हात देण्यात आला. सामाजिक दिवाळीच्या या कार्यक्रमात

एकविरा फाउंडेशनचे श्रीकांत बनसोड, सूचिता बनसोड, विश्वस्त दीपक जोशी, सामर्थ्यचे अध्यक्ष प्रबोध देशपांडे, वरिष्ठ उपाध्यक्ष विनोद देव, कनिष्ठ उपाध्यक्ष प्रवीण पळसपगार सचिव डॉ. गजानन वाघोडे, आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# गुणवत्ता व नागरिक-केंद्रित संवादावर भर द्यावा -केंद्रीय सचिव संजय जाजू



■ प्रतिनिधी | अकोला ■

३३ वर्षापासून मनोरंजन व माहितीचे अखंड कार्य करणाऱ्या अकोला आकाशवाणीने सार्वजनिक प्रसारणाची गुणवत्ता अधिकाधिक परिणामकारक कशी करता येईल, संवाद विषयक कार्यक्रमावर शेतकरी, सामान्य जनतेच्या यांच्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या कार्यक्रमाची निर्मिती करावी असे निर्देश केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी दिले. ते अकोला येथे आकाशवाणी कार्यक्रमासंदर्भातील आढावा बैठकीमध्ये बोलत होते. श्री.जाजू यांनी अकोला आकाशवाणी वरून प्रसारित होणाऱ्या किसानवाणी, महिलाविश्व, लोकसंगीत यासह विविध कार्यक्रम तसेच आकाशवाणीने मागील ३३ वर्षात केलेल्या कार्याचा आढावा घेतला.यावेळी श्री.जाजू यांनी आकाशवाणीच्या माध्यमातून सामूहिक स्तरावर प्रयत्न करीत स्थानिक जाहिरात संकलनाच्या कार्याला गती द्यावी, प्रेरणादायी कार्यक्रमाची निर्मिती करावी बहुजन हिताय बहुजन सुखाय ब्रीद सार्थकी ठरवण्याचे निर्देश दिलेत.आकाशवाणीचे प्रसारण अधिकारी सूरज गोळे, ग्रंथपाल प्रकाश वैद्य यांनी आकाशवाणीच्या विविध उपक्रमाबाबत माहिती दिली.

# प्रारूप मतदार यादी तयार करणे संदर्भात मनपात बैठक संपन्न

**सार्वत्रिक निवडणूक - २०२५**



■ प्रतिनिधी | अकोला ■

दि. २४ ऑक्टोंबर २०२५ रोजी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ करीता प्रारूप मतदार यादी तयार करणे संदर्भात बैठक संपन्न झाली.

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ करीता मा. राज्य निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार मतदार यादी विभाजन करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला असून दि.२१ ऑगस्ट २०२५ च्या अधिसूचनेन्वये दि १ जुलै, २०२५ ही ण्लू र्ईर्ङ्ग जाहीर केली असून, त्या दिवशी (म्हणजेच दि. १ जुलै, २०२५ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजन करुन प्रारुप मतदार यादी दि. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्दी करणे बाबत निर्देशित करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने विधानसभेची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजन करण्याचे काम विहीत वेळेत पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे सदरचे काम निर्धारीत वेळेत व अचूक करण्याकरिता तसेच यादीवरील प्राप्त हरकती व सूचनांचे निरसन करणे, प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी तयार करणे तसेच केंद्रनिहाय मतदार यादी तयार करण्याच्या कामाकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये नोडल अधिकारी, नियंत्रण अधिकारी तसेच प्रभागनिहाय पर्यवेक्षक, कनिष्ठ अभियंता, स्वच्छता निरीक्षक, कर वसुली लिपीक यांची नियुक्ती करण्यात आली असून सदर बैठकीमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचर-यांना मतदार यादी तयार करणे संदर्भातील मार्गदर्शन करण्यात आले आहे. यावेळी मनपा उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, सहा.आयुक्त देविदास निकाळजे, राजेश सरप, पंकज जोगळेकर, क्षेत्रीय अधिकारी गजानन घोंगे, जी.आय.एस.विभाग प्रमुख चंदन प्रसाद, आय.टी.सिस्टीम मॅनेजर हीरा मानकर, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा तसेच स्वच्छता निरीक्षक, कर वसुली लिपिक आणि मनपा शिक्षकांची उपस्थिती होती.

## जाहीर सुचना

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार, हनुमानजी सिगतीया, सौ सुशीला कोठारी व सौ सुनीता कोठारी यांचे कडून त्यांचे मालकीचे मौजे शिवापूर, ता. जी. अकोला येथील सर्व्हे नं २९३/२ व १०१/२ मधील मंजूर लेआऊट प्लॅट क्र २६ क्षेत्रफळ १५३ चौ.मी. श्री सुरेश नानकराम मनवानी यांचे मार्फत विकत घेत आहेत ज्यास चतु:सीमा: पूर्वेस- वेगळे लेआउट, पश्चिमेस - प्लॉट क्र २५, उत्तरेस - प्लॉट क्र २७, व दक्षिणेस- ६ मीटर रोड, व तसा करार झालेला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.

शिक्का

**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला
मोबाईल क्र ९८२३०९१३७७

# रस्त्याचे काम रखडले; नागरिकांमध्ये तीव्र रोष!



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगर पालिका प्रभाग क्रमांक १४ अंतर्गत येणाऱ्या शिवणी येथील पंचशिल किराणा ते शहीद प्रशांत राऊत चौक या मुख्य रस्त्याचे भूमिपूजन ऑक्टोबर २०२५ महिन्यात आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. भूमिपूजन होऊन तब्बल १५ दिवस उलटूनही काम सुरू झालेले नाही, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

हा रस्ता अकोला शहराला थेट एमआयडीसी आणि कुंभारी गावाशी जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. दिवसेंदिवस वाढत्या वाहतुकीमुळे या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, मोठमोठे खड्डे व उखडलेला डांबर यामुळे वाहनचालकांना अक्षरशः कसरत करून प्रवास करावा लागतो. दररोज छोटे-मोठे अपघात घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे.

सदर रस्ता खासदार अनुप धोत्रे यांच्या निधीतून १ जुलै २०२५ रोजी मंजूर झाला असून अकोला महानगरपालिकेनेही या कामाला तांत्रिक मंजुरी दिली आहे. मात्र, मंजुरी मिळून चार महिने उलटले तरी कामाचा एकही टप्पा प्रत्यक्षात सुरू झालेला नाही, ही बाब जनतेच्या नाराजीस कारणीभूत ठरत आहे. या संदर्भात अकोला पंचायत समितीचे माजी सदस्य जयेंद्र वानखडे व सामाजिक कार्यकर्ते प्रविण वाहुरवाघ यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार निवेदन देऊन काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.

'गावकऱ्यांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन काम सुरू केले नाही, तर आम्हाला तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल,' असा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, नागरिकांनीही प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर नाराजी व्यक्त करत, 'भूमिपूजन झालं, फलक लागले, पण काम मात्र शून्य!' अशा शब्दांत संताप व्यक्त केला आहे.

भूमिपूजनानंतरही काम सुरू न होणे हे जनतेचा विश्वासघात असल्याचे मत व्यक्त होत असून, तातडीने कामाला सुरुवात न झाल्यास नागरिकांचा संयम सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही.



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# शेळकेंच्या आशीर्वादाने मालामाल करणारी 'रेती' घेत आहे जीव

## रेतीतून राजघराण्यांसारखी ऐश : पण जनतेचे प्राण धुळीला

**वर्धा।जनमाध्यम**

रेतीचा सोन्यासारखा व्यापार. पण त्यावर श्री शेळके सारख्या अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने माफियांची काळी छाया, शासनाने नागरिकांना स्वस्तात रेती मिळावी म्हणून योजना आणली, पण माफियांनी त्यालाच लुटीचा उत्सव बनविला. आता रेतीमुळे पोट भरण्याऐवजी अहोरात्र मृतांचा हिशेब वाढतो आहे. देवळी तालुक्यातील अंदोरी येथील रवींद्र पारिसे याचा खून हा त्याच मालिकेतील ताजाच बळी.वर्धा नदी आणि तिच्या उपनद्यांतील उच्च प्रतीची रेती राजकारण आणि माफियांचे सामर्थ्य दाखवते. लिलाव न झालेल्या घाटांवर काहींनी उघडपणे हा घाट



आमचा,अशी घोषणा देत रात्रीच्या काळोखात उपसा आणि वाहतूक सुरू ठेवली आहे. या टोळ्यांना काही तथाकथित 'व्हाईट कॉलर' नावांचे संरक्षण मिळाले आहे, हे आता उघड गुपितच आहे.

पोलीस आमचे, महसूल आमचा माफियांचा उघड गर्जना देवळी व हिंगणघाट तालुक्यांत सर्वाधिक बेकायदा व्यवहार होत असून, वाहनांमधून रात्रीच्यावेळी रेती वाहून नेली जाते. ग्रामीण भागातील रस्ते उखडले जात आहेत, तर शेतकऱ्यांना अपार त्रास सहन करावा लागत आहे. याच वाहतुकी दरम्यान मांडगाव घाटावर दोन वर्षांपूर्वी एका तरुणाचा जीव गेला

> खनिकर्म अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने रेती माफियांचे राज्य; पैसे घेत काही माध्यमांना दिवाळीचे वाटप
> जिल्हाधिकारी कार्यालयातील खनिकर्म अधिकारी श्री शेळके यांच्या आशीर्वादाने रेती माफियांच्या कारभाराला मोठा बळ मिळाल्याचे खळबलजनक खुलाशा झाला आहे. याच अधिकाऱ्यांच्या नावावरून, रेत माफियांनी पैसे घेऊन काही माध्यमांना दिवाळी भेट म्हणून वाटप केले असल्याची चर्चा जोर धरली आहे. अवैध रेत वॅटणे आणि प्रसार माध्यमात वाटप करणाऱ्या या सत्ताधारी गटामुळे ही गर्दी खूपच वाढली असून, माफियांनी हत्या करणेही हिंमत धरले आहे.

पण पैशाच्या चकाकीत ते प्रकरण दबले गेले.

रेतीने काहींचे बंगले भरले, तर कित्येकांचे घर उद्धवस्त केले

गत दशकात रेती व्यवसायातून धनाढ्य झालेले काही आता सत्ता आणि पैशाच्या जोरावर हा काळाबाजार चालवत आहेत. आता जिल्हाभर महसूल व पोलिस विभागाचे संयुक्त पथक तयार करून धडक कारवाई राबविण्याची मागणी होत आहे. शासनाने तातडीने रेतीघाटांचा लिलाव पारदर्शक पद्धतीने न केल्यास जिल्ह्याची रेती लवकरच रक्ताने लाल होईल

## अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

**हिंगणघाट :** हिंगणघाट तालुक्यातील पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे वना नदीच्या पात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर छापा टाकला. ट्रॅक्टर क्रमांक १८ २९० ३४७१ पकडण्यात आला असून त्यातून सहा लाख ४ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. ट्रॅक्टरचा चालक लक्ष्मण मधुकर घुसे (रा. वाघोली) याने रॉयल्टी बाबत विचारले असता कागदपत्र नसल्याचे कबूल केले. पोलिसांनी या प्रकरणी ट्रॅक्टर चालक लक्ष्मण लक्ष्मण घुसे व ट्रॅक्टर मालक सचिन हरी भोयर (रा. खैराटी) यांच्यावर ३०३ (२), ३, ५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई हिंगणघाट पोलिस ठाण्याचे ठाणेदार अनिल राऊत यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे पथकाच्या तपासणी पथकाने केली.

## अंदोरीतील रवींद्र पारिसे यांची निर्घृण हत्या; आरोपींना फाशीची मागणी

### भोई समाजाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन; कुटुंबाला न्याय व मदतीची मागणी

**देवळी जनमाध्यम :** तालुक्यातील अंदोरी येथील रवींद्र अशोक पारिसे (वय ५०) यांची कळंब तालुक्यातील चिंचोलीजवळील बारमध्ये निघृण हत्या झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेविरोधात भोई समाजाने तीव्र संताप व्यक्त करत मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे.महर्षी वाल्मिकी भोई समाज आणि विदर्भ भोई समाज संघटनेच्या प्रतिनिधींनी पोलिस उपनिरीक्षक अश्विन गजभिये यांच्या मार्फत हे निवेदन सादर केले. घटनेतील आरोपींना तातडीने अटक करून प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, असा आग्रह निवेदनात करण्यात आला आहे.ही घटना भोई समाजाला हादरविणारी असल्याचे नमूद करत, मृताच्या कुटुंबाला न्याय मिळावा, त्यांना सरकारी संरक्षण व आर्थिक मदत दिली जावी, तसेच परिसरात पोलिस गस्त वाढविण्याची मागणी समाजबांधवांनी केली आहे.या निवेदनावर रवींद्र पारिसे, शंकर केवदे, जगदीश मांढरे, पुष्पा करलुके, किरण पारिसे, हनुमंत मांढरे, मडावी, सचिन पारिसे, दिलीप करलुके, मुकुंद नान्हे, पवन बावणे, अजय शिवरकर, तनय ढोले आणि मिलिंद जांभुळकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### संक्षिप्त

## दिवंगत कामगाराच्या कुटुंबीयांना १ लाख ३५ हजारांची आर्थिक मदत

**हिंगणघाट जनमाध्यम :** गिमाटेक्स इंडस्ट्रीज वणी युनिटच्या कामगारांकडून दिवंगत सहकाऱ्याच्या कुटुंबीयांना १ लाख ३५ हजार ७०० रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. ही मदत वर्धा जिल्हा सुती मिल मजदूर संघटनेच्या माध्यमातून आमदार समीर कुणावार व मिलिंद देशपांडे यांच्या पुढाकाराने करण्यात आली. इंडस्ट्रीजच्या गिमाटेक्स रिंगफ्रेम ऑटोकोनर पीव्ही विभागात कार्यरत असलेले भिमराव जंगले यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले होते. त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य व्हावे म्हणून फॅक्टरी मॅनेजर पठाण यांनी आमदार कुणावार आणि देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पुढाकार घेतला. या उपक्रमाअंतर्गत सर्व कामगारांच्या पगारातून प्रती कामगार १०० रुपये इतकी स्वेच्छा कपात करून एकूण १ लाख ३५ हजार ७०० रुपये इतकी रक्कम जमा करण्यात आली. ही संपूर्ण रक्कम दिवंगत कामगाराच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत म्हणून सुपूर्द करण्यात आली. या प्रसंगी संघटनेचे जनरल सेक्रेटरी पांडुरंग बालपांडे, दामोधर देशमुख, दिवाकर बरबटकर, जिवन भानसे, प्रशांत शेळके, हेमंत भगत, विनोद कावळे, श्रावण थुटे, लक्ष्मण जयपूरकर, जयंत बावणे, राहुल देशमुख, मनोहर जुमडे, विजय थुल, विनोद कोल्हे, राकेश तराळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## दारूच्या नशेत तरुणाची आत्महत्या

**वर्धा :** नैराश्यातून तरुणाने घरातच गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना वर्धा शहरातील पुलफैल वॉर्ड क्र. २६ येथे घडली. मृतक तरुणाचे नाव विजय बृजलाल यादव (३५) असे आहे. माहितीनुसार, विजय यादव हा दूध विक्रीचा व्यवसाय करत होता. त्याला दारूचे व्यसन होते. व्यवसायातून मिळणारा पैसा तो दारू पिण्यासाठी वापरत असे. हळूहळू त्याचे व्यसन वाढत गेले. त्याच्या या वागणुकीमुळे त्याची पत्नी दोन वर्षांपूर्वीच मुलांसह माहेरी निघून गेली होती. पत्नीच्या या विभक्त होण्यामुळे विजय मानसिकदृष्ट्या खचला होता. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी, नशेच्या अवस्थेत असताना त्याने घरातच दोरीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून प्रकरणाची नोंद केली आहे.

## २४ तासांत सावंगी पोलिसांचा यशस्वी तपास; महिला आरोपी अटकेत

**वर्धा जनमाध्यम :** सावंगी मेघे पोलिसांनी केवळ २४ तासांच्या आत घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणून १ लाख २२ हजार रुपयांचा चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत केला. या प्रकरणी एका महिला आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.गौरीनगर, सावंगी मेघे येथील रहिवासी नितीन गावंडे (वय ३८) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद केले की त्यांच्या



नव्या घरातील खोलीचा दरवाजा वाकवून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून सेरा कंपनीच्या नळफिटिंग साहित्याची चोरी केली. चोरी गेलेल्या साहित्याची एकूण किंमत सुमारे १,२२,६४८ रुपये इतकी आहे.या प्रकरणी गुन्हा क्रमांक ८२८/२०२५ नोंद झाल्यानंतर सावंगी पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. प्रभारी ठाणेदार सदाशिव ढाकणे व सहा. पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे संशयित पूजा शांताराम शिंदे (वय २४) हिच्या राहत्या घरावर छापा टाकला. घरझडती दरम्यान चोरीस गेलेले सर्व साहित्य मिळून आले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली.

## गौतम बुद्धांचे विचार आचरणात आणल्यास जीवन समृद्ध : प्रा.महाकाळे

**समुद्रपूर जनमाध्यम :** विद्या विकास कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक समितीच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात माजी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. दशरथ महाकाळे यांनी युवकांना बौद्ध धम्माचे जीवनमूल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या विकास शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. नयना शिरभाते होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य प्रा. मेघश्याम ढाकरे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. शिल्पा



समदुरकर व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजकुमार रामटेके उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी प्रा. महाकाळे यांनी बौद्ध धम्माचा इतिहास आणि गौतम बुद्धांचे विचार विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडले. त्यांनी सांगितले की, युवकांनी बुद्धांचे तत्त्वज्ञान अंगीकारल्यास त्यांच्या जीवनात शांतता, संतुलन आणि समृद्धी येईल.डॉ. शिरभाते यांनी अध्यक्षीय भाषणात माणुसकीवर आधारित बौद्ध धर्म आजच्या समाजासाठी अधिक आवश्यक ठरत असल्याचे नमूद केले. डॉ. राजकुमार रामटेके यांनी गौतम बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांच्या कार्यातील संबंध स्पष्ट केले. डॉ. शिल्पा समदुरकर यांनीही बुद्धांच्या विचारांचा प्रेरणादायी अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगितला.प्रास्ताविक प्रा. मेघश्याम ढाकरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रकाश तळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. नितीन अखुज यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. स्वाती येवतकर, प्रा. राहुल गजभिये, प्रा. राजश्री कुंभारे, प्रा. राहुल पवार, प्रा. वैभव कळंबे यांसह स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

## दाम्पत्यास विटांनी केली मारहाण

**हिंगणघाट :** दाम्पत्यास विटाने मारहाण करत जखमी केले. ही घटना संत तुकडोजी वॉर्ड पिंपळगाव रस्त्यावर दीक्षित कॉन्व्हेंट जवळ घडली. अरविंद भगवान भालशंकर याच्या मुलाला महेंद्र पाहुणे हा शिवीगाळ करत होता. अरविंदला याची माहिती मिळताच तो घरी जात महेंद्रला तू का वाद करतो, असे म्हणत तुझे ट्रॅक्टर तेथून काढ, असे म्हणाला. ट्रॅक्टर नाही काढत, जे करायचे ते कर असे म्हणत अरविंदच्या मुलाला मारहाण केली. अरविंद व त्याची पत्नी वाद सोडवण्यास गेले असता त्यांनाही विटांनी मारून जखमी केले. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## 'दोंदुड्यात माजी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात

### माझी शाळा, माझी जबाबदारी या संकल्पनेला गावाचा प्रतिसाद

**वडनेर जनमाध्यम :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दोंदुडा यांच्या वतीने माजी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. प्रीती गणेश गुडधे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून वडनेर पोलीस स्टेशनचे ठाणेदार घनश्याम पाटील, विशेष अतिथी म्हणून संतोष तीमांडे गुरुजी, तुकाराम फुलझले गुरुजी, सौ. पुष्पा कोपुलवार मॅडम तसेच शाळेचे मुख्याध्यापक शरदजी ढगे व वरिष्ठ शिक्षिका सौ. वर्षा भोयर उपस्थित होते.कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील भौतिक सुविधांचा विकास करण्याचे आश्वासन देत शाळेला राज्यपातळीवर नावलौकिक मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला. गावातील युवकांनी शाळेला टॅबलेट, डिजिटल पॅनल, आरो प्युरिफायर, खेळ साहित्य व वृक्षदान करून हातभार लावला. माझी शाळा, माझी जबाबदारी या उपक्रमांतर्गत लोकसहभागातून शाळेचा विकास करण्याचे वचन सर्व ग्रामस्थांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी निलेश घिये यांनी केले, तर आभार प्रदर्शन किशोर चिडे यांनी मानले. शाळा व्यवस्थापन समिती, भौतिक सुरक्षा समिती आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हा सोहळा यशस्वीपणे पार पडला.

## कोरा गावात शेकडो तरुणांचा अजित पवार गटामध्ये प्रवेश

### अँड.सुधीरबाबू कोठारी यांच्या उपस्थितीत उत्साही कार्यक्रम

**समुद्रपूर जनमाध्यम :** समुद्रपूर तालुक्यातील कोरा गावात आयोजित भव्य कार्यक्रमात शेकडो तरुणांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) मध्ये आज जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमाला पक्षाचे जिल्हा ज्येष्ठ नेते अँड. सुधीर कोठारी यांच्या हस्ते पक्षप्रवेशाची औपचारिक सुरुवात झाली.कार्यक्रमास मंगेश गुढदे (तंटामुक्ती अध्यक्ष, कोरा), शंकर चौखे (माजी तंटामुक्ती अध्यक्ष), समाजसेवक प्रशांत शंभरकर, तसेच अमरभाऊ झाडे (संचालक, समुद्रपूर बाजार समिती) यांची प्रमुख उपस्थिती होती. मोठ्या उत्साहात पार पडलेल्या या सोहळ्यात



हिंगणघाटचे माजी आमदार राजु तिमांडे, बाजार समितीचे सभापती हिम्मत चतुर, डॉ. निर्मेश कोठारी, महादेव (पिंटू) बादले, सुरेशजी सायंकार, निषादभाऊ बोरकुटे, तेजसभाऊ तडस यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.अँड. सुधीर कोठारी म्हणाले की, हिंगणघाट आणि समुद्रपूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) अधिक मजबूत करण्यासाठी युवकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लक्षात घेऊन सर्वांनी संघटितपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मारोती भोयर, मंगेश मडावी, उमेश मडावी, गुरूदासजी भोयर, संदीप मेश्राम, हर्षल गवळी, जय कुळमते यांसह शेकडो तरुणांनी पक्षप्रवेश केला. या तरुणांनी आगामी काळात पक्ष संघटन बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## काकावर चाकूने हल्ला

**हिंगणघाट जनमाध्यम :** तालुक्यातील किनगाव गंगापूर येथे अपमान झाल्याची भावना मनात ठेवून पुतण्याने काकावर चाकूने हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, राकेश देवराव जीवने (वय ३७) यांचा त्यांच्या पुतण्यासोबत, विशाल सिद्धार्थ जीवने याच्यासोबत शेतातील फवारणीच्या औषधावरून वाद झाला होता. या वादातून विशाल याला अपमान झाल्याची भावना मनात ठेवल्याने त्याने काका राकेश जीवने यांना गावातील विहारा जवळ बोलावले. त्यानंतर भाजी चिरण्याच्या चाकूने धाक दाखवत काकाच्या पोटावर वार करून त्यांना जखमी केले. जखमी राकेश जीवने यांनी तात्काळ हिंगणघाट पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपी पुतण्या विशाल जीवने याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास बीट जमादार किशोर गाडीवान करीत आहेत.

## अंबिका हिंगमिरे यांच्या प्रतिमेवर वार: बॅनर तोडफोडीने कार्यकर्ते संतप्त



**बोरगाव मेघे (ता. वर्धा) :** अंबिका हिंगमिरे यांच्या नावाचे बॅनर फाडून अज्ञातांनी उघड चिथावणी दिल्याची संतापजनक घटना घडली आहे. राजकीय वैरातून ही कारवाई झाल्याची चर्चा जनतेत सुरू आहे. अंबिका हिंगमिरे यांनी आपल्या कार्याचा प्रचार करण्यासाठी गावात बॅनर लावले होते. मात्र, रात्रीच्या अंधारात काही असामाजिक घटकांनी ते जाणूनबुजून फाडले. या प्रकाराने त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप उसळला असून गावात तणावाचे वातावरण आहे.

ताईंच्या समर्थकांनी ही घटना दुश्मनीपोटी घडवून आणल्याचा आरोप करत वर्धा पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. या तोडफोडी मागील हात तातडीने उघड करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, पोलिसांनी तपास सुरू केल्याचे समजते.

### मातोश्री वृद्धाश्रमात दिवाळीचा सोहळा

## कृष्णगिरी परिवाराने वृद्ध आई-वडिलांसोबत उजळवली प्रेमाची वात

**वर्धा/जनमाध्यम**

दिवाळी म्हणजे आनंद, आपुलकी आणि आपसूक फुटणारे स्मित हे शब्दशः प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले मातोश्री वृद्धाश्रमात. प्रसिद्ध समाजसेवक व व्यावसायिक महेश गुल्हाणे यांच्या कृष्णगिरी परिवाराकडून वृद्ध आई-वडिलांसोबत साजरी करण्यात आलेली ही दिवाळी जणू स्नेहाचा दीपोत्सव ठरली. दिवाळीच्या पूर्वसंध्येला वृद्धाश्रमात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. वृद्ध रहिवाशांना नवीन कपडे देण्यात आले, गोडधोड पदार्थांचा सुगंध दरवळला, दिव्यांच्या तेजात प्रत्येक चेहरा उजळला. आजी-आजोबांच्या डोळ्यांत अभिमानाचे आणि ओलावलेल्या भावनेचे तेज होते, तर वातावरणात समाधानाचा सुगंध दरवळत होता. कृष्णगिरी परिवारामार्फत मागील २०–२१ वर्षांपासून हा उपक्रम अखंड सुरू आहे. यावर्षी या स्नेहोत्सवात महेश गुल्हाणे यांच्या पुढील पिढीनेही आनंदाने सहभाग घेत वृद्धांचा आशीर्वाद घेतला. हा कार्यक्रम केवळ साजरा नव्हता, तर कुटुंबीय ऐक्य, सेवाभाव आणि सामाजिक जबाबदारीचा जिवंत संदेश होता.

**वृद्ध आई-वडील हेच आपले दैवत : महेश गुल्हाणे**

यावेळी बोलताना महेश गुल्हाणे म्हणाले, आई-वडील हीच खरी देवरूपी मूर्ती आहेत. त्यांना वृद्धाश्रमात सोडण्याऐवजी त्यांच्या सेवेतच आपला आनंद शोधला पाहिजे. गेल्या दोन





दशकांत आश्रमातील रहिवाशांची संख्या १०० वरून फक्त १८ इतकी झाली आहे; एक दिवस ती शून्यावर यावी, हीच आमची इच्छा आहे. ते पुढे म्हणाले, या वर्षीची दिवाळी मात्र शेतकऱ्यांसाठी कठीण ठरली आहे. अतिवृष्टीमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. देव त्यांना लवकर या संकटातून बाहेर काढो, हीच आमची मनःपूर्वक प्रार्थना आहे. या प्रसंगी कृष्णगिरी परिवारातील अनिल गुल्हाणे, प्रमोद श्रीराव, राहुल शर्मा, योगेश गावंडे, संदीप चिचाटे, अनिल नरेडी, आशिष आकरे, किशोर सुरकार, दीपक मांडोकार, श्री गजानन वांढरे आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३२५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# सर्व धर्मीय भाऊबीज सोहळा वलगाव येथे थाटात संपन्न

## -५०० लाडक्या बहिणींची उपस्थिती



**अमरावती/प्रतिनिधीः-** जवळपास ५०० लाडक्या बहिणींच्या भरगच्च उपस्थितीत भाऊ-बहिणींच्या डोळ्यांच्या कडा पाणवणारा व सर्वधर्मीय धर्मगुरूंच्या साक्षीने सामाजिक सलोखा वाढवणारा सर्व धर्मीय भाऊबीज सोहळा वलगाव येथे थाटात संपन्न झाला.

दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ रोजी सिकची रिसॉर्ट, वलगाव ता.जी.अमरावती येथे भाऊबीजच्या पावन पर्वावर माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांच्या आयोजनाखाली व प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने भव्य-दिव्य, आपुलकी व स्नेहाचे आणि बहिण भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेला भाऊबीज सोहळा संपन्न झाला.

मंजूळ स्वरामध्ये परमेश्वराची आळवणी करून गावागावातील सामाजिक आरोग्य अबाधित ठेवणाऱ्या १७ गावातील महिला भजनी मंडळातील भगिनी, उमेद अंतर्गत काम करणाऱ्या सीआरपी (गटप्रवर्तिका) भगिनी तसेच बुद्ध वंदना म्हणणाऱ्या विधवा महिला भगिनी यांनी सर्व धर्मगुरूंच्या आशीर्वादाने प्रकाश साबळे व उपस्थित सर्व भाऊरायांचे औक्षवन करून भाऊबीज साजरी केली.

वारकरी संप्रदायातील हभप रघुनाथराव ठाकरे, भाऊरावजी राऊत, मनोहरराव चोपडे, गिरीधर मेश्राम, अजाबराव अवजारे ह्या जुन्या जाणत्या वारकऱ्यांचा सन्मान ज्योतिषाचार्य आचार्य हरिभक्त परायण एडवोकेट सागर महाराज देशमुख यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

सदर सोहळ्याचे मुख्य अतिथी ज्योतिषाचार्य आचार्य ह.भ. प. अँड.सागर महाराज देशमुख , कार्यक्रमाच्या अध्यक्षा ग्रामगीताचार्य पौर्णिमाताई सवाई , प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध जागतिक रसायन शास्त्रज्ञ ऑस्ट्रेलिया निवासी पवित्राताई गडलिंगे, प्रेमकिशोर सिकची, प्रभाकाकी सिकची,थायलंड येथील भंते सिवली अभ्यासारो , मौलवी साहब, शीख धर्मगुरू अमरज्योतसिंग, फादर जोस, डॉ. दिलीप काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे, सचिन मालकर, माजी सरपंच



चंदन दिवाण, माजी सरपंच सुनंदा सोनोणे, माजी सरपंच सूर्यकांता बावणे, माजी सरपंच मीना कडू, आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.प्रमुख मान्यवरांचे स्वागत निलेश उभाड, अनुला खान, राहुल तायडे, प्रा.सुनील सावळे, नितीन पवित्रकार, गणेशराव कडू, सागर महल्ले, विवेक पाथरे, सचिन महले, ज्ञानेश्वर काळे, अमर इंगळे, मिलिंद वंजारी, अक्षय सरोदे, किरण महल्ले,सागर ठाकरे, प्रशांतभाऊ विघे,सुधीर पडोळे, आकाश गडपाल, अजहर अहमद, आशिष खोडे, तुषार भोकरे, जयंत दाभाडे आदी कार्यकर्त्यांनी केले.

विविध धर्माच्या महिला भगिनींनी विविध धर्मातील भावांना सर्व धर्मीय धर्मगुरूंच्या साक्षीने ओवाळणी व औक्षवान करून भाऊबीज साजरी केली. महिला व राष्ट्र सुरक्षेचे अभिवचन घेतले. सर्व भाऊरायांनी सर्व भगिनींना माहेरची साडी प्रदान केली.

जगात श्रेष्ठ आई, आई म्हणजे स्त्री, तिची सुरक्षा व आदरातिथ्य , हाच मानव जातीला भाऊबीज संदेश आहे, असे एडवोकेट ह भ प सागर महाराज देशमुख यांचे आशीर्वादवचन होते.

गाव खेड्यातील अडचणीत असलेल्या माय माऊली बहिणींना रोजगारक्षम व कर्तव्यतत्पर बनवण्यासाठी कटिबद्ध आहोत असे प्रकाश साबळे यावेळी मनोगतात म्हणाले.

जातीय तेढीच्या परिस्थितीमध्ये जातीय सलोखा निर्माण करणारी अनोखी सर्वधर्मीय भाऊबीज हे राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय एकतेचा प्रतिक असे भंते सिवली अभ्यासारो, थायलंड यांनी सांगितले.

# राज्य सीनियर अजिंक्यपद स्पर्धेसाठी सज्ज नागपूर येथे सीएम चषक पुरुष-महिला अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा २६ पासून

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशन तर्फे आयोजित सीएम चषक ७५ वा महाराष्ट्र राज्य सीनियर पुरुष व महिला अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा २०२५ नागपूर येथे २६ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आयोजित होत आहे. या स्पर्धेमध्ये अमरावती जिल्हा बास्केटबॉल मुले व मुलींचा संघ सहभागी होणार असून संघ विजेते पदाकरिता सज्ज झाला आहे. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य व सचिव तसेच अमरावती जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.



यापूर्वी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे दि. १८ ते १९ ऑक्टो.२०२५ दरम्यान सकाळी ८ वा. अमरावती जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनतर्फे जिल्हास्तरीय निवड चाचणी घेण्यात आली होती. मंडळाच्या सचिव व अमरावती जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली हि निवड प्रक्रिया यशस्वी राबविण्यात आली होती. याकरिता जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव प्रा डॉ. मधुकर बुरनासे व निवड समिती अध्यक्ष विजया खोत - सदस्य डॉ धनंजय विटाळकर - सदस्य, डॉ वशिष्ठ खोडसकर, राहुल ढोबळे आकांक्षा माहोरे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले होते.

मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष व महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटनेचे उपाध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर यांचेसह सर्व पदाधिकारी, प्रशिक्षक यांनी मुले-मुलीच्या संघाला शुभेच्छा दिल्या आहेत.

पुरुष संघ - दिनेश कठारे, शांतनु भालेराव, पियुष पीडेकर, इशांत भट्टड, प्रज्वल लकडे, अमित सिंग ठाकूर, धीरज चौहान, तुषार दामले, प्रज्वल पीडेकर, सुमित चौहान, जीवन बनकर तन्मय शिरभाते. - मुख्य प्रशिक्षक डॉ. धनंजय विठाळकर, सहायक प्रशिक्षक श्रीकांत तिडके, संघ व्यवस्थापक नितीन पोटे, यांचा समावेश आहे.

महिला संघ - यामिनी अर्डक, स्वप्नीका गवई, वृषाली मोहिते, अनन्या कोठारे, रूपमीत, खुशी उपारे, मोनिका मुजुमदार, स्वरा धवडे, आराध्या सरोदे, प्रीस्का ग्रेस मार्बोनिग, सान्वी राठी, मृणाल पाटील, कल्याणी वाघमारे, मुख्य प्रशिक्षक आकांशा माहुरे, प्रशिक्षक गायत्री खरे, संघ व्यवस्थापक डॉ. मधुकर बुरनासे

# आरोग्य भारती अमरावती तर्फे धन्वंतरी जयंती उत्साहात साजरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** आरोग्य भारती अमरावती शाखेतर्फे धनत्रयोदशीचे औचित्य साधून दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ रोजी धन्वंतरी पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून अमरावती येथील प्रसिद्ध कॅन्सर तज्ञ डॉ. राजेंद्र सिंग अरोरा हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ. आशिष डगवार यांनी भूषवले. याप्रसंगी आरोग्य भारती विदर्भ प्रांताचे सहसचिव डॉ. विवेक धोंगडी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अमरावती चे सहकार्यवाह दत्तात्रय रत्नपारखी, आरोग्य भारती अमरावतीचे उपाध्यक्ष डॉ.राजेंद्र नवाथे उपस्थित होते. आरोग्य भारतीय अमरावती शाखेतर्फे रुग्णसेवेत केलेल्या कार्यासाठी अमरावती येथील प्रसिद्ध होमिओपॅथ डॉक्टर संपदा पाटील , ज्येष्ठ परिचारिका पूजा काकडे आणि पुनम धांडे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.या मंगल समयी मार्गदर्शन करताना डॉ. अरोरा यांनी समाजामध्ये कॅन्सर बद्दलची असलेली उदासीनता, महिलांमध्ये वाढत असलेले कॅन्सरचे



प्रमाण आणि बदललेली जीवनशैली याची योग्य सांगड घालत उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. प्रसंगी आरोग्य भारतीचा परिचय डॉ. आशिष डगवार यांनी करून दिला. याप्रसंगी बोलताना डॉ.विवेक धोंगडी यांनी राष्ट्रीय स्तरावर आरोग्य भारतीचे कार्य आणि आरोग्य भारतीची भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सूत्रसंचालन डॉ. अश्विनी सहस्त्रबुद्धे यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शन अंजली मंगेश कोल्हटकर व सुंदर कवितावाचन कीर्ति पातूर्डे यांनी केले. कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी डॉ कौशिक जोशी व राजेश कोल्हे यांचा मोलाचा वाटा लाभला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मिलिंद पाठक आणि त्यांच्या यमुने विशेष प्रयत्न केले.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२०४४/२०२५
**शेख जफर-वि- निरंक**
पुढील ता.१७.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
१. **शेख जफर शेख अमजद,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.काझीपुरा, नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती
२. **शेख कमर शेख अमजद,** वय ४९ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.पठाण चौक, अमरावती
३. **शेख मजहर शेख अमजद,** वय ४८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.काझीपुरा, नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती
४. **शेख अजहर शेख अमजद,** वय ४० वर्षे, व्यवसाय - मजूरी
रा.काझीपुरा, नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती
५. **अलिमुन बी अब्दुल मुतलिब,** वय ५८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.पुर्णा नगर,ता.भातकुली, जि.अमरावती
६. **राजेका बी रहमत खान,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.कामठी रोड, आमना टाउन भिलगाव, उप्पलवाडी, नागपूर
७. **तहझीबुन निसा अब्दुल शेख,** वय ४७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.अपनी बेकरी समोर अबुबकर कॉलनी, अमरावती
८. **शबाना बी हरुन खान,** वय ४६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.रेहान पार्क मोर्शी, ता.मोर्शी
९. **सयद इम्रान सयद असगर,** वय ३३ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.गुलिस्ता नगर नं.२, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शेख अमजद शेख हुसेन आणि रियासत बी शेख अजमत हे अनुक्रमे दि.२२.११.२०१९ व २३.०२.२०१६** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार शेख जफर शेख अमजद व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शेख जफर शेख अमजद व इतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२५.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर**
**वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा**

**आर.एम.जे.सी.क्र.२७४/२०२५** **ने.ता.२५.११.२०२५**

**अर्जदार ः**
१. **महेश सुनील देशमुख,(मुलगा),** वय २४ वर्ष, व्यवसाय- नोकरी
रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
२. **प्रेमा सुनील देशमुख (पत्नी),** वय ५१ वर्ष, व्यवसाय- गृहिणी
रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
३. **कोकिळा नीलकंठ देशमुख, (आई),** वय ८२ वर्ष, व्यवसाय- गृहिणी
रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः-** **निरंक**

ज्याअर्थी मयत **सुनील निळकंठराव देशमुख,रा.नांदसावंगी,ता.नांदगाव खंडे., जि.अमरावती हे दि.०७/०७/२०१८ रोजी नांदसावंगी येथे मरण पावले.** त्यांचा कायमचा पत्ता रा.नांदसावंगी,ता.नांदगाव खंडे., जि.अमरावती येथील आहे. त्यांना अर्जदार यांच्या व्यक्तीरिक्त कोणीही वारस नाही.अर्जदार हे उपरोक्त मयतांचे कायदेशीर वारस आहेत. उपरोक्त मयतांचे कायदेशिर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत दिनांक **२५.०९.२०२५** रोजी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक **२५.११.२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर,नांदगाव खंडे. येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

# मराठा विवाह मंडळाला सहकार्य करा-एकनाथराव भडांगे

## -युवक-युवती व पालक परिचय मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** आजच्या काळात विवाह जुळविणे ही फार मोठी समस्या असून गेल्या ३५ वर्षापासून मराठा विवाह मंडळ विवाह जुळविण्याचे कार्य केवळ समाजसेवा म्हणून सातत्याने करीत असून सर्व समाजाने मंडळाच्या पाठीशी तन-मन-धनाने उभे राहावे, असे आवाहन मंडळाचे उपाध्यक्ष एकनाथराव भडांगे यांनी केले. मराठा विवाह मंडळ व वाचनालयाच्या वतीने नारायण नगर बगीचा, रूक्मिणी नगर येथील मंडळाचे कार्यालयात आयोजित 'दिवाळी विशेष उपवर युवक- युवती व पालक' परिचय मेळाव्यात ते बोलत होते. मंडळाच्या उपाध्यक्ष नयना




गावंडे, सरकार्यवाह दिगंबर शहापुरे विचारपीठावर उपस्थित होते.मंडळाचे सहकार्यवाह डॉ.कुमार बोबडे, महिला मंडळाच्या अध्यक्ष स्मिता गोळे यांनी मार्गदर्शन केले.

मंडळाचे कार्यकारिणी सदस्य प्रा.सुनील बुरघाटे यांनी आपल्या स्वागतपर व प्रास्ताविकातून मंडळाच्या कार्याची माहिती देऊन उपस्थितांचे स्वागत केले. जयश्री डहाके, स्मिता गोळे, सारिका सवाई यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे व मेळाव्याचे संचालन मंडळाचे सहकार्यवाह अर्चना सवाई यांनी केले.संजय कोहळे यांनी सर्वांचे आभार मानले.मंडळाला स्वमर्जीने उत्कृष्ट सेवा देणाऱ्या मंडळाचे कोषाध्यक्ष अशोकराव धाबे, सारिका सवाई, चेतन घटाळे यांचा मंडळाचे वतीने सत्कार करण्यात आला.

मेळाव्याच्या यशस्वितेसाठी मंडळाचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ.गणेश पाटील यांच्या मार्गदर्शनात उपाध्यक्ष डॉ.बी.आर.देशमुख, एकनाथराव भडांगे, प्रा.दिनकर राऊत, कोषाध्यक्ष अशोकराव धाबे, सरकार्यवाह दिगंबर शहापुरे, सहकार्यवाह अर्चना सवाई, कार्यकारिणी सदस्य सुरेशराव गौरखेडे, सुभाषराव अर्डक देशमुख, जयश्री डहाके, स्मिता गोळे, सरला सोलीव, शालिनी शहापुरे, वनमाला पाटील, चेतन घटाळे आदींनी परिश्रम घेतले.

# डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात संस्थेचे दिवंगत माजी अध्यक्ष रामचंद्र घारफळकर यांना आदरांजली

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथे संस्थेचे दिवंगत माजी अध्यक्ष रामचंद्रजी जागोबाजी घारफळकर यांचा जयंती कार्यक्रम अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांचे अध्यक्षतेखाली तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. वसंत लुंगे, डॉ. प्रमोद भिसे, डॉ. प्रकाश कुटे, डॉ. स्वप्निल



मोहोड तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत गुरूवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाचे सुरूवातीला दिवंगत रामचंद्रजी घारफळकर यांच्या प्रतिमेचे पुजन, हारार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले व उपस्थितांनी अभिवादन करून आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता किशोर इंगळे, राहूल लकडे, प्रफुल्ल इंगळे, वैष्णवी धर्माळे, वृषाली देशमुख, रवि मानकर, यश तिवारी यांनी सहकार्य केले.

# चिंचोली खुर्द गावात आजही जपली जाते लक्ष्मी पूजनानंतरची पान-सुपारीची परंपरा

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** दिव्यांचा उत्सव असलेल्या दिवाळीत धार्मिक विधी आणि मिठाईच्या फराळासोबतच दिवाळीच्या संध्येला लक्ष्मीपूजनानंतर सर्वांची जेवण आटोपल्यानंतर पान-सुपारी (तांबूल) या परंपरेला आजही चिंचोली गावात महत्त्वाचे स्थान आहे. विराज प्रोव्हिजन विठ्ठल काकड यांच्या दुकानासमोर रात्रीच्या वेळी काही नागरिक एकत्र जमून ही परंपरा मोठ्या आपुलकीने



जपतांना दिसतात.

हिंदू धर्मशास्त्रानुसार, पान-सुपारीला मांगल्य आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. प्रत्येक शुभकार्यात, सत्यनारायणाच्या पूजेत आणि विशेषतः लक्ष्मीपूजनानंतर देवाला नैवेद्य म्हणून पान-सुपारी अर्पण करण्याची जुनी प्रथा आहे. एकत्र पान खाण्यातून सुख-समृद्धी, प्रेमभाव आणि सलोखा वाढतो, अशी धारणा आहे. दिवाळीच्या लगबगीनंतर रात्रीच्या वेळी चिंचोली चे 'ग्रामस्थ' व नागरिक एका चटईवर,सतरंजीवर एकत्र येतात आणि खास पान-सुपारीचा विडा तयार करून सेवन करतात. या बैठकीत केवळ विडा खाणे एवढाच उद्देश नसतो,तर दिवाळीच्या निमित्ताने एकत्र येऊन वर्षभराच्या सुख-दुःखाच्या गोष्टी, शेती-पाण्याची चर्चा आणि शुभेच्छांची देवाणघेवाण करतात.

# बालकाना करुणा, प्रज्ञा, शिलाचे संस्कार देणे काळाची गरजः डॉ.कमलताई गवई

## -पंचशील नगर येथे भारतीय बौद्ध महासभेची ३५८ बुद्ध वंदना उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** बुद्ध धम्म हा मानवी मनाला शांतता देणारे विज्ञान आहे. धम्म आचरणात आणणे आवश्यक आहे. माणसाने माणसाशी कसे वागावे हेच धम्म सांगतो. बाल गुन्हेगारी ही सामाजिक समस्या असली तरी तिचे समाधानही सामाजिकच आहे. प्रत्येक बालकाला करुणा शिकवली, प्रज्ञा दिली, शिलाचे संस्कार दिले तर भविष्यात एक असा समाज निर्माण होईल जिथे गुन्हा नव्हे तर करुणा राज्य करेल. मनाचे शुद्धीकरण हेच धम्मकार्य आहे. कायदा हा गुन्हा थांबवतो मात्र करुणा मन बदलविते असे प्रतिपादन माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई यांनी केले.

भारतीय बौद्ध महासभा शाखा बडनेरा अमरावतीच्या वतीने रविवारची ३५८ बुद्ध वंदना पंचशील नगर येथील महाबोधी बुद्ध विहार येथे मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई, जिल्हाध्यक्ष प्रकाश बोरकर महिला आघाडी जिल्हाध्यक्ष माया धांडे, बडनेरा शहराध्यक्ष के डी सांभारे, नांदगाव खंडेश्वर तालुकाध्यक्ष मदन खंडारे, महिला आघाडी कोषाध्यक्ष मालती मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते दत्तराज गजभिये, नरेंद्र बोरकर, व्ही. एम. वानखडे, आर. के. भटकर धम्मपिठावर विराजमान होते.

भारतीय बौद्ध महासभेचा रविवारची बुद्ध वंदना गत नऊ वर्षापासून सुरू असलेला हा उपक्रम स्तुत्य समाजाला दिशा देणारा असल्याचे कमलताई गवई म्हणाल्या.

यावेळी शांताराम गेडाम यांनी कालाम सूक्त (मानव मुक्तीचा जाहीरनामा) या विषयावर धम्मदेशना दिली. तर उपस्थित मान्यवरांनी पंचशील नगर येथील बाल गुन्हेगारीच्या समस्येवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव नयन मोंढे यांनी केले. संचालन समता सैनिक दलाचे सुरेश दहाटे यांनी तर आभार महिला मंडळाचे अध्यक्ष संजीवनी मनोहरे यांनी मानले.

रविवारच्या विशेष बुद्ध वंदनेला यशस्वी करण्याकरिता राहुल शेंडे, विलास नागदिवे, किशोर खोब्रागडे, पंजाब गेडाम, अशोक गुडघे,मदन खंडारे, लता माटे, विजया बोरकर, वंदना फुललेले, दुर्गा वाहने, रेखा मनोहरे,भागीरथा ढोके, बि डी सांबारे, सुनिता रामटेके, आशा सोमकुवर, पार्वती गजभिये, ममता ढोले, बेबी वानखडे,प्रमिला वानखडे, कमल मेश्राम, पल्लवी मेश्राम, रणधीर कापशीकर, संतोष डोंगरे, अशोक बनसोड, अशोक तायडे, यश वानखडे, मुकुंद मेश्राम,रवींद्र गेडाम,गोवर्धन रामटेके, सुरेश दहाटे, जीवक मनोहरे, नरेंद्र बोरकर,शांताराम गेडाम, राजेंद्र भटकर, आनंद मोंढे यांनी सहकार्य केले.





धम्माचे संस्कार रुजविण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा एक रविवार एक विहार सातत्याने नऊ वर्षापासून वंदनेचा कार्यक्रम राबवीत आहे. समाजाचा बालक हा उद्याचा भविष्य आहे. तथागत बुद्धाने अंगुलीमाल डाकूला पुन्हा अहिंसक बनविले. बुद्ध विहार हे संस्कार घडविण्याचे शाळा आहेत म्हणूनच आपल्या मुलांना दर रविवारी विहारात आणल्यास त्यांच्यावर धम्माचे संस्कार होतील समाजाचे ऐक्य हीच आपली शक्ती असल्याचे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर यांनी केले.

अमरावती शहरातील केवळ पंचशील नगरच नव्हे तर विविध मागास वस्त्यांमध्ये बाल गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असेल ती कायमस्वरूपी थांबविण्यासाठी केवळ त्यावर बौद्ध धम्माने सांगितलेल्या मार्गावर चालल्यास कायमची संपू शकते.

त्याकरिता पालकांनी व समाजानेही आपले कर्तव्य समजून बालकांना धम्माच्या मार्गावर चालण्यास प्रोत्साहित करावे असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे पर्यटन व प्रचार सचिव नयन मोंढे यांनी केले.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ४८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अचलपुरातील सराफा दुकानात चोरी; परतवाडा, अकोट येथूनही सोने चोरल्याचे निष्पन्न

## त्या महिलेचा शोध लावण्याचे पोलिसांसमोर आव्हान

**अचलपूर /वार्ताहर**
दिवाळीमध्ये सराफा दुकानात ग्राहकांची वाढत्या गर्दीचा फायदा घेत अचलपूर शहरातील देवडी येथील सराफा बाजारातील एका दुकानातून अज्ञात बुरखाधारी महिलेने दागिने बघण्याचा बहाणा करून अडीच ग्रॅम सोन्याचे पदक चोरून नेल्याची घटना समोर आलेली आहे. ही घटना १९ ऑक्टोबर रोजी दुपारच्या दरम्यान घडली. संपूर्ण घटना दुकानाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली. अचलपूर पोलिस तिचा शोध घेत आहेत.देवडी येथील सुवर्णकार सुपार्श डागा याच्या प्रतिष्ठानामध्ये रविवारी दुपारी १२ च्या सुमारास एक बुरखाधारी महिला आली. सोन्याचे पदक दाखवा, असे तिने सांगितले. दुकानातील



कारागिराने तिला ते दाखविले. पदक पसंत नसल्याचे सांगून ती लवकर निघून गेली. तिच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने कारागिराने दाखविलेली पदके पुन्हा पडताळून पाहिली असता, त्यामध्ये अडीच ग्राम सोन्याचे पदक कमी आढळले. त्याने इतरांना सोबतीला घेऊन तत्काळ त्या महिलेचा पाठलाग केला. त्यांनी तिचा बराच शोध घेतला. मात्र, ती महिला आढळून आली नाही. याबाबतची तक्रार सुपार्श डागा यांनी अचलपूर पोलिसात नोंदविली. पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली तेव्हा ३० ते ४० वर्षे वयाची ती महिला आढळून आली आहे.

**तीन ठिकाणाहून चोरले सोने**
त्या महिलेने अचलपूर, परतवाडा आणि अकोट येथे एका दिवशी चोरी केल्याचे अचलपूर पोलिसांनी केलेल्या तपासात निदर्शनात आले आहे. विशेष म्हणजे, पोलिस विभागाकडून दिवाळी अगोदरच सर्व सराफा दुकानात जाऊन विविध उपाययोजना करण्याचे सांगितले होते.

**स्पेशल ऑटोने ये-जा**
बुरखाधारी महिला परतवाडा येथील नेहरू मार्केट समोरून स्पेशल ऑटोरिक्षाने अचलपुरात दाखल झाली होती. कुटुंबीय आजारी आहेत. मला लवकर अचलपुरात ने, असे तिने सांगितले.
देवडी येथील सराफा बाजारामध्ये ऑटोरिक्षा थांबविला. माझ्याजवळचे पैसे संपले, मी पैसे आणून देते, तू दहा मिनिटे थांब, असे तिने ऑटोचालकाला बजावले. दहा मिनिटांनी ती परतली आणि एका गल्लीपर्यंत तो ऑटो नेऊन शंभर रुपये देऊन निघून गेली. सराफा कर्मचारी मागोमाग आले तेव्हा ऑटोचा लकालाही आश्चर्याचा धक्का बसला.

# गोरक्षणात भजन संध्येने गाय गोंदनाची पूजा

**दर्यापूर/ वार्ताहर**
गाडगेबाबा गोरक्षण संस्थेसोबत जुडलेल्या गोप्रेमींच्या लक्षणीय आर्थिक सहभागाने माहुली ( धांडे ) परिसरातील गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावरील गाय वासरांची गाय गोदन अन्नदान सेवा उजळून निघाली. सायंकाळी बालक दास भजन मंडळ, नरदोडा संचाच्या भजनरूपी सूर प्रकाशाने या सेवेत अध्यात्माचा रंग भरला या वेळी संपूर्ण परीसर भक्ती भावात न्हाऊन निघाला .वसूबारस ते तुळशी पूजन या दहादिवसीय संपन्न होत असलेल्या एकूण एकशे साठ गाय -वासरांना रोज अन्नदानाच्या सेवा उपक्रमात



अमरावती विभागातील दिनेश मोहता, अतुल धर्माळे, अनंत राऊत, रोशन अग्रवाल, उद्धवराव नळकांडे, देवेन शहा, सौ मेघा नितीन विधळे, शिल्पा नितीन पाटील, प्रा.डॉ पंकज अर्डक, माधुरी पोटे, प्रा जयंत इंगोले,सुरेशसिंग मोरे, निलेश झाडे, प्रा डॉ राऊत, जगदीश भांगे, प्रा.डॉ . येलकर, सौ स्नेहल पातुरडे, प्रमोद भांडे, लिलाधर धोटे यांचे देणगी रूपाने आर्थिक सहाय्य लाभले .

# शिक्षकांचे 'टीईटी' प्रकरण आता मुख्य खंडपीठाकडे

**अमरावती/ का.प्र.**
पूर्ण देशात पहिल्या ते आठव्या वर्गात शिकवणार्या विद्यार्थ्यांना शिकवणार्या सरकारी शाळांच्या शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टीईटी अनिवार्य करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणार्या याचिकांवर आता सर्वोच्च न्यायालयाचे मोठे पीठ सुनावणी करणार आहे. हे प्रकरण मुख्य न्यायाधीशांकडे पाठविण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयात सुनावणी करणार्या न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या पीठाने सांगितले की, या याचिकेत अनेक कायदेशीर प्रश्न आणि पैलू आहेत. त्यामुळे हे पीठ या

tet

प्रकरणाला अशा इतर समान प्रकरणांसोबत सुनावणीसाठी मुख्य न्यायाधीशांकडे अग्रेसित करीत आहे, जेणे करून वरिष्ठ पीठाची स्थापना करून या प्रकरणाशी संबंधित सर्व पैलूंवर विस्तृत सुनावणी केल्यानंतर त्या कायदेशीर प्रश्नांचे उत्तर दिले जाऊ शकेल.
या आधी उत्तर प्रदेश आणि काही राज्यांमध्ये टीईटीच्या अनिवार्यतेला आव्हान देणार्या याचिकांवर सुनावणी झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने अशा परीक्षा संपूर्ण देशात घेण्याचा आदेश दिला होता. १ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पीठाने या प्रकरणात आपला निर्णय सुनावला होता. या निर्देशानुसार इयत्ता १ ते ८ पर्यंतच्या वर्गांमध्ये अध्यापन करणार्या जिल्हा परिषद, खासगी प्राथमिक तसेच अनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य ठरविण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार आता फक्त टीईटी पात्र शिक्षकांनाच मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी या पदांवर पदोन्नती मिळू शकणार आहे. ज्या शिक्षकांकडे पदोन्नतीसाठी आवश्यक सेवा ज्येष्ठता आहे पण टीईटी पात्रता नाही, त्यांना पदोन्नती मिळणार नाही. केंद्रप्रमुखांच्या ५० टक्के पदांची भरती सरळसेवा आणि उर्वरित ५० टक्के पदे पदोन्नतीच्या माध्यमातून केली जातात.
विस्ताराधिकार्याच्या नियुक्तीसाठीही हाच नियम लागू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या १ सप्टेंबरच्या आदेशानंतर सध्या मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तारा धिकार्याच्या पदोन्नतीची प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. दरम्यान, यावर फेरविचार याचिका दाखल करण्यात आली. त्यात सुनावणी दरम्यान दोन न्यायाधीशांनी ही याचिका मुख्य खंडपीठाकडे वर्ग केली आहे.

# माहेरवासी संघाचे ५८ वे स्नेहसंमेलन संपन्न

**गुरुकुंज मोझरी** - ज्ञानार्जन तथा धनार्जन संशोधन अथवा संरक्षण या कार्यासाठी ज्यांना जन्मगांव सोडून कर्तव्यावर जावे लागते अशांना एकत्रित करून जगा वेगळे जगा हा संदेश देणाऱ्या सन् १९६४ मध्ये स्व.ना.सि.पाटील यांनी स्थापन केलेल्या मोझरी येथील माहेरवासी संघाचे ५८ वे स्नेहसंमेलन बलिप्रतिपदेला हनुमान मंदिराच्या आवारात पार पडले. स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष अनिल उमप तर प्रमुख अतिथी असिस्टंट कमांडर डॉ. चेतन शेलोटकर, नायब तहसिलदार नरेंद्र कुरळकर तसेच अमोल गोंडचर, कु.किर्ती राऊत, रमेश थोरात, गजानन काकडे यांची उपस्थिती होती. यावेळी पोलीस उपायुक्त अमरावती



अनिल कुरळकर यांना पदोन्नती मिळाल्याबद्दल डॉ. रिटा योगेश साबळे, डॉ. स्नेहल गजानन पाचघरे यांनी अमरावती विद्यापीठातून पिएचडी प्राप्त केल्याबद्दल, सागर गिरीधर भडके (लिपिक तहसिल कार्यालय चांदुर-ाजार), अमन हिम्मतराव उमप (स्टेट बँक ऑफ इंडिया धाराशिव), कुणाल गणेशराव उमप (टी.सी.एच.कंपनी मुंबई) येथे नियुक्ती मिळाल्याबद्दल तसेच शैलेज दीलीपराव भुरे, मनिषा राजू गायकवाड, साधना सुधाकर मानापुरे, अक्षय दुर्गादास लांजेवार, आकाश बबनराव ठाकरे यांची विद्युत वितरण कंपनी विद्युत सहाय्यक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल व प्रेम सुरज गिरी श्रीगुरुदेव आयुर्वेद कॉलेज येथे नियुक्ती मिळाल्याबद्दल या सर्वांचा प्रमुख पाहुण्यांचे हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. चेतन शेलोटकर, उपायुक्त अनिल कुळकर व अनिल उमप यांनी मार्गदर्शन केले. सेवानिवृत्त विस्तार अधिकारी रमेश केनेकर यांनी माहेरवासी संघाचा आतापर्यंतचा इतिहास प्रास्ताविकातून अधोरेखित केला. साहित्यिक अमोल गोंडचवर व कु. किर्ती राऊत यांनी विविध कविता यावेळी सादर केल्या. रंगकर्मी रमेश थोरात यांनी नटसम्राट या नाटकाचा एकपात्री प्रयोग सादर केला. संचालन मनोज बकाले यांनी केले तर आभार प्रदर्शन निलेश वडस्कर यांनी केले. याच कार्यक्रमात पुढील वर्षीच्या कार्यकारिणी ची निवड करण्यात आली. अध्यक्ष माधुरी निमकर, उपाध्यक्ष डॉ. दीपाली ठोसर, सचिव स्नेहल पाचघरे, सहसचिव किरण कडू, व्यवस्थापन गणेश उमप, सहव्यवस्थापक निलेश वडस्कर. संमेलनाच्या यशस्वातेसाठी शरद कांडलकर, हिम्मत उमप, सुनील ढवळे, चिंटू उमप, निखिल पाचघरे यांनी सहकार्य केले.

'सुपर'मधील एमआरआय सुरू करण्याकरिता

# आरोग्य उपसंचालकांच्या परवानगीची प्रतीक्षा

**अमरावती-** विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथील एमआरआय विभागा चे काम पूर्ण झाले असून, मशीनही इन्स्टॉल करण्यात आली आहे. त्यामुळे आता हा विभाग कार्यान्वित करण्यासाठी आरोग्य उप संचालकांना पत्र पाठ विण्यात आला आहे. त्यामुळे उपसंचालकांची परवा नगी मिळताच रुग्णांच्या सेवेत हे एमआरआय विभाग कार्यान्वित होणार आहे येथे रुग्णांना मोफत एमआरआय सुविधा मिळणार आहे. जिल्ह्यात आतापर्यंत एकाही शासकीय रुग्णाल यात एमआरआय सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक गंभीर एमआयआर मशिन साठी राज्यस्तरावर कृष्णा डाइग्नोस्टिक या कंपनीसोबत शासनाने करार केला आहे. रुग्णांना एमआर आयसाठी खासगी रुग्णा यात जावे लागत आहे. अशातच जिल्हा सामान्य रुग्णालय येथे वर्षभरापूर्वी पीपीपी तत्त्वावर एमआरआय मशीन मंजूर झाली.

# २५ तासात बनवले १५ हजार ७७३ दोसे

**अमरावती/ का.प्र.**
विख्यात शेफ विष्णू मनोहर यांनी अमरावती शहरात सलग २५ तासात एकूण १५ हजार ७७३ दोसे बनवण्याचा नवा विक्रम नोंदवला आहे. विशेष म्हणजे, अमरावतीतनंतर आता ते थेट अमेरिकेत २६ तास दोसे बनवण्याच्या नव्या विक्रमासाठी सज्ज झालेत. यापूर्वी गत वर्षी विष्णू मनोहर यांनी नागपुरात २४ तासात १४ हजार ४०० दोसे बनवण्याचा विक्रम नोंदवला होता. आजच्या या नव्या विक्रमाची राज्यभरात चर्चा आहे.
अमरावती शहरात गुणवंत लॉन येथे शनिवारी



सकाळी ७ वाजल्यापासून विष्णू मनोहर यांनी सलग २५ तास दोसे बनवण्याच्या विक्रमला सुरुवात केली. रविवारी सकाळी ६ वाजता त्यांनी १५ हजार ७०० दोसे बनवून आपला जुना विक्रम मोडीत काढला. पंचांनी मधात २० मिनिटे ब्रेक दिल्यावर विष्णू मनोहर यांनी गरम तव्यावर पुन्हा चवदार डोसे तयार करून अनेक अमरावतीकरांची सकाळ चवदार केली. ८ वाजता अखेरचा म्हणजे १५ हजार ७७३ वा दोसा विष्णू मनोहर यांनी तयार केला आणि त्यांच्या नव्या विक्रमाचा जल्लोष त्यांचे सहकारी आणि उपस्थित अमरावतीकरांनी टाळ्यांच्या कडकडाटाने केला. याप्रसंगी 'इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड'चे प्रतिनिधी असणारे पंच प्रवीण राऊत यांनी पदक आणि प्रशस्तीपत्र विष्णू मनोहर यांना बहाल करत त्यांच्या नव्या विक्रमाची घोषणा केली.

# आरटीओची लाजीरवाणी कारवाई एका ट्रॅव्हल्सवर केवळ पाचशे रूपये दंड

**अमरावती / का.प्र.**
दिवाळी उत्सव 'कॅश' करण्यासाठी ट्रॅव्हल्स, खासगी वाहतूकदारांनी अव्वाच्या सव्वा प्रवास भाडे आकारून प्रवाशांची अक्षरशः लूट चालविली आहे. पुणे, नाशिक, संभाजीनगर आणि नागपूर या मार्गावर ट्रॅव्हल्स संचालकांनी दुप्पट, तिप्पट तिकिटांचे दर आकारून प्रवाशांना वेठीस धरले. असे असताना येथील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी दिवाळीपूर्वी चार ट्रॅव्हल्सवर कारवाईचा देखावा केला असून प्रति बसवर केवळ





पाचशे रूपये दंड आकारला आहे. त्यामुळे या थातूर मातूर कारवाईमुळे आरटीओच्या कार्यप्रणा लीवर शंका बळावली आहे.
१० ऑक्टोबर रोजी आरटीओने अमरावती ते मोर्शी, वरुड ते पांढुर्णा, मुलताई रस्त्यावर चालणाऱ्या स्टेज कॅरेज प्रवासी बसेसवर तसेच परतवाडा ते अंजनगाव, आकोट मार्गे अकोला, परतवाडा ते धारणी मार्गावर धावणाऱ्या बसेसवर कारवाई केली होती. काही प्रकरण अंगलट येण्याचे संकेत मिळाले की आरटीओचे फिरते पथक कारवाईचा देखावा करतात क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी आढळून येत असताना ट्रॅव्हल्सवर नाममात्र दंड आकारून 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' असा कारभार चालवितात.

# बनावट नोट प्रकरणात आणखी दोन अटकेत

**नांदगाव पेठ/ वार्ताहर**
रहाटगाव परिसरात उघडकीस आलेल्या बनावट चलनी नोटांच्या प्रकरणात नांदगाव पेठ पोलिसांनी रविवारी आणखी दोन संशयितांना अटक करून ५७ हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. आतापर्यंत या प्रकरणात सात जणांना अटक करण्यात आली असून, या रॅकेटचा मास्टरमाईंड अद्याप फरार आहे. पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यासाठी वेगाने तपास सुरू आहे.
अटक करण्यात आलेले आरोपीत आदित्य रामेकर (रा. समर्थवाडी, रहाटगाव) व यश सतीश बर्वे (रा. दत्तवाडी, रहाटगाव) हे असून, आदित्य याच्याकडून तब्बल ४८ हजार रुपयांच्या, तर यश बर्वे याच्याकडून ९ हजार रुपयांच्या बनावट नोटा हस्तगत करण्यात आल्या



आहेत. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.
याआधी पोलिसांनी पाच आरोपींना अटक करून काही प्रमाणात बनावट चलनी नोटा जप्त केल्या होत्या. या सलग कारवाईमुळे रहाटगाव परिसरातील बनावट नोटांच्या अवैध व्यवहारांवर पोलिसांनी मोठा आळा घातला आहे. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, या आरोपींनी बनावट नोटा स्थानिक बाजारात आणि किरकोळ व्यवहारांमध्ये वापरून चलनात आणण्याचा प्रयत्न केला होता. बनावट नोटा बनविणा-यांचे धागे दणाणले असून मोठे रॅकेट समोर येण्याची दाट शक्यता वर्तविला जात आहे.
सदर कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात पार पडली. या पथकात राजा राऊत, राजीक खान, निलेश साविकार, राजा सय्यद, वैभव तिखीले आणि अमित ढोले यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शेतकरी न्याय हक्क विचार मंच शाखेची स्थापना

**कुऱ्हा/ वार्ताहर**
शेतकरी न्याय हक्क विचार मंच गेली पाच वर्षापासून तालुक्यात शेतकऱ्यांच्या न्याय हक्काच्या अनेक मुद्दयाच्या संदर्भात सातत्याने लढा देत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने केंद्र सरकारने अचानकपणे २०२२-२३ ला नाफेड अंतर्गत होणारी शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारे माहिती न देता खरेदी बंद केली त्या विरोधात न्याय हक्क विचार मंचाच्या वतीने शेकडो शेतकऱ्यांनी माननीय तहसीलदार साहेब, जिल्हाधिकारी साहेब, विभागीय आयुक्त यांना निवेदन देऊन अवगत केले त्याचप्रमाणे तत्कालीन संबंधित मंत्री पियुष गोयल यांना वरिष्ठांच्या माध्यमातून दूरध्वनीवरून संपर्क साधून बंद केलेली चना खरेदी सुरू करण्याबाबत अवगत केले त्याचा परिपाक म्हणून पाच दिवसात संपूर्ण महाराष्ट्रात नाफेड अंतर्गत परत जना खरेदी



केंद्र सुरू करण्यात आले तसेच २०२२ २३ मध्ये अनुदानापासून वगळलेल्या तालुक्यातील संत्रा उत्पादक तसेच वरखेड मंडळातील शेतकऱ्यांना न्याय हक्क विचार मंचाच्या वतीने माननीय तहसीलदार साहेब, जिल्हाधिकारी साहेब, विभागीय आयुक्त साहेब यांना निवेदन देऊन प्रत्यक्ष माननीय देवेंद्र फडणवीस मुख्य मुख्यमंत्री यांना भेटून तालुक्यात नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याला मदत मिळवून देण्याकरता समर्थ कार्य न्याय हक्क विचार मंचांनी केले .तसेच कृषीच्या अनेक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम असो संजय गांधी योजनेचे पात्र लाभार्थ्यांना न्याय देण्याचे काम असो किंवा आरोग्य क्षेत्रातले काम असो अशा आणि अनेक समाज उपयोगी कार्य शेतकरी न्याय हक्क विचार मंच सातत्याने करत आहे याची दखल घेऊन शिंदवाडी या गावी तेथील प्रमुख युवा शेतकऱ्यांनी न्याय हक्क विचार मंच स्थापन करण्याचा मानस दर्शविला त्या अनुषंगाने शिंदवाडी गावामध्ये न्याय हक्क विचार मंच शाखेची स्थापना करण्यात आली. सर्वानुमते अशोकराव जाधव यांची शाखाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली व सोबतच २१ सभासदांची सुद्धा निवड करण्यात आली. या सभेला शेतकरी न्याय हक्क विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष दिनेश वानखडे यांनी मार्गदर्शन करताना घोषित अध्यक्ष व सभासदांनी शेतकऱ्याप्रती सजग राहून शेतकऱ्यांच्या उपयुक्त असलेल्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्या करता प्रयत्न करावेत तसेच सरकारकडून होणाऱ्या हक्काच्या लढाईमध्ये शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा देऊन उभे राहावे येणाऱ्या काळात शेतकरी न्याय हक्क विचार मंचाला शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च आधारित भावांतर योजना राबवण्या कारिता संपूर्ण कर्जमुक्ती होण्याकरिता तसेच विधान परिषद व राज्यसभेमध्ये शेतकऱ्यांना स्वतंत्र मतदार संघ उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात लढा देण्याकरिता सर्वांना सज्ज राहण्याचे प्रतिपादन केले. या सभेला प्रामुख्याने संत्रा उत्पादक संघाचे तालुकाध्यक्ष सोपान- रावजीरावपुरे, मंचाचे समन्वयक संजय भाऊ टेकाळे, समन्वयक विनोदराव जाधव, संजय भाऊ मोरे, नंदू भाऊ जीरापुरे यांनी मार्गदर्शन केले. सोबतच न्याय हक्क विचार मंच सातत्याने तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यामध्ये कशा प्रकारे काम करत असल्या बाबतचे आनंदराव राठोड, साहेबरावजी राठोड मंगेश राठोड यांनी विचार मांडले या सभेला प्रामुख्याने शेषराव जाधव, संजय राठोड, विजय जाधव, विजय राठोड, मधुकर जाधव, भालचंद्र चव्हाण, जाधव, अतुल चव्हाण, पिंटू जाधव, महादेवराव जाधव, भाई सिंग जाधव, रामधन राठोड, विठ्ठल राठोड व शेतकरी न्याय हक्क विचार मंचाचे कार्यकर्ते व शेतकरी बांधव उपस्थित होते.

# अवघ्या पाच तासांत शोधले सहा लाखांचे हरवलेले दागिने

## -भाऊबीजेला पोलिसांची अनोखी ओवाळणी!

### -परतवाडा डीबी पथकाने केली कारवाई



**अचलपूर/प्रतिनिधीः-** दक्षता, तत्परता आणि संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरण देत परतवाडा पोलिसांच्या डि.बी. पथकाने दिवाळीच्या सणानिमित्त भाऊबीजेच्या दिवशी एका बहिणीला अनमोल भेट दिली. तब्बल सहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अवघ्या पाच तासांत शोधून त्या बहिणीच्या हाती सुखरूप परत केले.

शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी सुमारे १० वाजता परतवाडा पोलीस ठाण्यात ऋषाली हर्षल देशमुख (वय २७, रा. बिलनपुरा, अचलपूर) यांनी तक्रार दिली की, दि. २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता त्या व त्यांचे पती अमरावती येथे नातेवाईकांकडे जाण्यासाठी चांदूर बाजार नाक्यावर आले होते. गाडीतील सामान एका नातेवाईकाच्या गाडीत ठेवत असताना नजरचुकीने त्यांची एक बॅग तेथेच राहिली. त्या बॅगेत २५ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र (किंमत सुमारे ३,२५,०००), १५ ग्रॅम सोन्याचा गळ्यातील गोप (किंमत १,८५,०००) आणि ५ ग्रॅम सोन्याची कानातली (किंमत ९०,०००) असे एकूण ४५ ग्रॅम सोन्याचे, सुमारे ६,००,००० किमतीचे दागिने होते. तक्रार प्राप्त होताच पोलिस निरीक्षक सुरेश म्हस्के यांनी डि.बी. पथकास तत्काळ तपासाचे आदेश दिले. पथकाने घटनास्थळ आणि परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासले असता, एका महिलेनं ती बॅग उचलून नेल्याचे निदर्शनास आले. त्या महिलेला शोधत पथकाने ती भिलोना परिसरात संत्रा तोडणीसाठी गेलेली असल्याचे निष्पन्न केले. पोलिसांनी तातडीने भिलोना येथील शेतशिवारात जाऊन सदर महिलेकडून ती बॅग हस्तगत केली. तपासणीअंती बॅगेत सर्व दागिने जसेच्या तसे मिळाले. नंतर ती बॅग व दागिने ऋषाली देशमुख यांच्या ताब्यात परत देण्यात आले. दिवाळीच्या सणानिमित्त परतवाडा पोलिसांनी दाखवलेली ही कार्यकुशलता व तत्परता नागरिकांच्या कौतुकास पात्र ठरली आहे.

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद, (पान २ वर)

# अनैतिक संबंधातून कृषी विभागातील लिपिकाची हत्या

## -मोर्शी पोलिसांनी २४ तासात आरोपीला केली अटक

### येरला येथील फळरोप वाटिकेत आढळला होता मृतदेह




**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी ते चांदूरबाजार रोडवर असलेल्या येरला फळरोप वाटिकेमध्ये गुरुवारी (दि२३) सायंकाळी कृषी कार्यालयातील लिपिक विनोद भास्करराव राऊत (वय ५२, समर्थ कॉलनी मोर्शी) यांचा रक्तरंजित मृतदेह आढळला होता. या प्रकरणाचा मोर्शी पोलिसांनी २४ तासात उलगडला केला असून कृषी कार्यालयातीलच आरोपी गार्ड धनराज सुखदेव वानखडे (वय ५२, घाटलाडकी ,ह.मु श्रीकृष्ण पेठ मोर्शी ) याला ताब्यात घेतले



आहे. पत्नीसोबत असलेल्या अनैतिक संबंधातून त्याने हत्या केल्याची कबुली दिली आहे. माहितीनुसार गुरुवारी सायंकाळी सात वाजताच्या सुमारास उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयामध्ये लिपिक पदावर कार्यरत विनोद भास्करराव राऊत यांचा मृतदेह येरला येथील फळरोप वाटिकेमध्ये रक्तरंजित आढळला होता. या संदर्भात पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून पंचनामा केला. (पान २ वर)

# कोंडेश्वर रोडवरील जंगलात अवैध गावठी हातभट्टीवर कारवाई

### आरोपी रंगेहात ताब्यात





**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गुरुवारी (दि. २४) कोंडेश्वर रोड परिसरातील जंगलात अवैध गावठी दारूवर धडक कारवाई केली. यावेळी १,४८,२०० रुपयांचे अवैध हातभट्टी दारू आणि साहित्य जप्त करण्यात आले, तर एक आरोपी ताब्यात आहे.

पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की शक्तीसिंग किर्तनसिंग बावरी (वय ३८, रा. सदगुरू नगर, नवी वस्ती बडनेरा) हा कोंडेश्वर रोडजवळील जंगलात अवैध हातभट्टी दारू तयार करीत आहे. तत्काळ पथकाने जंगलात छापा टाकला आणि झाडाझुडपात उभारलेल्या टिनाच्या शेडमध्ये दोन विटांच्या चुलींवर ड्रम ठेवून दारू तयार करताना आरोपीला रंगेहात पकडले. पोलीसांनी हातभट्टी तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, ड्रम, प्लास्टिक डबे, लाकूड आणि तयार दारू असा एकूण १,४८,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी शक्तीसिंग बावरी याला ताब्यात घेऊन बडनेरा (पान २ वर)

# कवंर नगर हिट अँड रन प्रकरणातील आरोपी गजाआड

## -राजापेठ पोलिसांची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** दिवाळीच्या रात्री कवंर नगर मार्गावर गजल बार समोर हीट अँड रन ची घटना समोर आली होती. अज्ञात बोलेरो चालक दोन अ?क्टिवा स्वार मुलींना धडक देऊन फरार झाला होता. या मध्ये दोन्ही मुली जखमी झाल्या होत्या. या प्रकरणात राजापेठ पोलिसांनी तपास करून आरोपी कार चालक रोहित रमेश नंदागवळी (वय २४, लुंबिनी नगर, वडरपुरा) याला ताब्यात घेतले आहे.

आरोपी रोहित नंदागवळी पांढ्या रंगाची बोलेरो एमएच ४९ बीडब्ल्यू ५९५८ चालवत होता. ही गाडी आशिष भैरव उघेमुघे यांची असल्याचे समोर आले आहे. माहितीनुसार दिवाळीच्या रात्री पायल राजेंद्र बुंदिले (वय २२, सबनीस प्लॉट ) व वैष्णवी विष्णू थोरात (वय २१,जेवड नगर) या दोघी एक्टिवा टू व्हीलर एमएच २७ सीआर ४०८८ ने महाकाली मंदिर येथे दर्शनाकरिता जात होत्या. त्यावेळी फरशी स्टॉप मार्गे कवर नगर मार्गाने दोघी जात असतांना गजल बार समोर अचानक दुचाकीला मागून बोलेरो वाहन चालकाने धडक मारली. यामुळे दोघीही गाडी सह खाली पडल्या. पायल गाडीजवळ पडली व तिची मैत्रीण दूरवर फेकली गेली. बोलेरो चालक वैष्णवीच्या अंगावरून गाडी घेऊन गेला. त्यामुळे तिची प्रकृती फारच गंभीर झाली आहे. जखमी वैष्णवीला इलाजाकरता सनशाईन सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथे भरती करण्यात आले आहे. जिथे तिच्यावर उपचार सुरू आहे. पायल बुंदीले च्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल (पान २ वर)

# अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकः मतदार नोंदणीसाठी 'फॉर्म १९' सादर करण्याची अंतिम मुदत ६ नोव्हेंबरपर्यंत

**अमरवती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी पात्र असलेल्या पात्र मतदारांनी (फॉर्म १९) मधील अर्ज वेळेत सादर करावा. मतदार नोंदणी नियम, १९६० नुसार, मतदार नोंदणी अधिकारी यांनी आवाहन केले आहे की, ज्या व्यक्तींची नावे यापूर्वी मतदार यादीत समाविष्ट नाहीत, त्यांनी हा अर्ज दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२५ (गुरुवार) पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. हा नमुना १९ अर्ज मतदार नोंदणी नियम, १९६० मधील दुसऱ्या अनुसूचीमध्ये उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी व तपशीलासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे www.ceo.maharashtra.goved.in तसेच विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे संकेतस्थळ www.amravatidivision.goved.in यावर संपर्क साधावा. सर्व पात्र शिक्षकांनी या अंतिम मुदतीची नोंद घेऊन आपली मतदार नोंदणी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी शिबिर

## -विविध बँकांच्या १४८ खातेदारांचे ३.५२ कोटी रुपयांचे खाते पुर्नजीवित



**अमरावती/प्रतिनिधीः-** ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत मिळाली नसलेल्या आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणासाठी आज जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता फंड या शिबिराचे आयोजन जिल्हाची अग्रणी बँक सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या पुढाकाराने अभिनंदन को ऑपरेटिव बँकेच्या सभागृहामध्ये करण्यात आले. या शिबिरामध्ये विविध बँकांच्या १४८ खातेदारांचे ३.५२ कोटी रुपयांचे खाते पुर्नजीवित (अ?क्टिवेट) केले गेले.

अभिनंदन बँकेचे अध्यक्ष विजय बोथरा, रिजर्व बँकेचे सहायक महाप्रबंधक विनोद कुमार के., अभिनंदन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी देठे, अभिनंदन बँकेचे व्यवस्थापकीय अध्यक्ष सुदर्शन गांग, सेंन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक सुनील पांडेय, स्टेट बँकेचे नवीन उप्पलवार, अग्रणी बँक जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यावेळी उपस्थित होते.

या उपक्रमामुळे खातेदारांना त्यांच्या हक्काच्या ठेवी परत मिळवण्याची संधी मिळत आहे. १० वर्षाहून अधिक काळ ज्या ठेवींवर दावा केलेला नाही, अशा ठेवी 'ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधी'मध्ये हस्तांतरित करण्यात येतात. खातेदारांना त्या परत मिळवण्याचा पूर्ण अधिकार आहे. याबाबत जनजागृती व्हावी यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात खातेदारांच्या दावा न (पान २ वर)

# बसस्थानकातून महिलेचे ८ ग्रॅमचे मंगळसूत्र चोरी

**बोलोरा/प्रातिनिधीः-** चांदूरबाजार बस डेपो परिसरात एका महिलेचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

बोदळ येथील सोनाली राजेंद्र चिखले ही महिला शिरसगाव कसबा येथून चांदूरबाजार येथे दुपारी बारा वाजताच्या सुमारास एस.टी. बसमधून उतरली असता, गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने तिच्या गळ्यातील आठ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र (किंमत ४० हजार रूपये) चोरून नेले.

घटनेच्या वेळी सोनाली चिखले या भाऊबीज साजरी करण्यासाठी भावाच्या घरी जात होत्या. चोरीची घटना लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ चांदूरबाजार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून ठाणेदार अशोक जाधव यांनी गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास पीएसआय प्रदीप कांबळे , तसेच जमादार विनोद दाभणे आणि सुनील खेरडे करीत आहेत.

पोलीसांकडून चोरट्याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू असून, बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असल्याची माहिती मिळाली आहे.

# पोक्सो प्रकरणात दर्यापूर येथील न्यायालयाने दिला जामीन

## ॲड.मुकुंद नळकांडे व ॲड.रियाज घाणीवाले यांचा महत्वपूर्ण युक्तिवाद





**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर व चिंचोली पोलिस स्टेशन अंतर्गत पोक्सो कायद्यानुसार दोन व्यक्तीविरुद्ध वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हा दाखल झालेला होता. त्याप्रमाणे दोन्ही आरोपी हे मध्यवर्ती कारागृह अमरावती येथे बंदीस्त करण्यात आले होते. या दोन्ही प्रकरणांमध्ये दर्यापूर येथिल अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय यांच्याकडे जामिन अर्ज दाखल करण्यात आला होता.सदर अर्जाच्या अनुषंगाने दर्यापूर येथिल प्रकरणात प्रख्यात अधिवक्ता ॲड. मुकुंद नळकांडे व ॲड. रियाज घाणीवाले यांनी महत्त्वपूर्ण युक्तिवाद करून प्रस्तुत प्रकरणा खालील आरोपींना जामिन मंजूर करून दिला. या दोन्ही प्रकरणात महत्त्वाची बाब अशी की पोक्सो प्रकरणांमध्ये काही दिवसातच जामिन मंजूर झाला असल्याचे पहिल्यांदाच दिसून आले.

# लैंगिक अत्याचारपिडितेने दिला जुळ्या बाळांना जन्म

## -मंदिरात लग्न करून केले शारीरिक शोषण

**परतवाडा/प्रतिनिधीः-** परतवाडा शहर हादरवणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सात ते आठ महिन्यांपूर्वी मंदिरात लग्न झालेल्या एका अल्पवयीन मुलीने गर्भधारणेनंतर जुळ्या बाळांना जन्म दिला, मात्र दोन्ही बालकांचा जन्मानंतर काही वेळातच मृत्यू झाला. याप्रकरणात एका तरुणावर परतवाडा पोलिसांनी विविध कलन्मावये गुन्हा दाखल केला आहे.

परतवाडा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राहुल पिसे (रा. परतवाडा) याने सात ते आठ महिन्यांपूर्वी एका अल्पवयीन मुलीशी मंदिरात लग्न केल्याचे सांगितले. लग्नानंतर आरोपीने पीडितेसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. गुरुवारी पीडितेच्या पोटात दुखू लागल्याने ती सरकारी दवाखान्यात तपासणीसाठी गेली असता, डॉक्टरांनी तपासून ती सहा महिने तीन दिवसाची गर्भवती असल्याचे निदर्शनास आणले. पुढे तीने जुळ्या बाळांना जन्म दिला, मात्र थोड्याच वेळात दोन्ही बालकांचा मृत्यू झाला. या (पान २ वर)

# शेतकरी व बैलजोडीच्या मृत्यूप्रकरणी लाईनमनवर गुन्हा दाखल

**वरूड/प्रतिनिधीः-**बेसखेडा शिवारात घडलेल्या हृदयद्रावक घटनेत एका शेतकऱ्याचा आणि त्याच्या दोन बैलांचा विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी लाईमनवर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी सुमारास १०.३० वाजता घडली असून या प्रकरणी वरूड पोलिस ठाण्यात २३ ऑक्टोबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हर्षल घोरसे (वय ३०, रा. बेसखेडा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे वडील श्रीराम बळीराम घोरसे हे दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता बैलजोडी घेऊन शेतात डवरणीसाठी गेले होते. काही वेळानंतर त्यांच्या आईने डबा घेऊन शेतात गेल्यावर तिने हर्षल यांना फोन करून सांगितले की, 'वडिलांच्या अंगावर विजेची तार तुटून पडल्याने त्यांना आणि दोन्ही बैलांना विजेचा धक्का बसला आहे.'

तार तुटल्याच्या घटनेत श्रीरामजी घोरसे आणि त्यांच्या दोन बैलांचा जागीच मृत्यू झाला. विशेष म्हणजे, शेतातील लोंबलेल्या विजेच्या तारांबाबत संबंधित लाईनमन अक्षय वानखडे (वय ३८, रा. वरूड) यांना वारंवार माहिती देण्यात आली होती. तरीही त्यांनी ती तार दुरुस्त केली (पान २ वर)

# पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या २२ वर्षीय युवकाचा मृत्यू

## -दर्यापूर-अकोट मार्गावर दुचाकीने दिली होती धडक

**खल्लार/प्रतिनिधीः-** पोलिस भरतीची तयारी करणारा २२ वर्षीय युवक मित्रासह दर्यापूर अकोट मार्गाने जात असतांना एका भरधाव दुचाकीने युवकास धडक दिली. या धडकेत युवकाचा मृत्यू झाला. धडक देणाऱ्या दुचाकी चालकाविरुध्द येवदा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शुभम संजय चव्हाण (वय २२)रा. वडनेर गंगाई असे मृत युवकाचे नाव असून शुभम हा पोलिस भरतीची तयारी करीत होता. १९ ऑक्टोबरला शुभम हा त्याच्या मित्रासह दर्यापूर अकोट रोडने जात असतांना एका भरधाव दुचाकीने त्याला धडक दिली. यात डोक्याला गंभीर मार लागल्याने शुभमचा मृत्यू झाला.

याबाबतची तक्रार वडील संजय चव्हाण यांनी येवदा पोलिसांत २२ ऑक्टोबरला दाखल केली. त्या तक्रारीवरुन येवदा पोलिसांनी धडक देणाऱ्या दुचाकी चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# दिवाळीत बाहेर गावी जाताना घर सांभाळा

## -ठाणेदार वानखडे याचे दर्यापूर वासियांना खबरदारी घेण्याचे आवाहन

**खल्लार/प्रातिनिधीः-** दर्यापूरचे कर्तव्यदक्ष ठाणेदार म्हणून प्रचिती असलेले सुनिल वानखडे यांनी दिवाळी निमित्याने दर्यापूर शहरवासीयांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

दिवाळीच्या काळात चोरी-हातचलाकी टाळण्यासाठी आणि सणाच्या काळातील गर्दी व्यवस्थापित करण्यासाठी दर्यापूर शहरात पोलिसांनी ठिकठिकाणी बंदोबस्त वाढविला आहे. या काळात लोकांनी सावधगिरी बाळगून घरातील सुरक्षा मजबूत करावी, फटाके सुरक्षितरित्या हाताळावेत आणि गर्दीच्या ठिकाणी जास्त गर्दी टाळावी.

दर्यापूर पोलिसांनी दिवाळीमध्ये वाहतूक कोंडी टाळण्यासाठी अतिरिक्त पोलिस तैनात केले आहेत तसेच आकाशकंदील आणि ड्रोन उडविण्यासंबधी सावधानता व्यक्त केली आहे. नागरिकांनी फटाके टाळण्याचा (पान २ वर)

# राहुल लांजेवार शिवसेना शिंदे गटाच्या तिवसा विधानसभा संघटकपदी



**तिवसा/प्रातिनिधीः-** तालुक्यातील ग्राम गुरुकुंज मोझरी येथील सक्रिय कार्यकर्ते राहुल लांजेवार यांची नुकतीच शिवसेना शिंदे गटाच्या तिवसा विधानसभा संघटकपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी गेल्या १० ते १५ वर्षापासुन अनेक महत्वाच्या पक्ष बैठका, तसेच अनेक जनतेच्या कामांकरिता आंदोलना मध्ये सहभागी होऊन ओळख निर्माण केली. (पान २ वर)

# ३५ गोवंशाला मिळाले जीवदान

## -बडनेरामध्ये पकडला ट्रक

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या सुपर एक्सप्रेस हायवेवर चक्रधर पेट्रोल पंपच्या समोर गुरुवारी उशिरा रात्री पोलिसांनी कार्यवाही करून गोवंश भरलेल्या ट्रकला पकडले. यामधून ३५ गोवंशाची सुटका करण्यात आली. गोवंशाला गोरक्षण संस्थेच्या स्वाधीन करण्यात आले आहे. माहितीनुसार बनडेरा पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की ट्रक एमएच ४० सीडी ४२६६ मधून गोवंशाची तस्करी होत आहे. नांदगाव वरून हा ट्रक बनडेरा कडे येत आहे. यावरून पोलिसांनी सुपर एक्सप्रेस हायवे जवळ चक्रधर पेट्रोल पंप समोर नाकाबंदी केली. नाकाबंदी पाहून ट्रकचालक घाबरला आणि ट्रकला कच्च्या मार्गावरून घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना ट्रक नाली मध्ये फसला. यामुळे चालक ट्रकला सोडून तेथून पळाला. पोलिसांनी ट्रकची पाहणी केली असता त्यामध्ये ३५ गोवंश जनावरे आढळली. (पान २ वर)